# आव्हान

सौ.अरुंधती बापट



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# आव्हान

लेखिका : अरुंधती बापट

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# आव्हान

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# आव्हान
## लेखिका : अरुंधती अरविंद बापट

१० सावली अपार्टमेंट्स,

प्रभात फिल्म कंपनी मार्ग,

लॉ कॉलेज रस्ता, एरंडवन,

पुणें ४११००४

ph 020 25464804

Mo 9423003528

e-mail - arundhati@bapat.net

मुखपृष्ठ: सानिका बापट,

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ एप्रिल २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेचा परिचय



मी सौ अरुंधती अरविंद बापट. पूर्वाश्रमीची विजया बाळकृष्ण ओगले. मानसशास्त्र हा माझ्या विषयात masters degree (MA) घेतली. माझे BA पर्यंतचे शिक्षण नागपूर येथे झाले. मराठी माध्यमातून शिकलेली मी, MA ला इंग्लिश माध्यम घेतल्याने, खूप प्रयत्न करावे लागले. पण अथक प्रयत्नांमुळे मी मेरिट घेऊन पास झाले.

त्याआधीच मी लेखनाला सुरवात केली होती. लिहिण्याची प्रेरणा मला माझी आई – सौ शकुंतला बाळकृष्ण ओगले, हिच्याकडून मिळाली. हे पुस्तक लिहून मी मातृऋणाचा सन्मान करते आहे, असं मला वाटतं. कारण मातृऋण कधी फेडता येईल असं मला वाटत नाही.

पहिला लेख मी बालगुन्हेगारीवर लिहिला होता. त्या लेखाला कॉलेजमध्ये पहिले बक्षीस मिळाले होते. त्यानंतर नागपूरच्या लहानमोठ्या वर्तमानपत्रात मी छोटेमोठे लेख लिहीत असे. नागपूर

आकाशवाणीवरही बालविहारमध्ये माझे अनेक कार्यक्रम होत असत.

लग्नानंतर मात्र माझ्या लिखाणात खंड पडला. साधारणपणे १९७३ ते १९७५ याकाळात मी पुन्हा लेखनाला सुरवात केली अनेक मासिकांमधून माझ्या गोष्टी व कविता छापून येत असत. या काळात मी मा. शांताबाई किर्लोस्करांबरोबर महाराष्ट्र पालक शिक्षक संघाचे त्रैमासिक, " पालक - शिक्षक या मासिकाच्या संपादनाचे काम करीत असे. त्यातून मला प्रेरणा मिळाली. मग मी नापास मुलांच्याकरता एक विशेष वर्ग सुरु केला. मला असं वाटायचं की मुलं अभ्यासात मागे पडतात ती केवळ ती बुद्धीने कमी असतात किंवा अभ्यास करत नाही असं नव्हे. तर त्याच्या मागे इतरही काही कारणं असू शकतात. घरचं वातावरण, खूप लाड, पालकांचं दुर्लक्ष, वर चढवल्यामुळे मागचा अभ्यास कच्चा असणे. मी प्रत्येक मुलाचा अभ्यास करून त्याच्या मागे पाडण्याचे संभाव्य कारण शोधून, त्याच्या पालकांशी चर्चा करीत असे. अशा अनेक मुलांना मी अभ्यासात वर आणले आहे. त्यातून मुलांची वाढ व विकास या बद्दल एक सोपेसे पुस्तक लिहिण्याचा विचार मनात आला. तो विचार मी प्रत्यक्षातही आणला. त्याबद्दल पुन्हा केव्हांतरी.

यानंतर मी लेखन करीत असे, पण ते प्रसिद्ध करण्याकडे माझा कल नव्हता. आज माझ्या या कथा वाचकांपर्यंत पोहोचवतांना मला मनोमन आनंद होतो आहे. पहिल्यांदाच माझ्या कथा वाचकांपर्यंत पोहोचत आहेत, त्या वाचकांच्या पसंतीला उतरतील अशी आशा करते. मी मानसशास्त्र शिकले आहे. या गोष्टींमध्ये माझ्याकडून मानवी मनाच्या निरनिराळया भावनांचं प्रकटीकरण झालेलं आहे.

हे माझं दुसरं पुस्तक. e-sahity मुळे हे दुसरं पुस्तक इतक्या लवकर वाचकांपर्यंत पोहोचवणं मला शक्य झालं. त्यामुळे e-साहित्यच्या कार्यकर्त्यांचे मनापासून आभार.

इतरांच्या भल्याचा विचार करणारे आणि इतरांचा विचारच न करणारे, असे मनुष्य स्वभावाचे, दोन्ही प्रकारचे टोकाचे नमुने आपल्याला समाजात आढळतात. त्यांचं चित्रीकरण या गोष्टींमध्ये करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. या गोष्टी आपल्या पसंतीला उतरतील अशी अशा व्यक्त करून माझं हे छोटंसं मनोगत मी सादर करते आहे.

इतक्या कमी वेळात दुसरं पुस्तक प्रकाशित करणं, ही करामत फक्त e-साहित्यचीच. त्यांचे आभार मानू , की आता, ते आपलेच आहेत म्हणून मनोमन कृतज्ञता व्यक्त करू हे मला ठरवता येत

नाहीये. त्यामुळे त्यांनी मला त्यांच्यात सामावून घेतल्याचा आनंद व समाधान मी व्यक्त करते आहे. या e – पुस्तकाचं सुंदर मुखपृष्ठ सौ अश्विनी पुरंदरे व सानिका बापट यांनी तयार केलेलं आहे. त्यांचे मनापासून आभार.

**अरुंधती अरविंद बापट**

# अर्पणपत्रिका

माझे वडील, **श्री बाळकृष्ण गोविंद ओगले**, हे एक प्रकारे संतच होते. व्यवहारातला फायदा - तोटा यांचा त्यांनी कधी विचारच केला नाही. कोणत्याही परिस्थितीत समोरच्या व्यक्तीशी चांगलं वागवायचं ही शिकवण त्यांनीच दिली. ती शिकवण नेहमी आचरणात आणल्यामुळे कधी पश्चात्ताप करण्याची वेळ माझ्यावर आली नाही. मन नेहेमीच शांत राहीलं.

त्यांच्या चरणी मी माझं हे दुसरं पुस्तक अर्पण करते आहे.

# आव्हान

# कथानुक्रम

परतफेड

आव्हान

# परतफेड

समारंभ आटोपला. सर्व पाहुणे मंडळी आपापल्या घरी निघाली. आप्पासाहेब जरा निवांत बसले होते. एवढ्यात त्यांचा नोकर एका मुलाला घेऊन आला आणि म्हणाला, “ हा बघा चोर. आपल्या मांडवात शिरला होता.”

तो लहानसा दहा-बारा वर्षांचा मुलगा, अगदी भेदरून गेला होता. त्याला कळून चुकलं होतं, की आता तो स्वतःला वाचवू शकणार नाही. कारण तो चोरी करतानाच पकडला गेला होता. त्याच्या डोळ्यातून पाणी येत होतं. त्याचे डोळे मूकपणाने क्षमायाचना करीत होते. तो खूप घाबरला होता. त्याची ही अवस्था बघून, आप्पासाहेब म्हणाले, “ विठ्ठल, आधी सोड त्याला. आणि त्याला पाणी दे प्यायला.”

आप्पासाहेबांचं हे बोलणं ऐकून सगळेच चक्रावून गेले. त्यांच्या वागण्याचा, बोलण्याचा अर्थ कुणाला कळत नव्हता. एवढ्यात विठ्ठलनी त्या मुलाला पाणी आणून दिलं. तो मुलगा साशंकतेनेच पाणी प्यायला. त्याला तिथून पळून जायचं होतं. पण आपण इथून सुटू शकत नाही, हे त्याच्या लक्षात आलं होतं. आता आपल्या बाबतीत आणखी काय काय घडणार आहे ? या

कल्पनेनीच तो अर्धमेला झाला होता. तरीही त्याला सोडल्यामुळे आणि पाणी प्यायला दिल्यामुळे, कदाचित आपण यातून सुटू की काय, अशी किंचितशी आशा त्याच्या मनात निर्माण झाली होती.

एवढ्यात आप्पासाहेब त्याला म्हणाले, “ मुला, तुझं नाव काय? तू इकडे का आलास? तू कुठे राहतोस? ”

प्रथम तर त्या मुलाला बोलताच येईना. पण आपल्याला, आपली बाजू मांडण्याची ही एकमेव संधी आहे, हे लक्षात येऊन, तो म्हणाला, “ माझं नाव, ---- लोक मला वेंधळा, चोर म्हणतात, मला काही नाव नाही आहे. मला घरच नाही, मी कुठेतरी झोपतो.”

अप्पासाहेब कळवळले. त्यांनी विचारलं, “ तुझे आई-वडील कुठे आहेत? ”

“ मला कोणीच नाही. मी एकटाच आहे. मला वाटलं, की एवढ्या गर्दीत मला काहीतरी खायला मिळेल, म्हणून मी मांडवात शिरलो. गेले चार-पाच दिवस मी उपाशीच आहे. ”

आप्पासाहेब --- “ अरेरे! भुकेला आहे तो. बाळा खाली बस. विठ्ठल त्याच्यासाठी काहीतरी गरमागरम खायला घेऊन ये.”

हे शब्द ऐकल्याबरोबर, आता काहीतरी मनोरंजक पाहायला मिळणार, म्हणून गोळा झालेली, घरातली व काही पाहुणे मंडळी, इकडे तिकडे पांगली. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे काहीच घडलं नव्हतं.

आपण ऐकलं ते खरं आहे यावर त्या मुलाचा विश्वास बसेना. त्यामुळे तो खाली बसला नाही. खाली मान घालून उभा राहिला. आता काय शिक्षा आपल्या वाट्याला येणार आहे, याची तो वाट पाहत होता.

त्याच्या कानांवर पुन्हा शब्द आले, “ अरे बाळा, तुलाच सांगतोय मी, खाली बस. पाणी पी. ” मग तो हळूच खाली बसला. त्याला चोरी अजिबात करायची नव्हती. त्याला फक्त थोडं खायला हवं होतं . आजवर त्याला पूर्ण भूक भागेल, एवढं खायला कधीच मिळालं नव्हतं. तशी त्याची अपेक्षाही नव्हती. त्याला फक्त थोडं खायला हवं होतं.

विठ्ठल एका ताटलीत त्याच्यासाठी जिलबी, थोडा भात, नि वडा घेऊन आला होता. त्यानी त्या मुलाच्या हातात, ती अन्न भरलेली बशी दिली होती. ती बशी घेताना त्या मुलाचे हात थरथरत होते. डोळ्यातून अधिकच वेगानी  पाणी वाहू लागलं होतं. बशी हातात घेऊन तो नुसताच बसून राहिला. इतक्या सन्मानांनी त्याला कधीच काही मिळालं नव्हतं. लोकांनी उपेक्षेने दिलेल्या वस्तू --- नाईलाज म्हणून त्याला स्वतःच्या मनाविरुद्ध स्वीकाराव्या लागत होत्या. खायला मिळणं तसं दुरापास्तच होतं. त्याला भूक मारून राहण्याची चांगलीच सवय होती. पण गेल्या दोन-चार दिवसात,

त्याला खरंच काही खायला मिळालं नव्हतं. कुठे काम मागायला गेलं, तर त्याला भुरटा चोर समजून लोकं हाकलून देत. त्यामुळे आताही त्या बशीतलं अन्न त्याला खुणावत होतं, पण खायला हात धजावत नव्हते. न जाणो, कोणी आपल्यावर ओरडलं तर!

आप्पासाहेबांनी त्याच्या मनाची ही चलबिचल जाणली; ते त्याला म्हणाले, “ खा बाळा तू , पोटभर खा. कोणी तुला काही म्हणणार नाही.” मग ते राहिलेल्या लोकांना म्हणाले, “ चला जा तुम्ही आपापल्या कामाला, इथे काय तमाशा चालू आहे का? ” मग ती उरली सुरली लोकंही तिथून निघून गेली. उरले आप्पासाहेब, तो मुलगा, नि आता पुढे आप्पासाहेब काय सांगतात, ते ऐकण्यासाठी तिथे घुटमळणारा विठ्ठल.

आप्पासाहेब पुन्हा त्याला म्हणाले, “ खा रे बाळा, तुला दिलं आहे ना खायला? कोणी तुला रागावणार, ओरडणार नाही. ”

“ मला खरंच खूप भूक लागली आहे, गेल्या चार-पाच दिवसात मला धड खायलाच मिळालेलं नाहीये, ” हुंदके देत देत तो म्हणाला.

“ अरे, म्हणून तर तुला सांगतोय मी, की तुला खायला दिलं आहे, ते तू शांतपणाने खा. अजूनही हवं असलं, तर विठ्ठल तुला आणून देईल. विठ्ठल, त्याला अजून काही हवं असलं, तर आणून

दे. त्याचं जेवण झालं, की त्याला तुझ्या खोलीत झोपायला घेऊन जा. बाहेर हाकलून देऊ नकोस. त्याची आणखी माहिती, मी सकाळी घेईन आणि मग त्याचं काय करायचं, ते ठरवीन.” एवढे बोलून ते झोपायला निघून गेले.

विठ्ठल त्याला म्हणाला, “ खा बिगी बिगी. मला अजून खूप कामं आहेत.”

एवढं सगळं बोलणं ऐकल्यावर, त्या मुलानी खायला सुरुवात केली. पण त्याच्या डोळ्यातले अश्रू थांबायचं नाव घेत नव्हते. पोटात थोडं अन्न गेल्यावर, त्याचं रडणं थांबलं. उरलेलं अन्न मात्र त्यानी चवीनी खाल्लं. ताटली रिकामी झाल्यावर, त्यांनी अपेक्षेनी विठ्ठलकडे पाहिलं. विठ्ठलनी त्याची ताटली पुन्हा एकदा भरून आणून दिली. त्या मुलानी ती ताटलीही रिकामी केली. हातातली ताटली खाली ठेवून, तो मुलगा तिथून बाहेर पडण्याच्याच बेतात होता; त्याच वेळी विठ्ठल बाहेर आला आणि आणि त्याला म्हणाला, “ अरे, तुला इथे थांबायला सांगितले आहे जणु? मग चाललास कुठे? चल माझ्याबरोबर.” आणि त्याला हाताला धरून आपल्या खोलीत घेऊन गेला. तिथे खाली एक सतरंजी अंथरलेली होती. त्यावर तू झोप, असं विठ्ठलनी त्याला सांगितले. तो मुलगा,

अवघडून तसाच उभा राहिला. “ अरे झोप बाळा, चांगलं झोपायला मिळालं आहे तर, झोपून घे.” विठ्ठल म्हणाला.

त्याने एक जुनी चौघडी त्या मुलाच्या हातात दिली. ती मऊशी चौघडी हातात घेतल्यावर, त्याला झोपायचा मोह आवरेना. बहुधा इथे आपल्याला काही धोका नाही, हे लक्षात घेऊन तो ताबडतोब त्या सतरंजीवर आडवा झाला आणि क्षणार्धात त्याला झोप लागली. त्याला झोप लागल्याचं बघून विठ्ठल आपल्या कामाला निघून गेला.

सकाळ झाली. त्याला जाग आली. उठून करायचं काय हे त्याला माहितच नव्हतं; त्यामुळे तो तसाच पडून राहिला. विठ्ठल तर केव्हाच उठून कामाला लागला होता. त्याचं त्या मुलाकडे लक्ष होतं. तो त्याला म्हणाला,

“ उठ, चूळ भरून ये बाहेरून. चहा देतो तो पी आणि बाहेरचं अंगण स्वच्छ झाडून घे.”

मुलगा निमूटपणाने उठला. त्यांनी चूळ भरली. विठ्ठलनी दिलेला गरम गरम चहा प्यायला, तो सुखावला. कालपासून हे काय चाललंय हेच त्याला कळत नव्हतं. जे काय चाललं होतं, ते त्याच्या पचनी पडत नव्हतं. त्याने झाडू हातात घेतला. खालमानेनी तो अंगण झाडायला लागला. इथे खरंच आपल्याला काही धोका

नाही, हे लक्षात येऊन तो जरा निश्चिंत झाला. झाडता झाडता तो कधी गुणगुणायला लागला हे त्याचं त्यालाही कळलं नाही.

आप्पासाहेबांना जाग आल्याबरोबर त्यांच्या मनात पहिल्यांदा त्या मुलाचाच विचार आला. म्हणून ते लगेचच खोलीतून बाहेर आले. त्यांनी पाहिलं की तो अंगण झाडतो आहे आणि गोड आवाजात गुणगुणतो सुद्धा आहे. ते हसले आणि म्हणाले, “ झाडून झालं की आत ये रे माझ्याशी बोलायला.” एवढं बोलून ते आत गेले. जेवणाच्या टेबलशी बसले. लगेच विठ्ठलने त्यांना चहा आणून दिला. त्यांना पाहून, त्यांच्या पत्नी ललिताबाई ही तिथे येऊन बसल्या. त्या साहेबांना म्हणाल्या, “ अहो, त्या रस्त्यावरच्या - परक्या मुलाला पोटभर खायला दिलंत, हे ठीकच आहे. पण त्याला घरात कशाला ठेवून घेतलंत? काय खात्री आहे त्या मुलाची? कसा असेल अन काय? कसा विश्वास ठेवायचा त्याच्यावर? संधी साधून तो चोरीमारी करून पळून जायचा.”

यावर आप्पासाहेब काहीच बोलले नाहीत. त्यांनी स्वतःच्या पत्नीला हातानेच थांबण्याची खूण केली. एवढ्यात विठ्ठल ललिताबाईंसाठी चहा घेऊन आला. अंगण झाडून झालं आणि तो मुलगाही  आत आला. आता काय प्रसंग आपल्यावर येणार याची वाट बघत, हाताची घडी घालून, खालमानेनं भिंतीशी उभा राहिला.

आप्पासाहेब त्याला म्हणाले, “ नाव काय रे तुझं? ”

यावर तो गप्पच उभा राहिला. आप्पासाहेब पुन्हा त्याला म्हणाले, “ अरे मी तुझं नाव विचारतो आहे.”

“ मला नावच नाही. कोणीही कुठल्याही नावाने हाक मारतात मला ” - तो उत्तरला.

आता तर अप्पासाहेबांच्या नजरेला तो आणखीनच दीनवाणा दिसायला लागला. ते त्याला म्हणाले,“ खाली बस बघू आधी. आजपासून आम्ही तुला अशोक म्हणू. तू राहतोस तरी कुठे? ”

अशोक म्हणाला, “ मला कोणी नाही. घरही नाही. झोपतो कुठेतरी रस्त्यावर - झाडाखाली.”

“ आणि करतोस काय? ” आप्पासाहेबांनी विचारलं.

अशोक म्हणाला, “ मला काम करायला आवडेल. पण कोणी मला कामच देत नाहीत. सगळे मला चोर समजतात.”

“ का बरं तुला चोर समजतात? तू चोऱ्या करतोस का? ” आप्पासाहेबांनी विचारलं.

आता पुन्हा त्याचे डोळे पाण्याने डबडबले. आप्पासाहेब त्याला म्हणाले, “ रडू नकोस सारखा. नीट सांग मला तुझी सर्व माहिती. तुझे आई-वडील कुठे असतात? ”

आता तर त्याची स्थिती आणखीनच वाईट झाली. त्याला रडू आवरेना. तो म्हणाला, “ मला कोणीच नाहीय.”

“ तू कुठून आलास इथे? ” अप्पासाहेबांनी विचारलं.

“ माहित नाही. ” तो उत्तरला.

अप्पासाहेबांनी त्याला विचारलं, “ तू राहशील का आमच्याकडे? ” यावर त्यांच्या पत्नी, ललिताबाई काहीतरी बोलणार होत्या. पण आप्पासाहेबांनी त्यांना थांबण्याची खूण केली.

त्यांनी पुढे त्याला विचारलं, “ इथे आमच्याकडे राहायचं. सांगू ते काम करायचं आणि शाळेला जायचं.”

अशोक जरा विचारातच पडला. काय उत्तर द्यावं, हे त्याला समजेना. तेव्हा आप्पासाहेब त्याला म्हणाले,

“ उगाच इकडे तिकडे हिंडत राहण्यापेक्षा, राहा इथे आमच्याकडे. थोडं काम कर, शाळा शीक, त्यातच तुझं भलं आहे.”

अशोक स्वभावाने गरीब होता. त्याने होकारार्थी मान हलवली. आप्पासाहेब विठ्ठलला म्हणाले,

“ त्याला चहा दे. बिस्कीटही दे दोन-तीन. त्याचा चहा पिऊन झाला, की त्याला घेऊन दुकानात जा. त्याच्यासाठी चार-पाच

कपडे घेऊन ये. नंतर त्याला आंघोळ करायला सांग; आणि नवे कपडे घालून माझ्याकडे घेऊन ये.”

विठ्ठल त्याला घेऊन आत गेला.

आप्पासाहेबांचं बोलणं ऐकून, ललिताबाई अगदी स्तिमितच झाल्या. त्याला ठेवून घेताना, आप्पासाहेबांनी आपल्याला विचारू नये, याचं त्यांना थोडं वैषम्य वाटत होतं. त्या म्हणाल्या, “ एकदम निर्णयही घेऊन टाकलात? ना त्या मुलाचा काही आगापिछा, ना काही माहिती. काय काही सवयी असतील त्याच्या, देवच जाणे.”

आप्पासाहेब जरा गंभीरच झाले. ते म्हणाले, “ ललिता, तू म्हणतेस ते खरंच आहे. पण तरीही त्या मुलाला एक संधी द्यावी, आणि एक गुन्हेगार घडायचा थांबवावा, असं मला वाटलं, म्हणून त्याला ठेवून घ्यायचं, मी ठरवलं आहे.”

ललिताबाई काहीतरी बोलणार होत्या, तेवढ्यात आप्पासाहेब पुढे बोलते झाले, बोलताना त्यांचा चेहरा अगदी गोरामोरा झाला होता. ते म्हणाले, “ ललिता तुला कल्पना आहे का , की हा तुझा नवरा, लहानपणी असाच अन्नाला मोताद होता. एका भल्या माणसाच्या भलेपणानी मला एक घर मिळालं. शिकायला मिळालं. घर नुसतं राहायलाच मिळालं, असं नव्हे, तर आज मी त्या घराचा मालक आहे, त्या भल्या माणसाच्या कृपेनी.

त्यांनी मला नुसतं घरदार आणि शिक्षण दिलं असं नव्हे, तर त्यांनी मला त्यांचं नावही दिलं. आज हा आप्पासाहेब दामले - वकील, आसपासच्या दहा-बारा गावांमध्ये प्रसिद्ध आहे, तो त्या भल्या माणसाच्या कृपेनी. त्यांनी मला नुसतं खायला-प्यायला नाही दिलं, मला शिकवलं, माझ्यावर संस्कार केले, मला माणसात आणलं.”

मीही मनापासून सर्व गोष्टी शिकलो, मला जे शिकायचं असेल, ते शिकायला, त्यांनी मला संधी दिली. माझ्यावर कुठलंही दडपण आणलं नाही. मीही मनापासून त्यांची सेवा केली. त्यांनी अनेक निर्णय घ्यायला मला मदत केली. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मला आजचा दिवस दिसतो आहे. ललिताबाई दिग्मूढ होऊन ऐकत होत्या, त्यांना यातलं काहीच माहीत नव्हतं. त्या म्हणाल्या, मला कसं हे काही सांगितलं नाही लग्नाआधी? माझ्यापासून सगळं चोरून का ठेवलं? सांगायला हवं होतं नं!

“ ललिते, काही चोरून ठेवलं नाही. चोरून ठेवण्याजोगं काही नव्हतंच मुळी. सगळ्या गोष्टी स्पष्टपणानी आश्रम चालकांना सांगितल्या होत्या. तुला त्या सांगायच्या की नाही, हा निर्णय आश्रम चालकांनीच घ्यायचा होता. कदाचित त्यांना वाटलं नसेल, की ह्या सर्व गोष्टी तुला कशाला कळायला हव्यात? म्हणून त्यांनी तुला काही ही कल्पना दिली नसेल.” आप्पासाहेब.  ललिताच्या

मनात नेहमी यायचं, की या सर्वगुणसंपन्न, शिकलेल्या, प्रभावी व्यक्तिमत्त्वाच्या तरुणाने आपल्यासारख्या अनाथाश्रमात वाढलेल्या मुलीशी का बरं लग्न केलं असेल? पण हा प्रश्न आप्पा साहेबांना विचारायचं धाडस त्यांना कधी झालं नाही. आज अचानक त्यांच्या मनातल्या शंकेचा उलगडा झाला होता.

आप्पासाहेब म्हणाले, “ माझं शिक्षण झालं, व्यवसायातही बऱ्यापैकी जम बसला होता, तेव्हा महादेवराव दामले मला म्हणाले, “ अरे आप्पा, आता तुझ्या लग्नाचं बघायला हवं.” तेव्हा मी त्यांना हळूच सांगितलं की, मला अनाथाश्रमात वाढलेल्या, एखाद्या चांगल्या मुलीशी लग्न करायला आवडेल. ती ही माझ्यासारखीच असेल. त्यामुळे ती मला समजून घेऊ शकेल.

मग आम्ही तुमच्या आश्रमात आलो. आश्रम चालकांनी दोन-तीन मुलींचे फोटो दाखवले; माहितीही सांगितली. तुझा फोटो आवडला व माहिती आम्हाला योग्य वाटली; म्हणून तुला बोलावलं, त्यांनी तुला आमची जुजबी माहिती सांगितली आणि या मुलाशी लग्न करायला तुला काही हरकत नाही ना? असं तुला विचारलं. तू माझी हरकत नाही, अशा अर्थांनी मान हलवलीस आणि आपलं लग्न ठरलं. फारसा गाजावाजा न करता, ते झालंही. तू गृहलक्ष्मी म्हणून माझ्या जीवनात आलीस.  आमची निवड

अगदी योग्य ठरली. गेल्या पस्तीस चाळीस वर्षात मला कधीसुद्धा पश्चात्तापाची वेळ आली नाही. तुला काय वाटलं? तू सुखात आहेस ना?

आजवर ललिताबाईंनी असा विचारच कधी केला नव्हता. त्यांना वाटायचं, अनाथ आश्रमात वाढलेल्या आपण, आज आपल्याला आप्पासाहेबांसारखा समंजस, भरभक्कम आधार लाभला आहे. किती भाग्यवान आहोत आपण. लग्नानंतर अनाथाश्रम सुटला तो कायमचाच. कारण लग्नानंतर त्या दुसऱ्या गावात राहायला आल्या. पण अप्पासाहेब मात्र त्या आश्रमाशी संबंध ठेवून होते. अधून मधून आश्रमाला मदतही करत होते. आप्पासाहेबांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. त्यामुळे ललिताबाईंना संसारात कशाचीही उणीव भासली नव्हती. सोन्यासारखी दोन जुळी मुलं होती. मोहन आणि मुक्ता. दोघंही हुशार होती. अप्पासाहेबांना समाजात मान होता. आप्पासाहेब समजूतदार होते. घरातली सर्व जबाबदारी ललिताबाई सांभाळत असत. त्याबाबतीत त्यांना पूर्ण स्वातंत्र्य होतं.

पण त्या स्वातंत्र्याचा ललिता बाईंनी कधी गैरफायदा तर सोडाच, पण फायदा सुद्धा घेतला नव्हता. कारण त्यांच्या मनाची जडणघडणच तशी झाली होती. आपण अनाथाश्रमात वाढलो, ही

गोष्ट त्या कधीही ही विसरल्या नव्हत्या. अप्पासाहेबांच्या घरातल्या लोकांनी त्यांना अगदी मानाने वागवलं होतं. तरीही त्या कधी आपला भूतकाळ विसरू शकल्या नव्हत्या. त्यांच्या आई-वडिलांची अंधुकशी आठवण अजूनही त्यांच्या मनात घर करून राहिली होती. घरी शंभर टक्के दारिद्र्य, उपासमार तर नेहमीचीच. त्यांना एक भाऊ सुद्धा होता. पण पुढे त्याचं काय झालं, ते त्यांना कधी माहितीच झालं नाही. सुरुवातीला तर आप्पा साहेबांबद्दल, उपकारकर्त्याची भावना त्यांच्या मनात होती. आप्पासाहेबांनी त्यांना अनेकदा समजावून सांगितलं होतं; की " ललिते, तुझ्या मनातला हा गंड काढून टाक. मी काही तुझ्यावर उपकार केले नाहीत. मला तु आवडलीस म्हणूनच मी तुझ्याशी लग्न केलं आहे. तू तुझा भूतकाळ मागे टाक. त्या गोष्टी विसरता येणं अशक्य आहे, हे मला समजतं. तरीही तू तसा प्रयत्न कर.

पण ललिता बाईंना मात्र ही गोष्ट फारशी जमली नव्हती. त्यामुळे श्रीमंती व स्वातंत्र्य यामुळे येणारा स्वच्छंदीपणा आणि वागण्यातली मनमानी त्यांच्या स्वभावात आली नव्हती. त्या खरोखरंच आनंदानी आपल्याला मिळालेल्या या सुवर्णसंधीचा विचार करत, मनोमन संसारात रमून गेल्या होत्या. आज प्रथमच त्यांनी, आपण खरोखरीच सुखात आहोत का? या गोष्टीचा विचार

केला; आणि त्यांच्या मनानी त्या सुखात असल्याची ग्वाही दिली. आपल्याच विचारात त्या दंग झाल्या होत्या.

“ ललिते, अगं कुठे हरवलीस? मी तुला काहीतरी विचारलंय, ” असं जेव्हा आप्पासाहेब म्हणाले, तेव्हा त्या भानावर आल्या. स्वतःशीच हसल्या आणि म्हणाल्या, “ मी अगदी सुखात आहे हो. तुम्ही माझी केवढी काळजी घेता, मी खरंच भाग्यवान आहे.”

“ मग, या मुलाला मी घरात का ठेवून घेतो आहे? हे लक्षात आलाय नं तुझ्या? ” आप्पासाहेब.

ललिताबाई मग म्हणाल्या, “ मघाशी मी अगदी चुकीचा विचार करत होते, हे माझ्या लक्षात आलं आहे. ठेवून घेऊ या, आपण त्या मुलाला. त्याच्यावर माया करू. त्याच्यावर चांगले संस्कार करू. मी देईन तुम्हाला साथ.” आप्पासाहेब समाधानाने हसले. त्यांनी हीच अपेक्षा केली होती ललिताबाईंकडून.

ललिताबाई अजूनही मघाच्या विचारातून बाहेर पडल्या नव्हत्या. त्यांनी आप्पासाहेबांना विचारलं,

“ पण, मोठ्या दामल्यांना मूल-बाळ नव्हतं का? ”

“ त्या कनवाळू माणसाचं नाव महादेव होतं. त्यांच्या पत्नी, सुधाबाई, माझ्या आईच जणु , त्यांना दोन मुलंसुद्धा होती. मुलाचं

नाव अमेय आणि मुलीचं अमिता. दोघंही शहाणी सुरती, सुशिक्षित.”

आता तर ललिताबाई अधिकच प्रश्नात पडल्या. “ दोन मुलं होती? मग आता ती कुठे आहेत? आणि स्वतःचा  वारसदार असतांना त्यांनी आपली इस्टेट तुम्हाला का दिली? ”

“ अगं, थांब थांब. किती प्रश्न विचारशील एकदम. मी सांगतो नं तुला सगळं. त्यांची दोन्ही मुलं चांगली शिकली.  पुढचं शिकायला अमेरिकेला गेली, ती तिथेच स्थायिक झाली. त्यांनी आप्पा साहेबांना सुचवलं की, आम्ही राहणार तिकडे दूर अमेरिकेत. तुमची काळजी घेणार आप्पा. तुमचं सगळं करणार आप्पा. मग त्यालाच तुम्ही आपल्या राहत्या घराची मालकी देऊन टाका. म्हणजे तो घरातून बाहेर जायचा नाही. तुम्हालाही कायमची सोबत मिळेल. आम्हाला तुमची काळजी उरणार नाही. महादेवरावांनाही हा विचार पटला. त्यांनी मग तसंच करायचं ठरवलं आणि ते पारही पाडलं. अशा रीतीने मी या घराचा मालक बनलो.”

“ अरेच्या, त्यांची मुलं त्यांना भेटायलाही आली नाहीत का कधी? ”

“ सुरुवातीला यायची वर्ष दोन वर्षांनी. महादेवरावही, पत्नीसमवेत दोन-तीनदा जाऊन आले. पण त्यांना तिथे एखाद्या महिन्यानंतर कंटाळा यायचा. मग ते भारतात परतायचे. त्यांचा मृत्यू किती अचानक झाला, हे तुला माहितच आहे. मी अमितला कळवल्यावर तो म्हणाला, -- “ आता काही बाबा मला भेटायचे नाहीत. नाहीतरी त्यांनी देहदान केलेलं आहे. तेव्हा काही श्राद्ध पक्ष करण्याचा प्रश्न नाही. मग आता आम्ही येऊन काय करू? त्यांच्या मृत्यूचं वाईट तर वाटतंच आहे. पण तिथे येऊन काही ते कमी होणार नाही. तेव्हा त्यांचं सगळं काय करावं लागेल, ते तूच कर. नाहीतरी आमच्यापेक्षा तूच त्यांची सेवा केली आहेस. आम्हाला दुःखात समाधान एवढच आहे की ते सगळं आयुष्य स्वतःच्या घरात सुखासमाधानाने जगले. तू ही त्यांच्याकडे दुर्लक्ष न करता त्यांची मनोभावे सेवा केलीस. ”

“ आणि सुधाबाई कुठे होत्या? मी तर त्यांना पाहीलंच नाही.” ललिताबाईंनी विचारलं.

“ आपलं लग्न व्हायच्या आधीच त्या अचानक गेल्या. त्यांचं हृदय कमजोर झालं होतं. एक दिवस त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचा अंत झाला. तेव्हा मात्र अमेय व अमिता आले होते. पण तेव्हा आपलं लग्न ठरलं सुद्धा नव्हतं. मग

तुला त्या कधी पाहायला मिळणार? आपल्या खोलीत दोघांचेही फोटो तू पाहिले असशीलच. सुधाबाईंच्या मृत्यूनंतर ते एकदाच मुलांकडे जाऊन आले. त्यानंतर आपलं लग्न झालं. नंतर एक-दीड वर्षातच त्यांचा मृत्यू झाला; हे तुला आठवत असेलच.” आप्पासाहेब म्हणाले.

महादेवरावांचा मृत्यु, त्यानंतर आप्पासाहेबांची झालेली केविलवाणी अवस्था, सगळं त्यांना नीट आठवत होतं. त्यांच्या लग्नानंतर वर्षातच महादेवरावांचे देहावसान झाले. त्यावेळी अमित आणि अमिता भारतात आलीच नव्हती. त्यामुळे ललिताला त्यांना बघण्याचा योग आला नव्हता. आज या सगळ्या गोष्टींचा उलगडा झाला. त्यांना वाटलं आता कधीतरी महादेवरावांची मुलं घरावर हक्क सांगायला आली, तर काय होईल? मग त्यांनाच त्यांच्या विचारांची लाज वाटली. आपण या देव माणसांबद्दल उगाचच वेडेवाकडे विचार करतो आहोत, ही गोष्ट त्यांच्या लक्षात आली; आणि त्यांना ओशाळं वाटलं.

आप्पासाहेबांकडून सगळं ऐकल्यावर, ललिताबाई आश्चर्याने दिग्मूढ झाल्या होत्या. पण शांत समंजस वृत्ती हाच त्यांचा स्थायीभाव होता. म्हणून त्या आत कामाला निघून गेल्या. आत सर्व कामाला नोकर चाकर होतेच. पण सर्व कामं त्यांच्यावरच

टाकून न देता, त्या स्वतः त्यांच्या बरोबरीने काम करीत. त्यामुळे आपोआपच नोकराचाकरांवर त्यांचा वचक राही. कामही पद्धतशीरपणे होत असे.

त्यांचं एवढं बोलणं होत आहे तोवर विठ्ठल अशोकला घेऊन आला सुद्धा. त्यांनी विठ्ठलला पैसे दिले. तो आणि अशोक दुकानात गेले. अर्ध्या तासात ते परतही आले. अशोकची आंघोळ झाली. तो नवे कपडे घालून आप्पासाहेबांसमोर येऊन उभा राहीला. आप्पासाहेब त्याला म्हणाले, " इथे राहायचं असेल, तर दररोज शाळेत जावं लागेल. जाशील ना? " अशोक ने मान डोलावली. मग आप्पासाहेब थांबले नाहीत. त्यांनी लगेच फोन हातात घेतला. एका प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना त्यांनी फोन लावला. त्यांना अशोकबद्दल सर्व गोष्टी सांगितल्या. तो वयानी मोठा आहे, तो अजिबात शाळेत गेलेला ही नाही, हे देखील सांगितलं; आणि आपण त्याचा अभ्यास करून घेण्याची व त्याला वर्गाबरोबर आणण्याची जबाबदारी घेऊ असं सांगितलं. तरी कृपा करून आपण त्याला शाळेत पहिलीत प्रवेश द्यावा, अशी विनंती केली.

मुख्याध्यापकांना अप्पासाहेबांच्या शब्दाचा अनादर करणं शक्यच नव्हतं. शाळेच्या व्यवस्थापकीय समितीचे आप्पासाहेब अध्यक्ष होते. तरीही त्यांनी आपल्या पदाचा वापर न करता,

मुख्याध्यापकांना विनंती केली होती. मुख्याध्यापकांनी त्यांची विनंती मान्य केली. अशोकला त्यांनी पहिलीच्या वर्गात प्रवेश दिला. अशोकच्या शाळेची सोय झाली. शाळा अकरा वाजता भरत असे. आप्पासाहेबांनी विठ्ठलाला लगेच त्याच्या जेवणाची सोय करायला सांगितलं.

जेवण झाल्याबरोबर त्याला शाळेत घेऊन जायला सांगितलं. एक पाटी-पेन्सिल देऊन त्याच्या दप्तराची सोय केली. मधल्या सुट्टीत खायला डबा दिला. अशोकला समजेना, की आत्ता तर जेवण झालं. आता पुन्हा डबा कशाला? पण तो काय बोलणार? गप्प बसला बिचारा. पुढे विठ्ठलला त्यांनी सांगितलं, की तू येताना, मास्तरांकडे जाऊन, पहिलीच्या वह्या पुस्तकांची यादी घेऊन ये. अशोकचं जेवण झाल्यावर विठ्ठल त्याला शाळेत घेऊन गेला. मास्तरांनी त्याला पहिलीच्या वर्गात बसवला. खरं तर आज शाळेत जाण्याचाही काही उपयोग नव्हता. कारण त्याला लिहायला - वाचायला काही येतच नव्हतं. पण घरात तो रिकामाच बसून राहील, त्या पेक्षा शाळेत गेलेला बरा, म्हणून त्याला शाळेत पाठवलं होतं. अशोकच्या सर्व गोष्टींची सोय करून, ते कोर्टात गेले. तिथे त्याची एक महत्त्वाची केस होती. बाकी काही विचार करायला, त्यांना वेळच नव्हता.

परंतु संध्याकाळी कोर्टातून आल्यावर, प्रथम त्यांना अशोकचीच आठवण आली. पण आता त्यांना अशोकची काळजी नव्हती. ललिता बाईंच्या स्वभावानुसार त्यांनी अशोकच्या खाण्यापिण्याची काळजी घेतली असेल, याची त्यांना खात्री होती. राहता राहिला प्रश्न त्यांचा मुलगा विवेक व सून विद्या आणि त्यांची दोन मुलं मोहन आणि मुक्ता या जुळया भावंडांचा. आप्पासाहेबांसमोर काही बोलायची, त्यांना विरोध करायची, विवेक शिवाय कोणाचीही प्राज्ञा नव्हती. काल विवेकलाही काही बोलायची संधीच मिळाली नव्हती. आप्पासाहेबांनी जे काही ठरवलं असेल ते ते करणारच; याची विवेकला खात्री होती. पण तरीही आपण अशोकबाबत त्यांच्याशी बोलायलाच हवं आहे असं त्याला वाटत होतं. कारण प्रश्न त्याचा किंवा विद्याचा नव्हता. प्रश्न होता तो त्यांच्या मुलांचा. या रस्त्यावरच्या मुलामुळे जर त्याच्या मुलांना वाईट सवयी लागल्या असत्या तर काय? असा तो प्रश्न होता. या मुलाला घरात ठेवून घेतल्यास, आपल्या मुलांना काय वाटेल, त्यांच्यावर त्याचा काय परिणाम होईल? याची विद्याला काळजी वाटत होती. तिची हळूहळू कुरकूरही चालू होती. पण विवेकने हा गुंता शांतपणानी सोडवायचा असं ठरवलं होतं. घरातली शांतता ढळू नये, याची त्याला काळजी होती; आणि त्या शांततेचं महत्त्वही त्याला ठाऊक होतं.

संध्याकाळचे सहा वाजले असतील. सगळीजणं आपापले उद्योग आटोपून घरी आली होती. सगळ्यांचं चहा=पाणी, खाणी - पिणी झाली. कोणी बोललं नाही तरी प्रत्येकाच्या मनात आज अशोकचेच विचार होते. बाबा कशाला हे लोढणं गळ्यात बांधून घेत आहेत, असं विवेकला वाटत होतं. विद्या तर फारच नाराज होती. तिला काही पसंत नसलं, की तिच्या कपाळावर आठी उमटत असे. आज सकाळपासून ती आठी जिथल्या तिथे होती आणि विद्या गप्प गप्प!

मुलांना मात्र अशोक बाबत उत्सुकता होती. आपल्याला खेळायला एक खेळगडी मिळाला, याचंच त्यांना अप्रूप वाटत होतं. संध्याकाळचं खाणं झाल्याबरोबर त्यांनी अशोकला आपल्यात खेळायला बोलावलं होतं. तिघंही अंगणात गुण्यागोविंदानं खेळत होती. त्यांचा खेळ अगदी रंगात आला होता. अशोकला नीट खेळायला येत नव्हतं, पण मोहन आणि मुक्ता त्याला सांभाळून घेत होते.

आत्ता कुठे संध्याकाळचे सहा, साडेसहा वाजले होते. अजून रात्र पडायची होती. फार रात्री विषय नको, म्हणून विवेक बाबांच्या समोर येऊन बसला आणि म्हणाला, “ बाबा, मला जरा तुमच्याशी बोलायचं आहे. अर्थात विवेकला काय बोलायचं असणार, याची

आप्पासाहेबांना चांगलीच कल्पना होती. पण बापलेकांचे संबंध चांगले होते. संबंधात मोकळेपणा होता. एकमेकांना समजून घेण्याची सवय होती. दुसऱ्याचं  मन दुखावलं जाऊ नये, याची काळजी होती. आप्पासाहेब म्हणाले, “ बोला, तुम्हाला काय बोलायचे आहे ते.”

विवेक म्हणायला, “ बाबा, घर तुमचंच आहे. मला बोलायचा अधिकार आहे की नाही, हे मला माहित नाही; तरीही मी बोलतो आहे. बाबा तुमचं वय आता साठीच्या पुढे गेलं! या वयात तुम्ही कशाला ही नवीन जबाबदारी अंगावर घेत आहात? आम्हा बाकी कुटुंबीयांना ही गोष्ट आवडेल की नाही? रुचेल की नाही? याचा विचार तुम्ही केला आहे का? मी तुम्हाला विरोधाकरता विरोध करत नाहीये. पण आता या वयात ही नवीन जबाबदारी कशाला घ्यायची असं मला मनापासून वाटतं आहे.” विवेकने सगळं एका दमात बोलून टाकलं.

आप्पासाहेब म्हणाले, “ विवेक, ही जबाबदारी मी एकट्याने घेतलेली नाही. त्यात तुम्हा सर्वांचा सहभाग अपेक्षित आहे. तुझ्या मुलांनी तर या गोष्टीला मान्यता दिलेलीच आहे. बघ, त्यांचा खेळ किती रंगला आहे. ललिता माझ्या शब्दाबाहेर नाही. राहता राहिला प्रश्न, तुझा आणि विद्याचा. हे बघ, तुमच्या सहकार्याशिवाय मी ही

जबाबदारी पार पाडू शकणार नाही, हे मला माहित आहे. पण तुमचं सहकार्य मी गृहीत धरलं आहे. आपलं घर मोठं आहे. पैसा - अडकाही कमी नाही. एखाद्याचं जर भलं होत असलं, तर ती जबाबदारी आपण घ्यायला पाहिजे. ते आपलं सामाजिक कर्तव्यं आहे, असं मला वाटतं. म्हणून मी अशोकला इथे ठेवून घेण्याचा विचार केला.”

“ पण बाबा ” -----असं म्हणत विवेकनी बोलायला सुरुवात केली. पण आप्पासाहेबांनी त्याला बोलू दिलं नाही. ते म्हणाले, “ माझं बोलणं संपलं नाही अजून. नुसती जागा आहे, पैसा आहे, म्हणून त्याला इथे ठेवून घ्यायचं, असं नाहीये. आपण सर्वजण सुस्वभावी आहोत. सुसंस्कृत आहोत. अशोक आपल्या घरी राहिला, तर आपण त्याच्यावर चांगले संस्कार करू शकू. तो जे काय शिकेल, ते त्याला शिकवून, आपण त्याला आत्मनिर्भर बनवू शकू. हा सगळा विचार करून मी त्याला आपल्याजवळ ठेऊन घ्यायचं ठरवलं आहे. ”

ते पुढे म्हणाले, “ जर त्याला, रिमांड होम मध्ये टाकलं, तर तिथल्या मुलांची अवस्था मी वकील म्हणून मला, व मी तुम्हाला सांगतो, म्हणून तुम्हालाही ठाऊक आहे. आज जर त्याला खायला घालून सोडून दिलं, तर सध्या तो पुनःपुन्हा अन्नाची चोरी करेल.

काय सांगावं, पुढे तो तर चोऱ्याही करायला लागेल. कारण जसजसा तो मोठा होईल, तसतशा त्याच्या गरजाही वाढतील. कदाचित तो अट्टल चोर बनेल, किंवा भीक मागून जगायला शिकेल. एखादा समाजकंटकच बनेल. ही गोष्ट मला टाळायची आहे. मला त्याला एक संधी द्यायची आहे.

“ बाबा, तुम्ही म्हणता ते खरं आहे हो. पण त्याच्यासाठी वेळ कोण देणार? आपण सगळे तर आपापल्या व्यापात व्यग्र असतो. मग त्याच्यासाठी वेळ कोण देणार? ” विद्या म्हणाली.

“ आप्पासाहेब म्हणाले, “तुझं म्हणणं खरं आहे. पण ललिताला भरपूर वेळ आहे त्याच्यासाठी. मी सुरुवातीला तिच्यावरच अशोकची जास्तीत जास्त जबाबदारी टाकणार आहे. पण भविष्यात तुलाच त्याची जबाबदारी घ्यावी लागणार आहे. तू माझा शब्द डावलणार नाहीस याची मला खात्री आहे.”

आप्पासाहेबांनी आपल्याला इतकं गृहीत धरावं, याचा जरा रागच आला विद्याला. म्हणून ती त्यांना म्हणाली, “ पण बाबा, इतका मोठा निर्णय घेतांना तुम्ही आम्हाला विचारायला हवं होतं नं? ”

“ विद्या तुझा प्रश्न अगदी बरोबर आहे; मी विचारायला हवं होतं तुम्हाला. पण काही वेळा अशा असतात, की त्या क्षणी

विचारांच्या आवर्तात, तुमच्याकडून भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेतले जातात. तसंच काहीसं आज झालं. तत्क्षणी दुसरा कुठलाही विचार माझ्या मनात आला नाही. नंतर मला वाटलं, की आपण केलं ते चूक की बरोबर? पण तेव्हा वेळ निघून गेली होती. नंतर या गोष्टीवर मी खूप विचार केला; आणि तुमच्या सर्वांच्या सहकार्याशिवाय मी ही गोष्ट करू शकणार नाही, हे माझ्या लक्षात आलं. मग मी तेच करायचं ठरवलं. तुम्हा सर्वांचं सहाय्य मागायचं. त्या करता आज विवेक बोलला नसता, तरीही मी तुमच्याशी बोलणारच होतो." आता ही चर्चा संपली आहे, हे विद्याने ओळखलं, व ती तिथून निघून घरात गेली.

दुसऱ्या दिवसापासून रोजच अशोक डबा व पाटी दप्तर घेऊन शाळेत जायला लागला. पोटभर जेवण होऊन सुद्धा, वर खाण्याचा भरलेला डबा आपल्या हातात आहे, याचंच त्याला अप्रूप वाटत असे. शाळेत जाऊन घरी परत येण्याआधी तो डबा खायचा. आपल्याला आता उपाशी राहावं लागणार नाही, याचाच त्याला आनंद होत होता. शाळेत जाऊन आपण शिकणार, पण काय शिकणार? शिकणार म्हणजे काय करणार? हे काहीच त्याला ठाऊक नव्हतं. पण नेहमीसारखं उपाशी पोटी, अन्न शोधत भिरीभिरी हिंडण्यापेक्षा, हे शाळेत जाणं, जरी आवडलं नाही, तरी बरंच सुसह्य होतं. शिवाय त्याकरता कितीतरी नवे कपडे मिळाले

होते. आता दिवस संपला तरी कुठे झोपायचं ही भ्रांत नव्हती. सध्यातरी विठ्ठलच्या खोलीत त्याच्यासाठी मऊमऊ गादी आली होती. या सगळया मिळकतीमुळे अशोक खुशीनी शाळेत जायला लागला. अशोक शाळेत आला. त्याच्या वर्गातली मुलं दंगा करत होती. आणि अकरा ते पाच एवढ्या सर्व वेळ, एकाच जागी बसायचं, या कल्पनेनीच अशोक हैराण झाला होता. त्याला फक्त जवळच्या डब्याचा आधार वाटत होता.

गुरुजी वर्गात आले. शाळा भरण्याआधीच मुख्याध्यापकांनी त्यांना बोलावलं होतं; आणि या नवीन मुलाच्या प्रवेशाबद्दल सांगितलं होतं. त्याला काहीच येत नाही याची कल्पनाही त्यांनी दिली होती. त्याला अक्षर ओळख करून देऊन, वर्षाअखेरपर्यंत इतर मुलांच्या बरोबरीत आणण्याची जबाबदारीही त्यांच्यावर टाकली होती. त्यामुळे ते नाराज होते. हे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं. परंतु मनातली ही नाराजी मुख्याध्यापकांच्या समोर व्यक्त करण्याचा धीर त्यांना झाला नव्हता. नाही म्हणता आलं नाही, केवळ म्हणूनच त्यांनी सरांसमोर होकार भरला होता.

गुरुजींच्या नजरेने केव्हाच हा नवीन मुलगा हेरला होता. पाच-सहा वर्षाच्या पहिलीतल्या मुलांपेक्षा तो चांगलाच थोराड दिसत होता. पण त्यांनी त्याच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केलं. शेवटी कंटाळून

अशोक खाली बसला. गुरुजींच्या मनात आलं, या मुलाला काहीच येत नसतांना, यांनी शाळेत प्रवेश दिला; आणि आता त्याला सर्वांत बरोबर आणण्याची जबाबदारी मात्र माझी एकट्याची.

गोष्ट अशी होती, की आप्पासाहेबांचा शब्द डावलणं, मुख्याध्यापकांना शक्य झालं नव्हतं. केवळ म्हणूनच त्याला शाळेत प्रवेश मिळाला होता. एरवी इतक्या उशिरा शाळेत प्रवेशाकरता येणाऱ्या मुलांना, परीक्षा देऊन, चांगल्या गुणांनी पास झाल्यासच प्रवेश मिळत असे. आणि आता हा अनपढ मुलगा. माझ्यावर त्याला शिकवण्याची जबाबदारी, इतके सगळे विचार, क्षणार्धात गुरुजींच्या मनात येऊन गेले. जरा नाराजीनेच त्यांनी अशोकला त्याचं नाव विचारलं. अशोकनी बसूनच उत्तर दिलं. ते खेकसलेच त्याच्यावर. " ए मुर्खा, उठून उभा राहून उत्तर द्यावं, ही अक्कल नाही का रे तुला. उठ उभा रहा. पुन्हा सांग तुझं नाव." अशोक उभा राहिला. " अशोक " तो म्हणाला. आता सरांचा पारा चढलाच. ते ओरडले, " अरे पूर्ण नाव सांग ना." अशोक गोंधळला. पूर्ण नाव म्हणजे काय, हे त्याला ठाऊकच नव्हतं. तो पुन्हा

" अशोक " असंच म्हणाला. " अरे, नुसता अशोक - अशोक, असं काय सांगतोस, तुझ्या वडिलांचं नाव सांग. तुझ्या आडनाव तरी सांग. " गुरुजी म्हणाले.

“ मला माहित नाही.” अशोक उत्तरला.

वा! या रस्त्यावरच्या आई - बाप - आडनाव नसलेल्या मुलाला, आप्पासाहेबांनी शाळेत आणून बसवलेला दिसतो आहे. मोठेपणा मिळणार त्यांना; आणि कष्ट मात्र मी करायचे. हा कुठला न्याय? गुरुजींच्या नाराजीत भरच पडली. त्याला काहीच येत नसणार, याची कल्पना असून सुद्धा, त्याची टर उडवण्याकरता, ते म्हणाले,

“ चला, शाळेत तर आला आहेस, मग तुला काय काय येतं, ते सांग.” शाळेत काय काय येणं अपेक्षित असतं, हेच अशोकला माहित नव्हतं. शिवाय येत तर काहीच नव्हतं. तो काय बोलणार! बाकी त्याला खूप गोष्टी येत होत्या. झाडावर चढता येत होतं, कंचे गोट्या खेळण्यात त्याचा हात कोणी धरू शकलं नसतं. दुकानातून खाद्यपदार्थ पळवण्यात तो अगदी माहीर होता. आता उगाच कोणाच्या तरी मांडवात तो भुकेपोटी शिरला आणि चोरी करतानाच सापडला. पण या अपराधाकरता त्याला काहीच शिक्षा मिळाली नाही उलट पोटभर खायला मिळालं. कोणीही त्याला हाड हाड करून उठवलं नाही. पुढे झोपायलाही जागा, अंथरूण-पांघरूण, मिळालं होतं. उठल्यावर चहा मिळाला होता. आणि पोटभर जेवल्यावर सुद्धा हातात अन्नानी भरलेल्या डबा होता.

शिवाय नवे कपडे मिळाले होते. आंघोळ करायला मिळाली होती, ते वेगळंच. आपलं नशीबच फळफळलं आहे असं त्याला वाटत होतं. आता यातलं गुरुजींना काय काय सांगायचं, हे न कळल्यामुळे तो बावचळून तसाच उभा राहिला.

“ शंख आहात तुम्ही! बसा आता खाली.” गुरुजी त्याची अवहेलना करीत म्हणाले. सगळी मुलं हसली. अशोक ओशाळला आणि इकडे तिकडे पाहू लागला. गुरुजींचं बोलणं त्याने ऐकलंच नाही.

“ खाली बस, म्हटलेलं ऐकू आलं नाही का रे मुर्खा! बस खाली. कुठली ब्याद वर्गात आणून बसवली आहे, देवच जाणे.” असं म्हणून मनातल्या नाराजीला गुरुजींनी मूर्तरूप दिलं. ते आपल्याबद्दलच रागावून बोलत आहेत, हे लक्षात आल्यामुळे, अशोक खाली बसला नाही. “ अरे, मी तुलाच खाली बसायला सांगतो आहे, एवढंही कळत नाही. बस खाली. मूर्ख कुठला.” गुरुजी ओरडले. वर्गातली मुलं पुन्हा एकदा उपहासाने हसली. अशोकच्या ते लक्षात आलं. तो वरमला आणि खाली बसला. वर्गातून धांवत बाहेर पळून जावं, असं त्याला मनातून वाटत होतं, पण गुरुजींच्या भीतीने तो खाली मान घालून बसून राहिला.

मुख्याध्यापकांवर सूड घेण्याकरता म्हणून तरी आज त्याला काही शिकवायचंच नाही असं गुरुजींनी ठरवलं आणि ते इतर मुलांना शिकवू लागले. वर्गात काय चाललंय, हे अशोकला समजतच नव्हतं. सरांचे शब्द त्याच्या कानांवर पडत होते इतकंच. त्याचं मन दुसऱ्याच विचारात गढलं होतं. “ अरे बापरे, शाळेत हे असं चालतं का? मग नकोच ती शाळा. आपल्यासाठी आपला रस्ताच बरा. आज आपण निघून जायचं त्या घरातून. बाहेर रोज नाही पण कधी कधी खायला मिळेलच. पण केवळ खायला मिळतं म्हणून तिथे राहायचं नाही. कारण मग ही शाळेची कटकट मागे लागेल. असल्या विचारात तो गर्क होता. गुरुजींनी त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं होतं. त्यामुळे त्याला दप्तर सुद्धा उघडावं लागलं नव्हतं.

मधल्या सुट्टीत सगळी मुलं डबा खायला बसली. पण कोणी त्याला आपल्यात घेतलं नाही. डबा न उघडता तो तसाच बसून राहिला. एवढ्यात त्याच्या नावाचा जप करीत, मोहन आणि मुक्ता त्याच्याजवळ आली आणि त्याला डबा खायला, आपल्याबरोबर घेऊन गेली. तिघांनी मिळून आनंदानी डबा खाल्ला. अशोकला जरा बरं वाटलं. डबा खाऊन झाला, बाटलीतले पाणी ही तो प्याला. तोवर सुट्टी संपल्याची घंटा झाली. “ जा रे आपल्या वर्गात.” असं त्याला म्हणत, मोहन मुक्ता आपल्या वर्गाकडे पळाली.

तो पुन्हा वर्गात जाऊन बसला. पण गुरुजींनी त्याची अजिबात दखल घेतली नाही. तो ही खाली मान घालून बसून राहिला. त्याने दिवसभरात वर्गात काहीच केलं नव्हतं, त्यामुळे नुसतं बसून बसून, तो फार कंटाळला होता. थोड्या वेळाने शाळा सुटल्याची घंटा झाली. गुरुजी वर्गातून निघून गेले. सगळी मुलही दंगा करीत, वर्गातून बाहेर पडली. सर्वात शेवटी तो बाहेर आला. मोहन मुक्ता त्याची वाट बघत, बाहेर थांबलेलीच होती. त्यांना हा नवा खेळगडी फारच भावला होता. त्याची खेळण्यातली चमक पाहून, ते अगदी भारावून गेले होते. अशोक अगदी ग्रेट मुलगा आहे, असं त्यांना वाटत होतं.

तिघं रमत-गमत घरी आली. घरी आल्यावर त्याला चहा तर मिळालाच पण पुन्हा एकदा थोडं खायला मिळालं. मग मात्र त्या घरातून निघून जाण्याचा त्याचा बेत ढेपाळला. इतकं खायला-प्यायला जर मिळणार असेल, तर शाळेतला कंटाळा सहन करणं, काही अवघड नाही, असं आता त्याला वाटायला लागलं. तसा विचार करतच, तो मोहन मुक्ता बरोबर अंगणात खेळायला गेला.

संध्याकाळी मुलं परवचा म्हणायला बसली. हे काय चाललं आहे, हे समजून तो नुसताच अवघडून उभा राहिला. एवढ्यात विठ्ठल आला आणि त्याला आप्पासाहेबांकडे घेऊन गेला. ते

म्हणाले, “ अशोक, काय शिकलास आज शाळेत? ” अशोकनी शाळेत. काहीच केलं नव्हतं. फक्त डबा खाल्ला होता. तो काय उत्तर देणार? काही उत्तर देता येत नसलं, की खाली मान घालून उभं रहायचं, एवढं मात्र त्याला कालपासून कळलं होतं. तो काहीच बोलला नाही, म्हणून आप्पासाहेब त्याला म्हणाले, ” मला पाटी दाखव बघू तुझी. “ त्याने पाटी काढून दाखवली. शाळेत त्याने दप्तरातून पाटी पुस्तकं बाहेर सुद्धा काढली नव्हती; काय असणार पाटीवर?

त्यानी पाटी काढून, अप्पासाहेबांच्या जवळ दिली. पाटीवर लिहिल्या - पुसल्याच्या काही खुणा नव्हत्या. पाटी कोरी होती. आप्पासाहेब काय समजायचं ते समजले. त्यांनी त्याला जवळ बोलावलं. त्याची पाठ थोपटली. ते अशोकला म्हणाले, “ जा जेवण करून, झोप आता.” आता पुन्हा जेवायचं? बाप रे! दिवसभरात खायचं तरी कितीदा? असं अशोकला वाटलं.

प्रत्यक्षात तो त्यांना म्हणाला, “ मला उद्यापासून शाळेत जायचं नाही. मी इथेच कामं करीन.” खरंतर त्याला काहीच करायचं नव्हतं. या सगळ्यापासून दूर पळून जायचं होतं. पण केवळ पोटभर खाण्याच्या आशेनी, पळून जाण्याचा विचार, त्यानी सोडून दिला होता. पण स्वतःवर होणारा, शाळेत जाण्याचा अन्याय तो सहन

करणार नव्हता. आप्पासाहेब स्वत:शीच हसले. ते रागावले नाहीत, याचं त्याला आश्चर्यही वाटलं आणि बरंही वाटलं. ते म्हणाले, “ ते उद्याचं उद्या पाहू. आता तू पळ जा जेवायला.” आता तिथून निघून जाण्यावाचून पर्याय उरला नाही. तो पुन्हा मोहन मुक्ता जवळ जाऊन बसला.

अशोकची कोरी पाटी पाहून, काय समजायचं ते आप्पासाहेबांना समजलं होतं. पण रागावून किंवा आततायीपणा करून चालणार नव्हतं. त्यांनी सकाळी अशोकच्या वर्गशिक्षकांना घरी बोलावलं. अशोकचे गुरुजी भीतभीतच आले. त्यांना वाटलं, आता भरली आपली शंभरी. आता आपल्याला आप्पासाहेबांच्या रागाला तोंड द्यावं लागणार. पण तसं काहीच झालं नाही. आपलं काम रागावून होणार नाही, याची समज आप्पासाहेबांना होती.

ते कालच्या दिवसाबद्दल काहीच बोलले नाहीत. उलट ते समजुतीच्या स्वरात म्हणाले, “ मास्तर, अशोकला शिकवणं, त्याला अक्षर ओळख करून देणं, खरंच अवघड आहे. पण शिकवायला तर हवंच. त्याला मी तुमच्या हाती सोपवतो आहे. त्याचं नाव मी शाळेत घातलं आहे, ते समाजात आणखी एक समाजकंटक, गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून. याच कारणाकरता मी त्याला घरात आश्रय दिला आहे.

अशोक स्वतःच एक कोरी पाटी आहे. तो चोरी करतो, ती अन्नाची. पोटातली भूक त्याला चोरी करायला भाग पाडते. कारण पोटाची भूक भागवण्यासाठी त्याच्याजवळ काहीही साधन नाही. मी अशा मुलाला चोर म्हणत नाही. पोटातली भूक म्हणजे काय? हे तुम्हाला आणि मला चांगलंच ठाऊक आहे. तेव्हा तो उनाड चोर आहे, असं समजून त्याच्याशी वाईट वागू नका. त्याच्या वर्तनात चांगली सुधारणा दिसल्यास, मी त्याला आमचं नाव देणार आहे. आत्ता मी त्याला चांगला नागरिक बनण्याची संधी देतो आहे, असं का समजेनात.

तुम्ही त्याला शाळेत शिकवाच. पण इथे घरीही  शिकवायला या. त्याबद्दल मी तुम्हाला महिन्याला रु.५००/- देईन. तो चांगलं शिकला तर आपल्या दोघांनाही समाधान मिळेल. त्याच्या इयत्तेबरोबर तुमची फीही  वाढवत जाईन. मास्तर मनाशी खजील झाले. आपण अशोकशी जे वागलो, ते चुकलं; हे त्यांच्या लक्षात आलं. आपण अशोकशी योग्य वर्तन केलं नाही याची आता त्यांना खंत वाटायला लागली. ते आप्पासाहेबांना म्हणाले, “ आप्पासाहेब, मी चुकलो. मला तुमच्यासारखा विचार करता आला नाही. पण तुम्ही माझे डोळे उघडलेत. आता बघा, मी अशोकला कसा तयार करतो ते.”

मास्तर आनंदातच घराबाहेर पडले. शाळेची घाई त्यांनाही होतीच. सगळं आवरून मास्तर शाळेत गेले. अशोक आजही वर्गात खाली मान घालून बसला होता. वर्गात गेल्या गेल्या, मास्तरांनी त्याला जवळ बोलावलं. त्याची पाठ थोपटली. अशोकला वाटलं कालचक्र कसं पालटलं! मास्तर कसे बदलले? आता पुढे काय? याची त्याला अजूनही भीती वाटत होती.

मास्तरांनी त्याच्या पाठीवर हात ठेवला. अशोकचं अंग आकसलं. त्यांना ते कळलं. ते त्याला म्हणाले, " अशोक, घाबरू नकोस. मी मारणार नाहीये तुला. उलट आज पासून मी तुला लिहायला वाचायला शिकवणार आहे. शिकशील ना नीट? " अशोकला मास्तरांच्या वृत्तीत झालेला बदल आवडला. पण हा बदल कशामुळे झाला, हे त्याला कळलं नाही. अर्थात ते त्याला समजून सुद्धा, काही फरक पडला नसता.

मास्तरांचे मात्र खरेच डोळे उघडले होते. त्यांना आप्पासाहेबांच्या विचारांच्या पद्धतीचं कौतुक वाटत होतं. शिक्षक असूनही, असे विचार आपल्याला का करता आले नाहीत, असा प्रश्न त्यांना पडला होता. त्या प्रश्नाचं उत्तरही त्यांना सापडलं. असे दुसऱ्याबद्दल सहानुभूतीचे विचार मनात यायला, मन मोठं असावं लागतं. हे आपल्याला कळायला, आप्पासाहेबांना बोलावं लागलं

याचा आता त्यांना विषाद वाटत होता. आपण पैशाने नव्हे, पण ज्ञानाने श्रीमंतच आहोत, तेव्हा अशोकचा राग न करता, आपण त्याला ज्ञानाने समृद्ध बनवायचं; असा त्यांनी मनोमन निश्चय केला. मग त्यांच्या मनातली रुखरुख संपली.

ते अशोकला म्हणाले, “ बाळा, मी वर्गात आलो, की तू इथे माझ्या शेजारी येऊन बसत जा. पुढच्या चार महिन्यात, मी तुला वर्गाबरोबर आणतो.” हे त्यांचं सौम्य बोलणं ऐकून, अशोक शाळेबद्दलच्या भावना किंचित बदलल्या. परवा शाळेत आल्यापासून त्याला पहिल्यांदाच गोड बोलण्याचा अनुभव येत होता. हे त्याच्यासाठी नवीनच होतं. लोकं नेहमीच त्याला हिडीस-फिडीस करत असत. ‘ संभाव्य चोर ’ असाच लोकांचा त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता.

अशोक त्यांच्या जवळ जाऊन बसला. मास्तरांनी त्याला प्रथम श्री काढून दिला. श्रीचं महत्व समजावून दिलं. मग श्री कसा गिरवायचा तेही शिकवलं. अशोकचं वय मोठंच होतं. तो ते पटकन शिकला. मग त्यांनी त्याला ग म भ न, शिकवायला सुरुवात केली. मुळाक्षरं त्यांचे उच्चार अशोक शिकला. अशोकनी मग मागे पाहिलंच नाही. मास्तरांच्या प्रेमाने तो भारल्या गेला होता. ते सांगतील ती प्रत्येक गोष्टं तो मनापासून करत होता. वार्षिक परीक्षेत

तो, इतर मुलांबरोबर चांगल्या मार्कांनी पास झाला. मास्तर व आप्पासाहेबही खुश झाले. अशोकची शिकवणी उन्हाळ्यातही बंद झाली नाही. उन्हाळ्याच्या सुट्टीत, आप्पासाहेबांनी मास्तरांना त्याचा दुसरीचा अभ्यास घ्यायला सांगितलं. मास्तरांना आता अशोकला शिकवण्याचं महत्त्व कळलं होतं; त्यामुळे त्यांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत त्याची दुसरीच्या अभ्यासाची तयारी करून घेतली. अशोकलाही नवीन नवीन गोष्टी शिकायला, मज्जा वाटत होती. पुढच्या वर्षी शाळा सुरु झाली तेव्हा, आप्पासाहेबांनी मुख्याध्यापकांना अशोकची दुसरीची परीक्षा घेण्याची विनंती केली. त्याप्रमाणे त्याची दुसरीची परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षेत तो चांगल्या रीतीने झाला. अशा रीतीने डबल प्रमोशन देऊन तो शाळेच्या दुसऱ्याच वर्षी तिसरीत बसला. आता कोणीच त्याची उपेक्षा किंवा अवहेलना करीत नसे. त्यामुळे तो आनंदात होता.

त्याला तिसरीत बसवतानाच मुख्याध्यापकांनी सांगितलं होतं की, तिसरी नंतर डबल प्रमोशन देऊन पाचवीत बसता येणार नाही. कारण चौथीची परीक्षा महत्त्वाची असते. मग आप्पासाहेबांनी त्याला स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसायला सांगितलं. तो अभ्यासही त्यानी हौसेनी केला. अगदी दोन गुणांनी त्याची स्कॉलरशिप गेली. तो नाराज झाला. पण आप्पासाहेब नाराज झाले

नाहीत. त्यांनी त्याची हुशारी ओळखली होती. त्यांनी त्याला समजावून दिलं, की आता सातवीत स्कॉलरशिप परीक्षेला बसून, तेव्हा ती मिळवता येईल. नाराज होऊ नकोस. तुझी प्रगती चांगल्या रीतीने होते आहे. मी लक्ष ठेवून आहे तुझ्या अभ्यासावर.

स्कॉलरशिपचा अभ्यास फार विस्तारित (vast ) असतो. तो चांगला झाल्यामुळे, उन्हाळ्याच्या सुट्टीत आप्पासाहेबांनी त्याच्याकडून पाचवीचा अभ्यास करून घेतला. शाळा सुरु झाली तेव्हा, पाचवीची परीक्षा देऊन तो सहावीत बसला. अशारीतीनी दोन वर्ष वाचल्यामुळे त्याची इयत्ता आता बऱ्यापैकी वयाबरोबर आली होती. आता घरातल्यांचाही त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला होता.

आप्पासाहेब जरी म्हणले असले, तरी विद्याला आतापर्यंत तरी त्याचं काही करावं लागलं नव्हतं. तिच्या मुलांबरोबर अशोकच्या जेवण - खाण्याची जबाबदारी तिच्यावरच होती. त्यात मात्र तिने कधी कसर केली नाही. अशोक शहाणा होता. घरातलं आपलं स्थान तो जाणून होता. अभ्यासाबरोबरच घरातली चार कामही तो करत होता. बाजारातून वस्तू विकत आणण्याचं काम अशोकचंच होतं. तो हिशोबाला अगदी चोख होता. आपल्याला या भल्या माणसांनी आश्रय दिल्यामुळेच आपण चांगलं जीवन जगू

शकतो आहोत, शिकू शकतो आहोत, याची त्याला जाणीव होती. त्यामुळे घरातल्या सर्व मोठ्या माणसांशी तो अगदी अदबीने वागत असे. त्यांच्या शब्द तो कधीही खाली पडू देत नसे.

मोहन मुक्ता मात्र त्याला अगदी बरोबरीने वागवत. त्याच्यात आणि आपल्यात काही फरक आहे असे त्यांना वाटतच नसे. त्या तिघांचं जणु एक वेगळंच विश्वं निर्माण झालं होतं. तरीही अशोक त्यांच्याशी सुद्धा आपली पायरी सोडून कधी वागत नसे. कारण कदाचित त्याला स्वतःला मिळालेली सुविधा गमवायची नसेल.

ललिताबाई, आपल्या दोन्ही नातवंडांबरोबर बरोबर त्याचेही लाड करीत; पण त्यानी तो उतला मातला नाही. आपल्याला आपलं कोणीच नाही, या भल्या माणसांनी आपल्याला जवळ करून, माणसात आणलं, याची जाणीव त्याला त्या लहान वयातही होती. बघता बघता घरातल्या इतर दोन मुलांबरोबर, थोडासा मागेपुढे, तोही दहावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाला, त्याच्या चांगल्या वागणुकीमुळे, आता त्याचं राहणं घरातल्या कोणाला फारसं खुपत नसे.

तरीही विवेक आणि विद्या यांच्या मनात, त्याच्याबद्दल अजूनही थोडी नाराजी आहे की काय, अशी शंका यावी, असं त्यांचं वागणं होतं. आपल्या मुलांच्या बरोबरीने, या अनाथ

मुलालाही सगळं मिळतं आहे, याची किंचितशी खंत व असूयाही त्यांना वाटत असावी. पण ते तसं  उघडपणे बोलू शकत नसत. आप्पासाहेब व ललिताबाई त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असत.

तिन्ही मुलं आता, एकाच कॉलेजमध्ये, विज्ञान शाखेत शिकत होती. मोहनला इंजिनिअर व्हायचं होतं, तर मुक्ताला डॉक्टर व्हायचं होतं. त्याकरता त्यांचे जोरदार प्रयत्न सुरू होते. अशोक ही अभ्यास करतच होता, पण पुढे कोणत्या शाखेला जायचं? किंवा शिकायचं तरी आहे की नाही, यातली कुठलीच गोष्टं आपल्या हातात नाही; याची जाणीव त्याला होती. त्यामुळे कोणी त्याबाबत काही विचारल्यास, तो हसून, वेळ मारून नेत असे. आत्तापर्यंतचं ठीक होतं, पण या पुढील शिक्षण खूपच खर्चिक होतं. त्यामुळे आपल्याला यापुढे कोणत्यातरी शाखेचं तांत्रिक (technical ) शिक्षण घ्यायला मिळेल अशी अपेक्षाच तो करत नव्हता. आता यापुढचं शिकायला नाही मिळालं तरी चालेल. आत्तापर्यंत त्यांनी आपल्यासाठी जे काही केलं तेच खूप आहे. असे त्याचे विचार होते.

पण परीक्षेत तिन्ही मुलांना साधारण सारखेच गुण पडले. मोहन आणि मुक्ता आपल्या आवडीच्या शाखेकडे प्रवेश घेणार हे निश्चित झालं. प्रश्न होता तो अशोकचा. तो काहीच बोलत नव्हता.

त्याच्या हातात काहीच नव्हतं. अशोकनी मनोमन ठरवलं होतं. त्याला नुसतं BSC करावं असं विवेक विद्याचं मत होतं. पण आता आप्पासाहेब काय करतील याची कोणालाच काही कल्पना नव्हती. न जाणो, आप्पासाहेब त्याला खूप खर्चिक कोर्सला प्रवेश घेतील. त्यामुळे घरात जरा तणावाचं वातावरण होतं; आणि तसंच झालं.

आप्पासाहेबांनी त्याला दोन-तीन स्पर्धा परीक्षा द्यायला सांगितल्या होत्या. त्यापैकी पिलानीच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये त्याला प्रवेश मिळाला होता. बाकी आणखी एखाद-दुसऱ्या संस्थेत त्याला प्रवेश मिळाला होता. पण पिलानीचं इंजिनीरिंग कॉलेज जुनं आणि नावाजलेलं आहे; म्हणून आप्पासाहेबांनी त्याला पिलानीच्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचं ठरवलं. ही गोष्ट अजून त्यांनी घरात सांगितली नव्हती. ही गोष्टं सगळयांना कळल्यावर घरात बऱ्यापैकी वादंग माजणार, ही गोष्टं आप्पासाहेब जाणून होते. त्यांना वादावादी, रागवारागवी नको होती. त्यामुळे कशा रीतीने ही गोष्ट घरात सांगावी, यावर त्यांनी बराच विचार केला. विचारांती त्यांनी एक निर्णय घेतला. आजवर त्यांनी अशोक करता केलेल्या खर्चाचा हिशोब काढलाच नव्हता. आता त्यांनी सगळयांदेखतच अशोक समोर एक पर्याय मांडला; तो असा की सध्या त्याच्या पिलानीच्या शिक्षणाचा खर्च आप्पासाहेब करणार. पण शिक्षण पूर्ण

झाल्यावर, त्याने ते पैसे सव्याज परत करावयाचे. यावर अशोक स्वतःचं काय मत देणार. त्याला हो म्हणण्याशिवाय पर्याय नव्हता.

घरातल्या सर्वांसाठी तर हा मोठाच धक्का होता. आप्पासाहेबांनी आपल्या मनासारखंच केलं होतं. ललिताबाई जरी बोलल्या नाहीत तरी, त्यांना ही गोष्टं फारशी पसंत पडलेली नाही, हे त्यांचा चेहराच बोलत होता. विद्या आणि विवेक यांच्या चेहऱ्यावरचा राग लपून राहिला नव्हता. कारण ते जाणून होते, की पिलानीला पाठवायचं म्हणजे केवळ फीचा प्रश्न नव्हता, तर वसतीगृहाचा खर्चसुद्धा करावा लागणार होता. एका अनाथ मुलाला असल्या चोचल्यांची काय गरज होती? खरंतर आत्ताच्या शिक्षणावर सुद्धा त्याला एखादी छोटी नोकरी मिळाली असती. नोकरी करून एकीकडे पदवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण करणं, ही तर समाजमान्य पद्धत होती. आता त्यानी स्वतःच्या पायांवर उभं राहणं गरजेचं होतं.

ही गोष्टं त्यांनी सवडीनी, अशोक समोर नसताना बोलूनही दाखवली. पण आप्पासाहेबांना आपल्या मताप्रमाणे वागायला लावण्याची ताकद कोणामध्येच नव्हती. शिवाय अशोक, शिक्षणावर खर्च झालेले पैसे परत करणार होता, म्हणजे फारसं बोलायला जागाही नव्हती. आपला विरोध मोडून काढण्याकरताच

आप्पासाहेबांनी ही योजना काढली आहे, याची तर विवेक - विद्याला खात्रीच होती. विवेक म्हणाला, “हे सगळं ठीक आहे हो, पण शिक्षण झाल्यावर, अशोक कुठेतरी निघून गेला, नाही त्याने पैसे परत केले, तर आपण काय करणार? यावर आप्पासाहेब म्हणाले, “ जर अशोक असं वागला, तर ती आपलीच चूक असेल. कारण आपण त्याच्यावर संस्कार करण्यात कमी पडलो, असा त्याचा अर्थ लावता येईल.” हे ऐकून तर विवेक फारच रागावला. आता त्याला कळून चुकलं होतं की, सगळा खर्च आप्पासाहेबच करणार आहेत, मग आपल्या विरोधाला काही अर्थ नाही. म्हणून त्यानी पुन्हा या विषयावर काही बोलायचा प्रयत्न केला नाही.

तरीही विवेकच्या मनातली रुखरुख संपली नव्हती. अखेर आप्पासाहेब स्वतःच्या मताप्रमाणे अशोकच्या शिक्षणाकरता येणारा अवाढव्य खर्च करणारच होते; आणि त्याची भरपाई न झाल्यास, दोष आपलाच. वा रे वा न्याय! आप्पासाहेब कसलेले वकील आहेत, आपलं म्हणणं खरं करण्यासाठी त्यांनी छान डाव टाकला आहे, असं विवेकला वाटलं. धूमसतच तो आणि विद्या तिथून निघून गेले. ललिताबाईंना असल्या गोष्टी पचनी पडत नसत. शिवाय आप्पासाहेबांवर त्यांचा 100% विश्वास होता. श्रद्धा होती. त्यांच्या भूतकाळाबद्दल, थोडीशी का होईना, पण माहिती मिळाल्यामुळे, त्या अवाक झाल्या होत्या. आप्पासाहेबांचा

भूतकाळात असल्या काही गोष्टी दडलेल्या असतील, याची त्यांनी कधी कल्पनाही केली नव्हती. त्या आप्पासाहेबांना महादेवराव दामले यांचा मुलगाच समजत होत्या. पण प्रत्यक्षात मात्र वेगळंच काहीतरी होतं. या जगात काहीही घडू शकतं, आपल्या हातात काहीच नसतं, असं त्यांना वाटत होतं. आपला नवरा चुकीचा निर्णय घेणार नाही, याची खात्री असल्यामुळे, काही न बोलता त्याही तिथून उठून गेल्या.

मोहन आणि मुक्ताला हा प्रस्ताव एकदम पसंत पडला होता. त्यांना तर मनातून, अशोककडून पैसेही परत घेऊ नयेत, असंच वाटत होतं. पण त्या गोष्टीला अजून खूप वेळ होता. आतापासून कशाला बोला, असा सुज्ञ विचार करून, ते काहीच बोलले नाहीत. तरीही मोहनने एक पुडी सोडूनच दिली. “ आजोबा, माझ्याकरता केलेल्या खर्चाचाही हिशोब ठेवा. माझं शिक्षण झाल्यावर मीही ते पैसे सव्याज परत करेन.” मोहन म्हणाला. आजोबा नुसतेच हसले. म्हणाले, “ तुमची सूचना चांगली आहे, मी नक्की यावर विचार करीन. कळलंय मला तुम्हाला काय म्हणायचं आहे ते. जा आता झोपायला. झालं ना तुमचं बोलून!” यावर मोहन हसला आणि पळून गेला.

अशोक मात्र या ओझ्याखाली दबून गेला होता. म्हणजे पैसे परत करणं, त्याला अवघड वाटत नव्हतं. पण आपल्यासारख्या आगापिछा नसलेल्या मुलावर आप्पासाहेबांनी इतके पैसे खर्च करू नयेत, असं त्यालाही वाटत होतं. आपण साधी बी ए ची पदवी मिळवली तरीही, आप्पासाहेबांचे उपकार आपल्याला जन्मभरात सुद्धा फेडता येणार नाहीत; हे त्याला माहिती होतं. तसं त्यांनी शांतपणानी बोलूनही दाखवलं. आप्पासाहेबांच्या लक्षात आलं की त्याला संकोच वाटतो आहे. पण ते काही बोलले नाहीत, नुसतेच म्हणाले, “ ठीक आहे. पुढचं पुढे पाहू.” आप्पासाहेबांनी आत्ता पुरता तरी हा विषय संपवला आहे; हे त्याला कळलं. मग तोही पुढे काही बोलला नाही. पण मनातून तो समजून चुकला होता, की आप्पा साहेबांना जे करायचे आहे ते, ते करणारच. भावनावेगाने त्याच्या डोळ्यातून पाणी येत होतं. हे अश्रू दुःखाचे तर नव्हतेच; पण आनंदाचे ही नव्हते. तर हे होते कृतज्ञतेचे अश्रू.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी, घरातली सर्व मंडळी बाहेर गेली होती. घरात अशोक व आप्पासाहेब दोघंच होते. आप्पासाहेबांनी त्याला हाक मारून जवळ बोलावलं. अशोक उठून त्यांच्याजवळ गेला. त्यानी एकदम त्यांचे पायच धरले. तो रडायलाही लागला. म्हणाला, “ माझ्यामुळे तुम्हाला किती त्रास सहन करावा लागतो आहे? मला नाही सहन होत हे! ” आप्पासाहेबांनी त्याच्या तोंडावर

हात ठेवला. ते म्हणाले, “ बोलू नकोस एक शब्द सुद्धा! तू तुझी लायकी सिद्ध केली आहेस. पिलानीला प्रवेश मिळवणं तितकसं सोपं नाही. ते तुझ्या हुशारीचं व कष्टाचं फळ आहे. आतापर्यंत मी तुझ्या करता फक्त पैसे खर्च केले; आता मी तुला माझं नाव देणार आहे. पिलानीच्या कॉलेजमध्ये तू ‘ अशोक केशव दामले, ’ या नावाने प्रवेश घेणार आहेस. हे ऐकून अशोक चमकला. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. तो निःशब्द झाला. त्याच्या डोळयातून आसवं गळत होती. डबडबलेल्या डोळयांनी आप्पासाहेबांकडे बघत, जणू तो त्यांच्याकडे क्षमायाचना करत होता. आप्पासाहेब आज वेगळंच काहीतरी बोलले होते आणि ती गोष्ट ते अमलात सुद्धा आणणार, याबद्दल त्याच्या मनात शंका नव्हती.

अशोकचे डोळे भरून आले होते. त्यांनी असं काही करू नये, म्हणून त्याचे डोळे त्यांची विनवणी करीत होते. ते जाणून म्हणाले, “अशोक, मी एकदा एखादी गोष्टं ठरवली म्हणजे ठरवलीच. ती गोष्ट घडणारच. काळ्या दगडावरची पांढरी रेघच ती. तेव्हा मी ठरवलेलं सगळं मी माझ्या पद्धतीने पार पडणार आहे. तू फक्त मला त्यांच्या साथ दे म्हणजे झालं! जा आता. पिलानीला जायची तयारी कर.”

पाणावलेल्या डोळयांनी आणि दाटलेल्या गळयानी, अशोक घरातून बाहेर पडला. इथे आल्यापासून आज पहिल्यांदा त्याला

आपल्या अनाथपणाची जाणीव झाली. या घरात कधीही त्याला आपलं पोरकेपण जाणवलं नव्हतं. मनात काहीही असलं तरी, विवेक विद्या सुद्धा त्याच्याशी कधी वाईट वागले नव्हते; त्यांनी सुद्धा त्याला आपलं मानलं होतं. बाकीच्यांचा तर प्रश्नच नव्हता. मोहन आणि मुक्ता त्याचे सर्वात जवळचे-विश्वासाचे मित्र होते. आज त्या सगळयावर कळस चढला होता. ही गोष्टं बाकीच्यांना कितपत मानवेल याची त्याला कल्पना नव्हती. आज तो खऱ्या अर्थाने त्या कुटुंबातला एक सदस्य बनला होता. जगात इतकी चांगली माणसं असू शकतात, नव्हे आहेतच, असा अनुभव त्याला आला होता.

आप्पासाहेब जरा वेळ तसेच बसून राहिले. त्यांना आठवत होता, तो त्यांचा भूतकाळ. त्यांचं ते एकाकी बालपण. त्यांच्या आठवणीप्रमाणे, त्यांचं घर, त्यांचे आई-वडील, त्यांना पुसटसे आठवत होते. कुठल्यातरी आजाराला बळी पडून, त्यांचे आई-वडील, एका पाठोपाठ एक देवाघरी गेले. मग घरात ते एकटेच राहिले. घर भाड्याचे होतं ते सोडावं लागलं. घरातल्या सामानाचं काय झालं? ते देवचं जाणे. त्यांचं नाव होतं केशव, तेव्हा ते तीन साडेतीन वर्षांचे होते. मधल्या काळात आपण  कुठे होतो ? कोणी आपलं  पालनपोषण केलं, काही काही त्यांना आठवत नव्हतं.

आठवत होता तो, ते रस्त्यावर राहात असत तो काळ. केशव रस्त्यावर आला. दिवसभर मिळेल ते काम करायचं, रात्री कुठे आडोशाला किंवा झाडाखाली झोपायचं. केशव कधीही उचलेगिरी करत नसे. काम मिळालं तर खायला मिळायचं. काम न मिळाल्यास उपास घडायचा. पण केशवला त्याची सवय झाली होती. केशव रूपाने राजबिंडा होता. सरळ नाक, उंच कपाळ, बऱ्यापैकी उजळ वर्ण, आणि वागण्यातला सालसपणा, त्यामुळे हा कुठल्यातरी चांगल्या घरातला मुलगा असावा, असं लोकांना वाटायचं. कोणी कोणी तर त्याला फुकट सुद्धा, खायला प्यायला द्यायला तयार असत. पण तो कोणाकडून फुकटची वस्तू घेत नसे.

या गोष्टी हस्ते परहस्ते महादेवराव दामलेंच्या कानावर गेल्या. आहे तरी कोण हा मुलगा? हे पाहण्यासाठी त्यांनी आपल्या नोकराला त्याला घरी घेऊन यायला सांगितलं. काम मिळेल या आशेनी केशवही त्याच्या बरोबर आला. महादेवरावांनी त्याची सर्व माहिती घेतली आणि त्याला कामाकरता म्हणून घरी ठेवून घेतलं. त्याची राहण्याची व्यवस्था आपल्या घरातच केली. त्याचं सद्वर्तन व कामातली हुशारी पाहून, काही दिवसांनी त्यांनी त्याला शाळेत शिकायला पाठवायचं ठरवलं. फार कष्टाची नसलेली कामं, ते त्याच्याकडून करून घेत. कुठल्याही कामाला तो कधी नाही म्हणत नसे आणि कसंतरी काम करून संपवत नसे. त्याचं वागणं-बोलणं

नम्र होतं. राहाणी स्वच्छ होती. या सगळया गुणांमुळे तो घरातल्या सर्वांचा आवडता होता.

तो शाळेत जायला लागल्यावर शाळेतूनही त्याच्या हुशारीच्या कथा महादेवरावांच्या कानांवर येऊ लागल्या. तसे ते त्याच्याकडे लक्ष ठेवून होतेच. पण त्यांना आक्षेपार्ह वाटेल असं कुठलंही वर्तन त्याच्याकडून कधी घडलं नाही. या सगळ्या चांगल्या गोष्टींमुळे, त्याला कराव्या लागणाऱ्या कामांची संख्या, हळूहळू कमी होऊ लागली. महादेवरावच तसे आदेश घरातल्यांना देत असत. त्यांचा स्वभाव फारच करारी होता. त्यामुळे त्यांनी सांगितलेल्या गोष्टी विरुद्ध वागण्याची घरातल्या कोणाचीही प्राज्ञा नव्हती. त्यांच्या पत्नी विमलाबाईच त्यांच्याशी वाद घालू शकायच्या. बाकी कोणी फारसं त्यांच्या थाऱ्याला सुद्धा उभा राहात नसे.

एक दिवस असा उजाडला की त्याने कुठलंच काम करायचं नाही, असं महादेवरावांनी सांगितलं. केशव बावरला. आपले या घरातले दिवस संपले याची दुःखद जाणीव त्याला झाली. आपण आता शालेय शिक्षणाला मुकणार याचं त्याला फार दुःख झालं. तो अजिजीनी महादेवरावांकडे गेला. त्यानी त्यांना वाकून नमस्कार केला. तो म्हणाला, “ साहेब, माझं काही चुकलं असलं, तर मला

चांगली कडक शिक्षा द्या. पण मला कामावरून काढून टाकू नका. मी कुठेही काम करू शकेन, पण तिथे मला शाळेत जायला मिळणार नाही.”

त्याचं हे बोलणं ऐकून, महादेवराव कळवळले. त्यांना त्याच्याबद्दल अधिकच कणव वाटायला लागली. ते म्हणाले, “ केशव, मी तुझं काम करणं  बंद केलं  आहे, ते तुला इथून काढून टाकण्यासाठी नव्हे, तर तुला अभ्यासासाठी जास्ती वेळ मिळावा म्हणून. आजपासून तू शाळेत तर जायचंच, पण घरचाही अभ्यासाचा वेळ वाढवायचा. चांगला अभ्यास करायचा. चांगल्या गुणांनी पास व्हायचं. फक्त मी सांगेन तेवढंच माझं काम करायचं आणि काकूंना पेपर वाचून दाखवायचा. तुला चित्र चांगली काढता येतात, त्याचा सराव करायचा. तुझं गणितही चांगलं आहे. गणितात पैकीच्या पैकी गुण मिळवले पाहिजेस. माझ्या तुझ्याकडून खूप अपेक्षा आहेत.

हे ऐकल्यावर केशव गहिवरला. त्याच्या डोळयातून पाणी येऊ लागलं; तो त्याच्यासमोर पुन्हा एकदा नमस्कार करण्यासाठी वाकला. तेव्हा त्यांनी त्याला उठवून किंचित जवळ घेतलं आणि म्हणाले, “ किती वेळा नमस्कारासाठी वाकशील बाळा!” तेव्हा तो

लाजून हसला आणि पळून गेला अभ्यास करायला. एखाद्या चित्रपटासारखे हे प्रसंग अप्पासाहेबांच्या डोळ्यासमोर येत होते.

एवढ्यात विमलाबाई आल्या आणि म्हणाल्या, "आज कोर्टात जायचं नाहीय की काय? तेव्हा ते भानावर आले. आणि उठलेच आंघोळ करायला. तो हातात वर्तमानपत्र घेऊन केशव आलाच. केशवच्या हातातलं वर्तमान पत्र पाहून त्यांना आठवलं, की आपण आत्ताच केशवला, विमला बाईंना वर्तमानपत्र वाचून दाखवण्याचं काम सांगितलं आहे. लगेच त्याची अंमलबजावणी करायला केशव आला आहे. त्यांना त्याचं कौतुक वाटलं. ते विमलाबाईंना म्हणाले, आज पासून केशव तुम्हाला वर्तमानपत्र वाचून दाखवणार आहे. आहे ना वेळ तुम्हाला?

वास्तविक विमलाबाई स्वतः मराठी व इंग्रजी वर्तमानपत्र वाचत असत. पण केशवला आपण काहीतरी काम करतो आहोत, असं वाटावं म्हणून त्यांनी त्याला हे काम सांगितलं होतं; शिवाय इंग्रजी वर्तमानपत्र वाटल्यास त्याचं इंग्रजीही सुधारेल, असा अंतस्थ हेतूही त्यात होताच.

विमलाबाई म्हणाल्या, " ठीक आहे. आहे मला वेळ." मग वर्तमानपत्र पाहून कुठल्या बातम्या व अग्रलेख वाचून दाखवायचे, हे त्यांनी त्यांना सांगितलं. इंग्रजी वर्तमानपत्र वाचताना, त्याचा

उच्चार चुकला की त्याचा बरोबर उच्चार त्या त्याला सांगत होत्या. महादेवरावांची कल्पना प्रत्यक्षात उतरली होती. त्या खुशीतच ते आपल्या कामाला निघून गेले. या सगळ्या रम्य आठवणीत आपण फारच गुंगून गेलो, असं आप्पासाहेबांना वाटलं.

पिलानीच्या कॉलेजमध्ये नाव घालताना, खरंच त्यांनी त्याचं नाव ' अशोक केशव दामले ' असं फॉर्मवर लिहिलं. अशोककरता नवीनच असलेलं पिलानीचं जग, त्याला अशोक केशव दामले या नावानी ओळखणार होतं. ही त्याची ओळखही नवीनच होती. आज त्याचं अनाथपण आप्पासाहेबांनी संपवलं होतं. आता पिलानीला जायला केवळ आठ दिवसच राहिले होते. तेवढ्यात एक विचित्र घटना घडली. त्या दिवशी एक माणूस आला. तो अशोकची चौकशी करत होता. तो अशोकला, ' सुनील ' म्हणत होता. तो म्हणाला, " मी अशोकचा मामा आहे. तो इथे आहे, असं कळलं, म्हणून मी त्याला माझ्या घरी न्यायला आलो आहे. शेवटी तो माझा भाचा आहे. मलाच त्याची जबाबदारी घेतली पाहिजे. इतके दिवस तुम्ही त्याला सांभाळलात; खूप उपकार झाले, तुमचे आमच्यावर. पण आता माहिती झाल्यावर मला माझं कर्तव्य केलं पाहिजे. कुठे आहे सुनील? बोलवा त्याला. तो लगेच माझ्याबरोबर येईल. शेवटी आमचं रक्ताचं नातं आहे."

त्या माणसाचं हे बोलणं ऐकून आप्पासाहेबांच्या मनात पहिला विचार आला, की इतकी वर्ष हे रक्ताचं नातं कुठे गेलं होतं? आता आठवण होते आहे का? ते सावध झाले. त्यांनी त्या माणसाला बसायला सांगितलं. अशोक घरात अभ्यास करत असेल, मी त्याला बोलावून आणतो; असं म्हणून ते आत गेले. त्यांनी अशोकला सांगितलं की तुझा मामा आला आहे. अशोक गोंधळला. मला कोणी नातेवाईकच नाहीत, असं म्हणायला लागला. ते म्हणाले, "घाबरू नकोस, मी काही तुला त्या माणसाबरोबर पाठवणार नाहीये. तू आमचा आहेस. तरीही या गोष्टीचा योग्य पद्धतीनेच निकाल लावला पाहिजे. नाही तर तो माणूस आणखीनही समस्या निर्माण करू शकेल.

अशोक बाहेर आला. त्यानी अनोळखी नजरेने त्या माणसाकडे पाहिलं. त्या माणसाच्या नजरेतही अशोकला ओळखण्याचं कुठलेही चिन्ह नव्हतं. अशोक खरंच बदलला होतात. मोठा झाला होता. आप्पासाहेबांनी अशोकला विचारलं, " हे गृहस्थ तुझे मामा आहेत का? " अशोक म्हणाला, मला कोणी नातेवाईकच नाहीत."

तो गृहस्थ जरा चपापला. तो म्हणाला, " सुनील तुला आठवत नाही का? तुझी आई माझी बहीण होती. मी नेहमी तुमच्याकडे येत

होतो. तुझे मी खूप लाड करायचो.” अशोकला यातलं काहीच आठवत नव्हतं. तो काहीच न बोलता उभा राहिला. तेव्हा तो मामा म्हणवणारा गृहस्थ म्हणाला, “ सुनील तीन चार वर्षांचा असताना, एका भीषण बस अपघातात त्याचे आई-वडील अचानक मृत्यू पावले. सुनील मात्र वाचला. पण आपल्याला अपघाताची माहिती मिळून, आपण तिथे पोहोचेपर्यंत, कोणीतरी सुनीलला बरोबर घेऊन गेलं होतं. त्यामुळे आपली व सुनीलची गाठ पडू शकली नाही; आणि मग कधी त्याचा पत्ताच लागला नाही. काल परवा मला कळलं, की सुनील तुमच्याकडे आहे. लगेच मी इथे आलो. आता कळल्यावर तरी मला त्याची जबाबदारी घ्यायला हवी ना! मी मामा आहे त्याचा.”

खरी गोष्ट अशी होती की, त्यांना कधीच कळलं होतं की, सुनील अप्पासाहेब दामल्यांकडे आहे. त्यांनी त्याला शाळेतही घातला आहे. त्याचं शिक्षण सुरळीत सुरू आहे. आता तो इंजिनीयर बनणार म्हटल्यावर, त्यांना त्याची ओळख सांगावीशी वाटली. कारण पुढे मागे, या तरुण इंजिनियरचं आपल्या मुलीशी लग्न लावून देता येईल, असा हिशोब त्यांनी केला होता. म्हणून ते त्याच्याबद्दल इतका पुळका दाखवत होते. अप्पासाहेबांना त्यांच्या हेतूबद्दल शंका घ्यायचं काही कारण नव्हतं. पण इतक्या वर्षात गावातल्या गावात ही गोष्ट त्यांना इतक्या उशिरा समजावी, हे अप्पासाहेबांच्या

बुद्धीला पटत नव्हतं पण सोडून देण्याखेरीज दुसरा इलाज नव्हता. अशोकला तर काहीच आठवत नव्हतं.

त्या माणसानी सांगितलेल्या गोष्टी खऱ्या असतीलही; पण त्या अप्पासाहेबांच्या पचनी पडल्या नव्हत्या. त्यानी आप्पासाहेबांना अशोकच्या आईवडिलांची सांगितलेली पूर्ण हकीकत. की त्यांना दोघांनाही एका बस अपघातात मृत्यू आला. पण सुनील वाचला. त्यांना ही गोष्ट कळून, ते तिथे पोहोचेपर्यंत सुनील तिथून नाहीसा झाला होता. कोणीतरी त्याला आपल्याबरोबर घेऊन गेलं होतं. मग पुढे त्याचा काही थांगपत्ता लागला नाही. गेल्या दोन-तीन दिवसात, सुनीलची माहिती मला मिळाली, म्हणून मी इथे आलो आहे, त्याला न्यायला. माझी जबाबदारी आहे ती. इतकी वर्ष तुम्ही प्रेमानी त्याचा सांभाळ केलात. आता मला माझी जबाबदारी पार पाडू द्या. अप्पासाहेबांना त्याचं बोलणं काही फारच रुचलं नाही. खरंही वाटलं नाही. पण ते काही बोलले नाहीत.

तेव्हा तो गृहस्थ अशोकला म्हणाला, “ चल सुनील, आपल्याला निघायला हवं. ”

हे ऐकल्यावर मात्र आप्पासाहेब बोलते झाले. ते म्हणाले. “तुम्हाला त्याला असं नेता येणार नाही. गेली दहा-बारा वर्षे, तो

माझ्याकडे राहतो आहे. त्याचे कोणीच नातेवाईक त्याला किंवा मला माहीत नाहीत. तेव्हा तुम्ही खरंच त्याचे मामा आहात ही गोष्ट, तुम्हाला पोलिसांसमोर सिद्ध करावी लागेल. तसे पुरावे तुम्हाला आणावे लागतील. तेव्हा तुमचं म्हणणं खरं आहे, हे मी मान्य करीन.” यावर तो माणूस काहीतरी बोलणार होता. पण आप्पासाहेबांनी त्याला थांबवलं. ते म्हणाले, “ तुम्ही पुरावे घेऊन या; मगच आपण बोलू.” असं म्हणून त्यांनी त्या माणसाला निरोप दिला. आप्पासाहेबांचं बोलणं यथोचित होतं, त्यामुळे त्याचा नाईलाज झाला, म्हणून त्यावर, “ मी पुन्हा येईनच पुरावे घेऊन, आणि सुनीलला घेऊन जाईन माझ्या घरी; असं काहीसं बडबडून, तो तिथून निघून गेला.

तो गेल्यावर, आप्पासाहेब अशोकला म्हणाले, “अरे आठवून बघ, तुला काही आठवतंय का? अशोक विचारांनी अगदी गलितगात्र झाला होता. आता आपल्या शिक्षणात अडथळा आणणारं, हे काय नवीन संकट? आपल्याला खरंच त्या माणसाकडे जावं लागणार की काय, या विचारानी तो हतबुद्ध झाला होता. तो म्हणाला, “ मला माझ्या आई-वडिलांचे चेहरे सुद्धा आठवत नाहीत, हा कोण माणूस, हे माझ्या लक्षात येत नाही. पण तो कोणीही असला, तरी मी त्याच्या बरोबर जाणार नाही.”

आप्पासाहेब त्याला म्हणाले, “अहो, श्रीयुत अशोक केशव दामले, असं छोट्या-मोठ्या संकटांना घाबरून कसं चालेल? तू तर चाललायंस पिलानीला. मी उद्याच पोलिसात जाऊन, त्यांना ही सगळी माहिती देतो, त्यांना त्या माणसाचा शोध घ्यायला सांगतो. तू काळजी करू नकोस. तुझा पत्ता मी फक्त पोलिसांना सांगेन. इतर कोणालाही मी तुझा थांग - पत्ताही लागू देणार नाही. तू अगदी निश्चिंत राहा. पोलिसांना मात्र आपल्याला सर्व खरी हकीकत सांगावीच लागेल. पण मी आहे ना? माझ्यावर विश्वास ठेव. मी तुझ्यावर कुठलाही अन्याय होऊ देणार नाही. तरीही अशोक बेचैन होता. बघता बघता, त्याचा पिलानीला जाण्याचा दिवस आला, नि तो पिलानीला गेलासुद्धा. मग मात्र त्याची बेचैनी जरा कमी झाली.

त्यानंतर आठ-दहा दिवसांनी, तो माणूस पोलिसांना घेऊन हजर झाला. त्याच्याजवळ अशोकच्या आई-वडिलांचे जुने फोटो होते. पण हे फोटो त्यांचेच कशावरून? असा प्रश्न आप्पासाहेबांनी उपस्थित केला. त्यांच्या मृत्यूची नोंद - अपघाती मृत्यू, अशी सापडली पाहिजे. शिवाय ज्या गावाजवळ हा अपघात झाला, त्या गावाचं नाव आणि तिथल्या गावकऱ्यांकडून या गोष्टींची शहानिशा करून घ्यायला पाहिजे.

शिवाय इतके दिवस, हा मामा म्हणवणारा माणूस होता कुठे? आता मोठा प्रेम आणि जबाबदारी दाखवतो आहे. याच गावात तर तो राहतो, त्याला ही माहिती मिळायला इतकी वर्षे का जावी लागली? त्यानी कधी आजवर पोलिसांकडे त्याचा भाचा सापडत नसल्याबद्दल तक्रार केली आहे का? नसल्यास का केली नाही? कारण सुनीलला शोधण्याचा तोच एक मार्ग होता. याबद्दलची सारी खरी खरी माहिती आपल्याला मिळालीच पाहिजे, असं त्यांनी पोलिसांना सांगितलं. त्याशिवाय आपण तो जे बोलतो आहे त्यावर विश्वास ठेवणार नाही; असं त्यांनी पोलिसांना सांगितलं. या त्यांनी माणसाची पोलिसांना पूर्ण चौकशी करायला सांगितली. अशोकच्या आई-वडिलांबद्दल सुद्धा खरी माहिती काढायला सांगितली.

पिलानीला गेल्यावर अशोक मात्र इकडच्या सर्व गोष्टी विसरला. नवं जग, नवे मित्र, नवं गाव, सारं काही नवीन. तिथलं वातावरण वेगळं होतं. तिथे आलेले सगळेजण एकाच उद्देशांनी आले होते. सगळ्यांनाच अभ्यास करून, पदवी प्राप्त करून घ्यायची होती. तिथे श्रमांना मर्यादा नव्हती. अशोक या नव्या वातावरणात रमून गेला. त्याला कसलीच चिंता किंवा काळजी नव्हती. आप्पासाहेब होतेच की त्याची सर्वतोपरी काळजी घ्यायला. अशोक अभ्यासाला लागला. आप्पासाहेबांनी

आपल्याला ही फारच मोठी संधी दिली आहे. त्याचा आपण पुरेपूर फायदा घेतला पाहिजे, हे त्याला समजत होतं. आप्पासाहेबांनी त्याच्यावर केलेले संस्कार, तो विसरला नव्हता. तो झटून अभ्यासाला लागला. आप्पासाहेबांसारखी समर्थ व्यक्ती आपल्या पाठीशी आहे, तेव्हा आपल्याला कसली चिंता करायचं कारण नाही; हे त्याला माहिती होतं. त्यामुळे निश्चिंत मनानी तो अभ्यासात रमून गेला. पिलानीची चार वर्ष कधी आणि कशी संपली हेसुद्धा त्याच्या लक्षात आलं नाही. तो पुण्याला परत आला, ते नवीन डिग्री घेऊनच.दोन-तीन विषयात त्याला प्राविण्य सुद्धा मिळालं होतं. आता प्रथम आपण नोकरी शोधायची, आणि आप्पासाहेबांनी आपल्यासाठी केलेल्या खर्चाची भरपाई करायची; आत्ता तरी हेच त्याचं ध्येय होतं.

इकडे आप्पा साहेबांकडे अशोकचा मामा म्हणवणारी व्यक्ती खरंच त्याचा मामा आहे हे सिद्ध झालं होतं. ते खरोखरंच अशोकचे मामा होते. पण हे सिद्ध होऊन सुद्धा, त्याचा त्यांना काही उपयोग झाला नव्हता. कारण अशोक गावातच नव्हता. आणि तो कुठे आहे? हे त्यांना माहिती नव्हतं. या नातेसंबंधाला आप्पासाहेबांची ना नव्हती; पण त्यांना अशोकच्या  शिक्षणात कुठलाही अडथळा नको होता. त्यांनी त्याच्या मामांना तो कुठे आहे याचा पत्ता लागू दिला नाही. त्यामुळे ते अशोकशी  साधा संपर्क सुद्धा साधु शकले

नाहीत. अशोकचं पूर्वीचं नाव सुनील होतं. त्याच्या आई वडिलांची नावे अनुक्रमे सुमती व विनायक अशी होती. त्यांचं आडनाव फडके होतं. खरोखरंच त्याच्या आई-वडिलांचा मृत्यू एका बस अपघातात झाला होता. छोट्या सुनीलला, एका माणसाने उचलून शहरात आणलं होतं. पण त्याचा नेहमीकरता सांभाळ करणं, त्या माणसाला शक्य नव्हतं. म्हणून त्याने अशोकला एका बस स्टॉप वर सोडून दिलं. पुढे अशोक वाऱ्यावरच वाढला. पुढची सर्व हकीकत आपल्याला ठाऊक आहेच.

तो गृहस्थ खरोखरंच अशोकचा मामा आहे, हे सिद्ध झाल्यावर, पोलिसांनी मात्र, त्याला चांगलंच धारेवर धरलं. इतक्या दिवसात त्यानी अशोकचा माग काढण्याचा काही प्रयत्न का केला नाही? या प्रश्नाचं समाधानकारक उत्तर तो देऊ शकला नाही. आप्पासाहेबांना मात्र अशोकचा मामा भेटल्याबद्दल फारच आनंद झाला. कारण आता ते अशोकचं कायदेशीररित्त्या दत्तक विधान करू शकणार होते. राजरोसपणे ते त्याला स्वतःचं नाव देणार होते.

खरी गोष्ट अशी होती, की अशोक आपल्या गावातच आहे ही गोष्ट मामांना लगेच कळली होती. पण त्याला घरी आणणं, म्हणजे त्याची कायमसाठी जबाबदारी घेणं होतं. गावात अशोकची मावशी होती, काका होते, पण कोणालाच हे लोढणं कायमसाठी गळ्यात

अडकवून घ्यायचं नव्हतं. त्यामुळे सर्वांनी त्याच्याकडे सोईस्करपणे पाठ फिरवली. तो आप्पासाहेबांकडे राहून शिक्षण घेतो आहे, ही गोष्ट देखील सर्वांना ठाऊक होती. पण आता ओळख दिल्यास, कदाचित त्याच्या पुढच्या शिक्षणाची जबाबदारी आपल्याला घ्यावी लागेल, या भीतीनी कोणीच पुढे आले नाहीत. परस्पर काम होत आहे तर, कशाला आपणाहून ही ब्याद आपल्या पाठीशी लावून घ्यायची, असा स्वार्थी विचार करून कोणीच अशोकची ओळख सांगायला, नातं सांगायला पुढे आलं नाही.

आता अशोक इंजिनियर होणार म्हटल्यावर, मामा-मामीच्या सुपीक डोक्यात एक कल्पना आली होती. अशोक इंजिनियर झाला, की त्याच्याकडे पैसा येणार होता. आता त्याची कुठलीही जबाबदारी घ्यायची नव्हती. आता जाऊन आपण त्याला आपलं म्हटल्यास, बराच स्वार्थ साधता येणार होता. कुठल्याही हलतीत आप्पासाहेब त्याचं शिक्षण पूर्ण करणार, ही गोष्ट त्यांना चांगलीच ठाऊक होती. इंजिनिअर झालेल्या भाच्याला आपलंसं करून घ्यायचं, आणि आपली मुलगी अनघा, तिच्याशी त्याचा विवाह करून देऊन, त्याला घरजावईच करून घ्यायचं, असा त्यांचा बेत होता. म्हणून आता त्यांना अशोकच्या प्रेमाचा पुळका आला होता. आता ते अशोकवर प्रेम नव्हे, तर हक्क सांगत होते. अशोकशी प्रेमाचे संबंध निर्माण करण्याकरता, त्यांनी नाना युक्त्या, योजून

ठेवल्या होत्या. पण अशोकशी नातं  सिद्ध झालं होतं. तरीही त्यांचा अशोकशी काहीच संबंध येऊ शकला नाही. पोलिसांना सर्व खरी हकीकत माहिती असल्यामुळे, त्यांनीही आप्पा साहेबांना मदत केली. त्यांनी अशोकचा पत्ता कोणालाही कळू दिलं नाही.

'अशोक चा पत्ता सध्यातरी कोणालाही देण्यात येऊ नये, कारण ही माणसं त्याच्या अभ्यासात व्यत्यय आणतील' या अप्पासाहेबांच्या विनंतीचं पोलिसांनी तंतोतंत पालन केलं होतं. पिलानीला जाण्याआधी अशोक अज्ञान होता, पण आता वयाची एकवीस वर्षे पूर्ण केल्यामुळे तो सज्ञान होता. आता त्याचे निर्णय तो स्वतःच घेऊ शकणार होता.

आप्पासाहेब त्याच्यावर कुठलाही निर्णय लादणार नव्हते. त्यांना अशोक एक चांगला सुशिक्षित, जबाबदार नागरिक बनावा अशी इच्छा होती. त्यांना त्याला शिक्षण घेऊन आत्मनिर्भर बनवायचं होतं; ते आपलं कर्तव्य त्यांनी पार पाडलं होतं; ते समाधान त्यांना आता मिळालं होतं. त्यांना अशोककडून कसलीही परतफेड नको होती. आता त्याने मामांबरोबर जाण्याचा निर्णय घेतला, तरी ते त्याला अडवणार नव्हते. आनंदानी तशी परवानगी ते त्याला देणार होते.

अशोक समजूतदार होता. आपलं भलंबुरं समजण्याइतका तो आता मोठाही झाला होता. स्वतःच्या नातेवाईकांकडे जाण्याची ओढ त्याच्या मनात निर्माण झाली, तर त्यात चुकीचंही काही नव्हतं. आता जरी तो आप्पासाहेबांपासून दूर गेला, तरी तो बिघडण्याची सूतराम शक्यता नव्हती. निस्पृह स्वभावाच्या आप्पासाहेबांनी गेली चार वर्ष विचार करून ते या निर्णयाप्रत आले होते. कारण त्यांनी कुठल्याही स्वार्थासाठी अशोकला जवळ केलं नव्हतं.

अशोक परत आला. तो परत आल्यावर आप्पासाहेबांनी इथे घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली. त्याचे अनेक नातेवाईक, इथे गावातच राहतात, हेही त्याला सांगितलं. त्याच्या अभ्यासात व्यत्यय येऊ नये म्हणून तेव्हा या गोष्टी त्याला कळवल्या नाहीत; ही गोष्ट तू समजून घे; अशी विनंती त्यांनी त्याला केली. आता जर त्याला त्याच्या नातेवाईकांमध्ये परत जायचं असल्यास, मी तुला आनंदानी तशी परवानगी देईन, असंही सांगितलं. हीच गोष्ट, त्यांनी पोलिसांसमोर सुद्धा सांगितली. त्यांनी कुठल्याही प्रकारचा हक्क किंवा उपकार केल्याची जाणीव, अशोकला दिली नाही. हे ऐकून अशोकच नव्हे तर पोलीसही थक्क झाले. आता निर्णय अशोक च्या हातात होता. अशोक कृतज्ञ होता, कृतघ्न नव्हता. आप्पासाहेबांनी त्याच्यावर सुसंस्कार करून, एक जबाबदार

नागरिक म्हणून त्याला समाजाच्या सुपूर्त केलं होतं. जेव्हा त्याचे मामा त्याला भेटायला आले तेव्हा त्यानी त्यांना वाकून नमस्कार केला.

ते म्हणाले, “ सुनील मी तुला न्यायला आलो आहे. आपल्या घरी चल. तुला सांभाळण्याची जबाबदारी माझी आहे. ती मला पार पाडू दे. गेली चार वर्ष तू बाहेर होतात त्यामुळे आपली भेट झाली नाही. पण आता तू परत आला आहेस, तर आपल्या घरी, आपल्या नातेवाईकांमध्ये परत ये. आम्ही सगळेच तुझी वाट बघत आहोत. मी पोलिसांनाही बोलावलं आहे. आता आप्पासाहेब तुला अडवू शकणार नाहीत. चल रे माझ्या बछड्या, मी कधीचा तुझ्या भेटीसाठी तळमळतो आहे. माझ्या बहिणीची एकुलती एक निशाणी आहेस तू.” असं म्हणून त्यांनी डोळे पुसले.

एवढं बोलणं होईपर्यंत पोलिसही आले. पुढे काय होणार, असा यक्ष प्रश्न सर्वांच्याच मनात होता. निर्णय अशोकने घ्यायचा आहे, तो जो काय निर्णय घेईल, त्याचा मी आनंदाने स्वीकार करीन, असं आप्पासाहेबांनी पोलिसांना सांगितलं. अशोक म्हणाला, “माझा निर्णय मी पोलीस चौकीत मोठ्या साहेबांना समोर सांगेन. तो माझा अंतिम निर्णय असेल. त्यात बदल होणार नाही.”

ज्या अर्थी अशोक एवढं निर्णायक बोलतो आहे.  त्या अर्थी तो आपल्याबरोबरच येणार अशी आशा मामांना वाटायला लागली. कारण शेवटी रक्ताचं नातं आहे आमचं. ‘ Blood is thicker than water ‘ वगैरे म्हणी मामांना आठवायला लागल्या. अशोकला म्हणाले, “ अरे आपलं सख्खं जवळचं नातं आहे. माझ्या बहिणीवर माझं फार प्रेम होतं. गेली बिचारी. आता तिची स्मृती म्हणून तू मला जवळ हवास.” यावर अशोक स्थीर राहिला. त्याने कुठलीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

या सगळ्या प्रसंगांनी ललिताबाई मात्र भांबावून गेल्या होत्या. नाही म्हटलं तरी, त्यांनाही अशोकचा लळा होताच. आता अशोक जर निघून गेला, तर? यांच्या पलीकडचा विचार त्या करू शकत नव्हत्या. विवेक आणि विद्याला मात्र थोडं बरंच वाटत होतं. चला शिक्षण तर झालं त्याचं. बरं झालं नातेवाईक भेटले. आता जावं त्यानी त्यांच्याकडे. आता तरी ही ब्याद आपल्या सर्वांच्याच आयुष्यातून बाहेर निघून जात असेल, तर बरं होईल, असं त्यांना वाटत होतं.

मोहन आणि मुक्ता मात्र गोंधळून गेले होते. आजोबांवर थोडे रागावले होते. त्यांनी अशोकला त्याच्या नातेवाईकांकडे जाण्याची परवानगी द्यावी, याचा त्यांना राग आला होता. काहीही झालं तरी,

अशोकनी घर सोडून जाऊ नये, असं त्यांना वाटत होतं. कारण तो घरात आल्या क्षणापासून, तो त्यांच्या आयुष्याच्या एक भाग होता. आणि तो भागच जर आता दुरावणार असेल, तर त्याचं दुःख, नक्कीच त्यांच आयुष्य व्यापून टाकणार होतं. मात्र तोंडाने ते एक अवाक्षरही बोलले नाहीत. अप्पासाहेब मात्र एखाद्या नगाधिराजासारखे स्थीर होते. या विषयावर त्यांनी एक अवाक्षर सुद्धा बोलायचं टाळलं होतं. “अशोक आता सज्ञान आहे, जाणता आहे, स्वतःचा निर्णय स्वतः घ्यायला सक्षम आहे; तेव्हा तो जो निर्णय घेईल, तो मला मान्य आहे, ” एवढंच ते बोलले.

मोठ्या साहेबांना वेळ नव्हता. शिवाय ते म्हणाले, “ की हा निर्णय पोलिस चौकीत सांगून, काही उपयोग नाही. हा निर्णय न्यायालयात न्यायाधीश साहेबांसमोरच झाला पाहिजे; म्हणजे तो निर्णय कायमस्वरूपी होईल. आप्पासाहेबांना ही गोष्ट माहीत होती. पण आता आपण या बाबतीत काहीच बोलायचं नाही, असं त्यांनी ठरवलं होतं. म्हणून ते काही बोलले नव्हते. न्यायालयाची तारीख तीन दिवसानंतरची मिळाली. हे तीन दिवस प्रत्येकाची परीक्षा पाहणारे होते. कोणीच कोणाशी फारसं बोलत नव्हतं. न्यायालयाच्या तारखेच्या दिवशी, अशोकचे नातेवाईक म्हणवणाऱ्या सर्व लोकांचा जथ्था न्यायालयात हजर होता. अप्पासाहेब मात्र एकटेच अशोक बरोबर न्यायालयात आले होते.

न्यायाधीश महाराज स्थानापन्न झाल्यावर, या विषयाची माहिती असलेली संपूर्ण फाईल न्यायाधीशांना देण्यात आली. मामांनी बोलावलेल्या वकिलांनी या केसची पार्श्वभूमी न्यायाधीशांसमोर पेश केली. सर्वात शेवटी, आज अशोकचे सर्व नातेवाईक न्यायालयात हजर आहेत, व आता माहिती झाल्यावर अशोकने आपल्याबरोबरच राहिले पाहिजे, अशी सर्वांची प्रामाणिक इच्छा आहे, ही गोष्ट त्यांनी न्यायाधीशांसमोर चांगल्या रीतीने मांडली. आता अशोक सज्ञान असल्यामुळे, कोणीही त्याच्या वतीने निर्णय घेऊ शकत नाही, ही गोष्ट ही त्यांनी स्पष्ट केली. आप्पासाहेबांनाही त्यांची बाजू मांडण्याची परवानगी न्यायाधीशांनी दिली. आप्पासाहेब म्हणाले, “ मला अशोकला एक चांगला जबाबदार नागरिक म्हणून घडवायचं होतं; ते काम मी केलेलं आहे. आता अशोक जो निर्णय घेईल, त्याला माझी आनंदाने मान्यता असेल.” एवढं बोलून ते खाली बसले.

आता बोलायची पाळी होती ती त्या तथाकथित मामा म्हणवणाऱ्या माणसाची. त्याने त्याच्या व अशोकच्या आईच्या प्रेमाची महती गायली. तिच्या जाण्याने ते किती एकटे पडले आहेत हेही त्यांनी भावानेनी ओथंबलेल्या आवाजात सांगितलं; आणि आता अशोक चा शोध लागल्यावर मला इतका आनंद झाला आहे, की हर्षवायू व्हायचा राहिला आहे. असंही ते म्हणाले. या

त्यांच्या बोलण्यामधला फोलपणा सगळ्यांनाच जाणवत होता. कारण अशोकचा शोध त्यांनी कधी घेतलाच नव्हता, हेच यातून स्पष्ट होत होतं. जर त्यांनी प्रयत्न केला असता तर त्याबाबतचं काहीतरी त्यांच्या बोलण्यात आलं असतं. पण त्यांनी तसं काही केलंच नव्हतं अशोकला शोधण्याचा प्रयत्न केला असता, ते पोलिसात गेले असते तर त्याची सुद्धा नोंद सापडली असती. पण तसं काहीच नव्हतं. त्यामुळे त्यांचं बोलणं मुळीच परिणामकारक झालं नाही.

आता बोलायची पाळी अशोकची होती. अशोकचं बोलणं निर्णायक ठरणार होतं. त्यामुळे सगळेजण जीवाचा कान करून त्याचं बोलणं ऐकत होते. आप्पासाहेबांनी अशोक आपल्याजवळ हवा म्हणून कुठलंही भावनिक किंवा साधंही आवाहन केलं नव्हतं. त्यांनी अशोकवर आपला कुठलाही हक्क सांगितला नव्हता. अशोक करता आपण काय केलं याचा साधा उल्लेखही त्यांनी टाळला होता. मोठ्या माणसांनी लहान मुलांच्या बाबतीत जे करायला हवं तेच आपण केलं, कारण ते मोठ्या माणसांचं कर्तव्यच असतं. असाच त्यांच्या बोलण्याचा मतितार्थ होता. उलट मामांनी भावनेलाच हात घातला होता. बोलता-बोलता चतुराईने म्हणा, किंवा भावनेनी म्हणा, गळा दाटून येणं, डोळयात पाणी येणं या गोष्टी त्यांना जमल्या होत्या.

अशोक उठून उभा राहिला. आपल्या जागेवरूनच त्याने न्यायाधीशांना वंदन केलं. मग सर्व मोठ्या माणसांना नमस्कार केला आणि बोलायला सुरुवात केली. “न्यायाधीश महाराज, मी रस्त्यावरचं जीवन जगत होतो; अन्नाची चोरी करून पोट भरत होतो. कारण भूक अगदी असह्य व्हायची. एक दिवस आप्पासाहेबांकडे चोरी करताना पकडला गेलो. त्यांनी मला काही शिक्षा न देता, खायला दिलं. माझ्याबद्दल काही माहीत नसताना, मी चोरी करताना सापडलो होतो, तरीही धोका पत्करून, मला घरात ठेवून घेतलं. पुढे शिक्षण दिलं. उच्चशिक्षण सुद्धा दिलं. मला स्वतःच्या घरात, घरातली व्यक्ती असेल असं वागवलं. याच्या बदल्यात माझ्याकडून काम करून घेता आलं असतं, पण तसं त्यांनी केलं नाही. माझ्याकडून त्यांनी कुठलीही अपेक्षा ठेवली नाही. स्वतःच्या नातवंडांच्या बरोबरीनं मला वागवलं. त्यांच्या घरातल्या सगळ्यांनीच मला चांगलं वागवलं. कधीही कमी लेखलं नाही. माझ्या पोरकेपणाची जाणीव होईल, असं कधीच कोणी वागलं नाही. ही माझ्या आयुष्याची एक बाजू आहे.

दुसरी बाजू आहे माझ्या मामांची. माझ्या आईवडिलांचा जेव्हा वियोग झाला, तेव्हा मी साधा अडीच ते तीन वर्षांचा होतो. त्यांचे चेहरे मला आठवत नाहीयेत. तर या मामांना मी काय ओळखणार? परंतु ते खरोखरंच माझे मामा आहेत, ही गोष्ट आता

कायदेशीररित्या सिद्ध झालेली आहे. पण माझ्या जडणघडणीत त्यांचा काहीही सहभाग नाही. मी आता माझ्या शिक्षणाचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केलेला आहे. परंतु मला अजूनही मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. हे मार्गदर्शन आप्पासाहेबच करू शकतील याची मला खात्री आहे. त्यामुळे माझ्या गरजेनीच मी आप्पासाहेबांकडे राहण्याचा निर्णय घेतला आहे.

माझ्या मामांना माझ्याबद्दल वाटणारी माया मी जाणू शकतो. त्या मायेचा किंवा त्यांच्या प्रेमाचा मला अवमान करायचा नाही. त्यामुळे त्यांच्याशी मामा / भाचा असा प्रेमाचा संबंध मी चांगल्या रीतीने सांभाळीन. पण मी त्यांच्याकडे जाऊन राहू शकत नाही. आप्पासाहेबांची मला अजूनही गरज आहे. मी सज्ञान आहे. आज माझं वय बावीस वर्षे आहे. मी स्वखुशीने, मनाच्या अगदी चांगल्या अवस्थेत, अत्यंत स्थीर आणि शांत मनानी हा निर्णय घेत आहे. न्यायाधीश महाराजांनी माझ्या या निर्णयाची नोंद करून घ्यावी.

अशोकच्या समंजस बोलण्यामुळे, सगळे जरा भारावून गेले. मामांचा डाव हुकला होता. पण ते काहीच करू किंवा बोलू शकले नाहीत. त्यांचा चेहरा पडला. ते खालमानेने तिथून जायला निघाले. तेव्हा अशोक त्यांच्याजवळ गेला. त्यानी त्यांना का नमस्कार केला आणि तो त्यांना म्हणाला, “ मामा रागवू नका. मी तुम्हाला सोडणार

किंवा विसरणार नाही. मी तुमच्या व इतर नातेवाईकांच्या कायम संबंधात राहीन.” असं म्हणून त्याने मामांना जवळ घेतले. आता मात्र मामा खरंच गहिवरले. आपली चूक त्यांना कळली. त्यांनी अशोकची पाठ थोपटली आणि ते निघून गेले.

अशोक आप्पासाहेबांचा जवळ गेला. त्याने त्यांना वाकून नमस्कार केला आज तो प्रथमच आप्पासाहेबांना आप्पा म्हणाला. तो म्हणाला, “ आप्पा, मी तुमच्या शिवाय जगू शकत नाही. मला दूर लोटू नका.” त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. आप्पासाहेबांनी त्याला घट्ट मिठी मारली. ते म्हणाले,

“ अशोक प्रश्न तुला दूर लोटण्याचा नव्हता, तर या गोष्टीतून कायदेशीर मार्ग काढण्याची गरज होती. म्हणून मला हे सव्य / अपसव्य करावं लागलं. तू संस्कारी आणि शहाणा मुलगा आहेस. चांगलं वागलास तू तुझ्या नातेवाईकांशी. कोणाचीच मनं दुखावली नाहीस. चल आता शांत मनाने घरी जाऊया.

एकमेकांच्या सोबतीने दोघेही घरी आले. अशोक आप्पासाहेबांबरोबर घरी आल्यामुळे, ललिताबाई मनातल्या मनात सुखावल्या. त्या त्यांच्या करता चहा करायला आत गेल्या. मोहन मुक्ता तर फारच खुश झाले. ते लगेच अशोकला आपल्या खोलीत घेऊन गेले. काय काय झालं, हे त्यांना जाणून घ्यायचं होतं. विवेक

आणि विद्याला जरी, अशोकचं घरात रहाणं पसंत नव्हतं. तरी मनातून त्यांनासुद्धा बरं वाटलं. किती नाही म्हटलं, कबूल नाही केलं, तरी माणसाला सहवासानी प्रेम, विश्वास नकळत वाटायला लागतोच नं !

संध्याकाळ झाली, आज सगळ्यांनाच मनातून बरं वाटत होतं, अशोकचा सगळ्यांनाच लळा लागला होता. ललिताबाईंनी आज कळत नकळत अशोकच्या आवडीचा बेत केला होता. अशोकनी आप्पासाहेबांनी जवळ राहायचं ठरवून, आप्पासाहेबांना यश दिलं होतं. हसत खेळत, जेवणी झाली. सगळे आपापल्या खोल्यांमधे झोपायला गेले. आप्पासाहेबांनी अशोकला हाक मारली. अशोकलाही त्यांच्याशी काहीतरी बोलायचं होतं. अशोक आल्यावर, आप्पासाहेबांनी त्याला जवळ घेतलं, त्याच्या पाठीवर हात फिरवला. ते म्हणाले, “ अशोक, शिणलास कारे ? अवघडच होत्या सगळ्या गोष्टी आज. फार ताण आला होता का तुझ्या मनावर? पण तू सगळं चांगलं निभावलंस.”

अशोक म्हणाला, “ आप्पा, हे सगळं तर तुम्हीच मला शिकवलं आहेत. तुमचेच संस्कार आहेत हे. मला का हाक मारलीत, काही काम आहे का? नाही रे, सहजच हाक मारली. मला काहीतरी बोलायचं आहे तुझ्याशी.”

“आप्पा, मलाही काहीतरी सांगायचं आहे तुम्हाला.” अशोक

“अरे मग बोल ना. “आप्पासाहेब म्हणाले.

“ आप्पा, मला compus interview मध्ये एक चांगली नोकरी मिळाली आहे. येत्या एक तारखेपासून मला तिथे रुजू व्हायचं आहे. मी आता ती नोकरी करणार आणि माझ्या शिक्षणाकरता तुम्ही केलेला अवाढव्य खर्च मी सव्याज परत करणार आहे. त्याशिवाय मला चैन पडणार नाही.”

त्याचं हे बोलणं ऐकून आप्पासाहेब हसले. ते म्हणाले, “मलाही तुझ्याशी त्याच विषयावर बोलायचं होतं.” अशोकला वाटलं, ‘ बरं झालं! आपण अगदी योग्य निर्णय घेतला आहे.’ आप्पासाहेब पुढे म्हणाले, “ अरे पैशाचं राहू दे. आता पुढच्या शिक्षणाकरता तू परदेशात जावंस, असं मला वाटतं. त्याकरता लागणाऱ्या परीक्षा तू दिल्याच आहेस. तेव्हा उद्यापासून अर्ज लिहायला सुरुवात करा.”

अशोक म्हणाला, “ आप्पा, तुमच्या कृपेनी मी आज इंजिनीयर झालो. आता आणखी शिक्षण कशाला? शिवाय आता तर आधी, मला तुमचे पैसे परत कराचे आहेत, मग बाकी सगळं.”

“ करशील रे पैसे परत. पण शिकायची संधी मिळते आहे, तर आधी शिकून घे. माझे पैसे कुठे जाताहेत पळून? ” आप्पासाहेब.

अशोक गहिवरला. आप्पासाहेबांसमोर काय बोलावं, हेच त्याला कळेना. तो काहीच बोलला नाही. आप्पासाहेब म्हणाले, “ तू पुढे एमबीए करावंस, अशी माझी फार इच्छा आहे. अर्थात तुला दुसरं काही शिकायचं असेल, तर तसं सांग.”

तरीही अशोक काहीच बोलला नाही. तो इतका भारावला होता, की त्याच्या तोंडून शब्दच फुटत नव्हता. या देव माणसापुढे काय बोलायचं, हेच त्याला समजत नव्हतं. त्याला वाटत होतं, माणसानी चांगलं असायचं म्हणजे तरी किती? आप्पांच्या चांगुलपणाला सीमाच नाही. तो फक्त म्हणाला, “ मी तुमच्या शब्दाबाहेर नाही. पण तेवढे पैसे परत----” . आप्पासाहेबांनी त्याला पुढे बोलू दिले नाही. ते म्हणाले, पुन्हा तो विषय नको. मी नक्की पैसे परत घेईन तुझ्याकडून. पण ती वेळ आता नाही.

यथावकाश अशोकनी त्यांना सांगितलं, की शिक्षणाकरता परदेशात जाण्याची त्याची इच्छा नाही. तो पुढचं शिक्षण इथे भारतातच घेईल. कारण त्याला त्यांच्यापासून दूर जाण्याची इच्छा नाही.  त्याप्रमाणे एमबीए करण्याकरता तो अहमदाबादला गेला. त्याने पैसे परत करण्याच्या बाबतीत काय झालं? वगैरे गोष्टी त्यांना विचारण्याची कोणाचीच शहामत नव्हती.

मोहन इंजिनीयर होऊन, पुढच्या शिक्षणाकरता अमेरिकेला गेला. मुक्ता सुद्धा एम बी बी एस होऊन एम एस करण्यासाठी, मुंबईला गेली. तिचं शिक्षण चालू असतानाच, तिची भेट डॉक्टर ललितशी झाली. दोघं एकमेकांच्या प्रेमात पडली होती. ललित शस्त्रक्रिया तज्ञ होता. त्याला नाही म्हणायचं कुठलंच कारण नव्हतं. ती मुंबईला जाण्याआधी त्यांचा साखरपुडा करून घेतला आणि आप्पासाहेबांच्या इच्छेप्रमाणे पुढच्या सहा महिन्यात त्यांचं लग्न करायचं हे ठरवलं होतं. लग्नानंतर तिने पुढचं शिक्षण घ्यायला डॉक्टर ललितची हरकत नव्हती.

मुक्ताच्या लग्नाच्या आठ - दहा दिवस आधी, अशोक घरी परत आला. जणू काय लग्न चांगल्यारितीने व्हावं याची जबाबदारी त्याच्यावरच होती, अशासारखी त्याने सगळी कामं केली. मोहन लग्नाच्या आदल्या दिवशी आला, तो म्हणाला, “ मला माहितीच होतं, की अशोक माझी उणीव भासू देणार नाही; म्हणून मी इतक्या वेळेवर आलो, नाही तर आधीच आलो असतो. मोहन एम एस झाला होता. त्याला तिकडेच नोकरी मिळाली, मोहननी एका अमेरिकन मुलीशी लग्न ठरवलं होतं. तेही court marriage. तेही सगळ्यांना पसंत होतं. पण राहून राहून एक प्रश्न ललिताबाईच्या मनात घोळत होता. अमेरिकन मुलीशी लग्न, याचा अर्थ आपला मोहन, आता अमेरिकेतच स्थाईक होणार की काय? पण असू दे.

काय व्हायचं असेल ते होईल पुढे, आतापासून त्याच्यावरून चर्वितचर्वण कशाला! असा सूज्ञ विचार करून, त्यांनी तो विषय कधी काढलाच नाही. मोहन बायकोला घेऊन आला, की त्याचं छान स्वागत करायचं. आपल्या नातसुनेला इथे हे घर परकं वाटू नये, याची काळजी घ्यायची, असं त्यांनी मनाशी ठरवलं  होतं.

लग्न झाल्यावर महिनाभरातच मोहन एक वर्षभराकरता भारतातच यायचा होता. त्यानी  मुद्दाम भारतातलं प्रोजेक्ट मागून घेतलं होतं. त्याची अमेरिकन बायको, वर्षभर तरी भारतात राहायला तयार होती. विवेक आणि विद्याही अतिशय खुषीत होती. सगळंच दान त्यांच्या मनासारखं पडलं होतं. अशोकबद्दलचा त्यांचा आकसही जरा कमी झाला होता. अशोकनी परदेशी जायचं नाकारल्यामुळे, त्यांना जरा बरं वाटलं होतं. अशोकचं सगळं मोहनच्या बरोबरीने झालं, की त्याबाबत वाटणारी असुया डोकं वर काढायची. एरवी काही नाही. विद्या आणि विवेक, ही असमंजस नव्हती. आप्पासाहेबांनी दिलेल्या संधीचं अशोकनी सोनं केलं होतं. आपलं आयुष्य घडवणाऱ्या त्या देवमाणसाची तो जणू पूजा करत होता, त्याच्या वागण्यानी.

मुक्ताच्या लग्नानंतर सुद्धा अशोक घाईघाईने परत गेला नव्हता. कुठलंही काम करतांना, त्यांनी मागेपुढे पाहिलं नव्हतं.

सगळ्या गोष्टी जबाबदारीने पार पाडल्या होत्या. घरातल्या कर्त्या मुलावर अवलंबून राहावं, तसे सगळे जण अशोकवर विसंबून होते. या लग्नातच मोहननी, आपल्याला मायराबरोबर विवाह करायचा आहे, असं सांगितलं होतं. आपल्याला घरचे लोक या विवाहाला आनंदाने परवानगी देतील, हे त्याला ठाऊकच होतं. म्हणूनच मोहननी, मायरा व तिची मैत्रीण - मेगन यांनाही मुक्ताच्या लग्नाला चालण्याचा आग्रह केला होता. त्यानिमित्ताने सगळ्यांशीच मायराची ओळख होईल, या हेतूनेच तो तिला घेऊन आला होता.

मायरा library science हा विषय घेऊन, graduate झाली होती. तो शिकत होता, त्याच कॉलेजच्या लायब्ररीत ती लायब्ररियन होती. पुस्तकांची देवाणघेवाण करता करता, भावनांचीही देवाण-घेवाण झाली होती. दोघेही एकमेकांमध्ये गुंतले होते. मेगन ही तिची जिवाभावाची मैत्रीण. इतक्या लांब जायचं म्हणून, मायराच्या बाबांनी, मुद्दाम मेगनला तिच्याबरोबर जाण्याची विनंती केली होती. नवीन देश पाहायला मिळणार म्हणून मेगनही आनंदानी मायराबरोबर आली.

लग्नातली दोघींची उपस्थिती, अनेकांच्या भुवया वर उंचावून गेली होती. इतर कामांबरोबर मायरा व मेगन यांची व्यवस्था ठेवण्याची जबाबदारीही अशोकवरच होती. अशोक कोण आहे?

हे मायरला आधीच ठाऊक होतं. दोघीही अशोकच्या वागण्यानी प्रभावित झाल्या होत्या. अशोकमुळे त्यांची फारच सोय झाली होती. कुठेच काही अडलं नव्हतं.

अशोक आपल्या कामातच गुंतला होता. पण गेल्या दोन-तीन दिवसात मेगनमध्ये झालेला बदल मायरानी बरोबर टिपला होता. मेगनला अशोक फारच आवडला आहे, हे तिच्या वागणुकीतून मायराला दिसत होतं. त्यात तिला काही वावगं वाटलं नव्हतं. म्हणून तिने मेगनला थांबवलं नाही. अशोकच्या मात्र काहीच लक्षात आलं नव्हतं. कार्याची आवराआवर झाल्यावर, अशोक अहमदाबादला परत निघाला होता. आज मेगन अगदी उदास झाली होती. पण अशोकला त्याचं काही भान नव्हतं. त्याच्या मनात तसं काही येण्याचं कारणही नव्हतं. सगळयांचा निरोप घेऊन, अशोक परत निघाला. मोहन अजून 8/10 दिवसांनी परत जायचा होता.

दोन-तीन दिवसांनी मेगननी आपलं मनोगत मायराजवळ सांगितलं. मायराला या गोष्टीची कल्पना होतीच. ही गोष्ट तिने मोहनला सांगितली. होता होता ही गोष्ट आप्पासाहेबांच्या कानावर गेली. मग आप्पासाहेब, मोहन, ललिताबाई आणि अर्थातच मायरा व मेगन यांची एक बैठकच बसली. आप्पासाहेबांनी मेगनचं शिक्षण

काय झालंय? तिचे आई वडील कुठे असतात? तिला भावंड आहेत की नाही? आणि मुख्य म्हणजे तिची भारतात राहायची तयारी आहे का? या सर्व गोष्टी तिच्याकडून स्पष्ट करून घेतल्या. अशोकला भारताबाहेर जाण्यात मुळीसुद्धा रस नाही. त्याला भारतातच राहायचं आहे, या गोष्टीवर त्यांनी मेगनला विचार करायला सांगितला. कारण उन्मादाच्या भरात एखादी गोष्ट मान्य करणं, मान्य केल्यावर ती आनंदाने जन्मभराकरता स्वीकारणं यात असलेलं अंतर आप्पासाहेब जाणून होते.

मायरा व मेगन एकाच गावाला म्हणजे seatle ला राहत. एकाच शाळेत जात. कॉलेजमध्ये गेल्यावर त्यांच्यात अंतर पडलं, पण मैत्री तशीच कायम राहिली. मेगनला अशोक खूपच आवडला होता. त्यामुळे ती भारतात राहायला तयार होती. शिवाय भारतीय मुलांचा एक प्लस पॉइंट होता; तो म्हणजे जुळवून घेण्याची क्षमता. भारतीय लग्नात घटस्फोटाची भीती फार कमी असते, हे तिला ऐकून व आजूबाजूला बघून माहित होतं. शिवाय अशोक इंजिनीयर होता.

यातून आप्पासाहेबांनी एक मार्ग काढला. आत्ता अशोकला काहीच न सांगता तिनी घरी परत जावं, नीट विचार करावा, आईवडिलांशी बोलावं व मग आपला विचार पक्का करावा, असं

त्यांनी सुचवलं.  यात नाही म्हणण्याजोगं काहीच  नव्हतं. यात चार सहा महिने गेले असते. पण तोवर अशोकचं शिक्षणही संपलं असतं. त्यानंतरच त्याच्या कानावर ही गोष्ट घालावी. आता आता ही गोष्ट त्याला सांगून त्याचं मन अभ्यासावरून विचलित करू नये; हाही विचार त्यांच्या या सूचनेमागे होता.

मायरानी पहिल्यांदाच भारतीय पद्धतीचं लग्न पाहिलं होतं. तिला त्यातलं कोडकौतुक, व नटणं मुरडणं सुद्धा खूप आवडलं. तिनी तिला भारतीय पद्धतीने लग्न करायला आवडेल, असं तिनी मोहनला सांगितलं. त्यामुळे आपली हौस मौज पूर्ण होणार, या कल्पनेनी  ललिताबाई व विद्या खुश झाल्या. लगेच त्यांचे लग्नात काय काय करायचं, याचे बेत बात सुरू झाले. आप्पासाहेबांनी त्यांना थांबवलं. ते म्हणाले, ” मायरा काहीही म्हणाली असली, तरी तिच्या घरच्यांचा काय विचार आहे? त्यांना ही गोष्ट पटणार आहे का? या सगळ्या गोष्टींचा विचार करून, मगच आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. उगाच अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होऊ नका. त्या जरा वरमल्या. पण त्यांनी तो विषय पुढे वाढवला नाही. आठ-दहा दिवसांनी मोहन-मायरा व मेगन अमेरिकेला परत गेले. सगळ्यांचंच रुटीन सुरू झालं. ललिताबाई मात्र दोन्ही लग्नांचा विचार करत, अनेक बेत आखत होत्या.

हा हा म्हणता सहा महिने संपत आले. वरवर जरी सगळं शांत दिसत असलं, तरी या काळात आप्पासाहेब, मोहन, मायाराचे आईवडील, मेगन व तिचे आई-वडील यांच्यात सतत फोन, मेल, यांच्याद्वारे संपर्क सुरू होता. एवढं मोठं अंतर पार करून, जवळ येण्यासाठी हे आवश्यकच होतं. फक्त या कुठल्याही गोष्टीची जाणीव अशोकला नव्हती. तो आपल्या अभ्यासात गर्क होता. या कालावधीत दोन चार मुलींनी त्याच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला होता. पण अशोकची नजर फक्त त्याच्या ध्येयावर लागलेली होती. बाकी कुठे लक्ष द्यायला त्याला वेळच नव्हता.

आप्पासाहेबांनी मायराच्या व मेगनच्या वडिलांना स्पष्टपणे सांगितलं की, त्यांनी दोघांनीही इकडे यावे, इथली परिस्थिती पाहावी, समजून घ्यावी, त्यानंतरच त्यांनी आपले निर्णय घ्यावेत. आम्हा भारतीयांकरता विवाहबंधन ही अतिशय पवित्र गोष्ट आहे. विवाह हा आयुष्यभर टिकावा अशीच आमची धारणा असते; त्यामुळे याबाबतीत निर्णय घेताना अतिशय काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आम्हाला भासते. तुमच्या मुली तर, इतक्या दूरवर येणार, त्यामुळे आधी तुम्ही इथे यावं, मी तुम्हाला सर्व माहिती देईन, त्यावर विचार करून, मगच निर्णय घ्यावा, असं मला वाटतं.

ह्या त्यांच्या स्पष्टोक्तीनी, मेगन व मायराचे चे वडील प्रभावित झाले. त्यांनाही त्या गोष्टीचं गांभीर्य कळलं. त्यानंतर साधारणपणे तीन चार महिन्यांनी दोघंही भारतात आले. त्यांच्यासाठी आप्पासाहेबांनी एका चांगल्या हॉटेलमध्ये खोल्या घेऊन ठेवल्या होत्या. आप्पासाहेबांनी त्यांना विमानतळावरून हॉटेलवर पोहोचवायला, गाडी पाठवली होती. त्याप्रमाणे ड्रायव्हरने त्यांना हॉटेलवर पोहोचवलं. प्रवासाचा शीण जरा कमी झाल्यावर, ते दोघंही आप्पासाहेबांना भेटायला आले.

आप्पासाहेबांचा बंगला, घरातला माणसांचा राबता, वगैरे सर्व थाट पाहून, ते बरेच प्रभावित झाले. त्यांच्याशी बोलताना, आप्पासाहेबांनी त्यांना सांगितलं, की मुलाचं लग्न झालं, की त्याला वेगळं घर करून द्यायची पद्धत, आमच्याकडे नाही. आम्ही जरी मुलांवर आर्थिक दृष्ट्या अवलंबून नसलो, तरीही आम्हाला मुलाजवळच राहण्याची इच्छा असते. मुलांनाही तेच हवं असतं. पण बायकोने साथ दिली नाही, तर ते शक्य होत नाही. त्या कारणानी त्यांच्या संसारात अडथळे यायला लागले, तर त्यांनी वेगळी घर करायलाही आमची ना नसते. पण पहिल्या क्षणी तरी मुलगा वेगळं घर करत नाही. मोहन लग्नानंतर एक वर्षं तरी भारतात राहणार, पण तेवढ्याकरता त्यांनी वेगळं घर करावं अशी त्याची व आमचीही इच्छा नाहीय.

नंतर त्यांनी त्यांना अशोकबद्दल सर्व माहिती दिली. सध्या जरी तो इथे राहात नसला, तरीही पुढे आम्हाला सोडून राहण्याची त्याची इच्छा नसणार; आणि आम्हालाही त्याच्याजवळ राहण्यातच सुख आहे. या सर्व गोष्टी, तुम्ही जाणून घ्याव्यात, आमची विचाराची पद्धत आणि वागण्याची पद्धत याची तुम्हाला कल्पना असावी, म्हणून मी तुम्हाला इथे येण्याची विनंती केली. त्यानुसार तुम्ही इथे आलात, याचा मला आनंद वाटतो आहे. अशोकची परीक्षा दोन दिवसांनी संपणार आहे, त्यानंतर तो इथेच येईल. त्याला जिथे नोकरी लागेल, तिथे आम्ही त्याचं घर करून देऊ. त्याला आमची ना नाही. जर तो याच गावात राहिला, तर बहुधा आमच्या जवळच राहील. तुम्हाला या सर्व गोष्टींची कल्पना असावी, म्हणून मी तुम्हाला इथे यावं अशी विनंती केली. अशोक कधीही परदेशात राहावयास तयार होणार नाही, ही गोष्टही त्यांनी स्पष्टपणे सांगितली.

अप्पासाहेबांच्या बोलण्यातला मार्दव आणि स्पष्टपणा, त्या दोघांनाही फारच भावला. आप्पासाहेबांनी त्यांना स्पष्टपणे सांगितलं, की आम्हाला तुमच्याकडून कुठल्याही आर्थिक देणगीची गरज नाही व अपेक्षाही नाही. हे सगळं ऐकल्यावर तर, आपल्या मुलींनी चांगल्या मुलांची निवड केली आहे, याबाबत त्यांच्या मनात कुठलीच शंका राहिली नाही. राहता राहिली होती

गोष्ट, ती म्हणजे अशोकची समक्ष भेट. त्याचा फोटो तर त्यांनी पहिलाच होता.

आप्पा साहेबांनी सांगितल्याप्रमाणे, दोन तीन दिवसात अशोक आलाच. त्याच्या येण्याच्या वेळी इतर सर्वांबरोबर मायरा व मेगन यांचे आई-वडीलही हजर होते. त्यांना पाहून, त्याच्या भुवया उंचावल्या. आप्पासाहेबांनी त्याची व त्यांची ओळख करून दिली. मेगनचे वडील व त्यांचे मित्र म्हणून आले आहेत, अशीच अशोकची समजूत झाली. त्यात त्याला विशेष काही वाटलं नाही. संध्याकाळी मात्र आप्पासाहेबांनी, त्या दोघांच्याही येण्याचं प्रयोजन सांगितलं. मेगनची काय इच्छा आहे हेही सांगितलं. त्या गोष्टीला आमची, घरातल्यांची काही हरकत नाहीये, हेही सांगितलं, पण याबाबतीतला तुझा निर्णय तू स्वतः घ्यायचा आहेस. त्याबाबतचे निर्णय घेण्याकरता दोघींचेही वडील इथे आले आहेत, हे त्याला कळलं. आप्पासाहेबांनी त्याला सांगितलं की त्यांना तर सगळंच पसंत आहे. आता अपेक्षा आहे ती तुझ्या निर्णयाची. पण तू सुद्धा घाईघाईने कुठलाही निर्णय घेऊ नकोस. विचार करून निर्णय घे. तेवढे ते थांबतील इथे.

अशोक विचारातच पडला. त्याला ह्या गोष्टीची काहीच कल्पना आली नव्हती. विचार करता करता त्याला मेगनच्या

वागण्याचा थोडा थोडा उलगडा व्हायला लागला. तिचं सारखं आपल्यामागे राहणं, सारखे प्रश्न विचारणं, हसणं, थोडं लाजणं सगळं त्याला आठवलं. अरेच्या, असं होतं तर सगळं! आपल्याला काहीच कळलं नाही. काय करावं? कोणाशी बोलावं? कारण एकट्यानी तर याबाबतीत निर्णय घेणं कठीणच. त्याला मुक्ताची आठवण झाली. तीच आपल्याला योग्य मार्गदर्शन करू शकेल, असं त्याला वाटलं. त्यांनी लगेच तिला फोन केला.

या सगळ्या गोष्टी मुक्ताच्या कानावर आल्याच होत्या. तिने त्यावर विचारही केला होता. त्यामुळे अशोकनी विचारल्यावर, त्याला उत्तर देणं, तिला अगदी सोपं गेलं. ती म्हणाली, " अरे अशोक, ती जर तुला आवडली असेल, तर हो म्हणायला काहीच हरकत नाही. ती बघ, तुझ्याकरता एवढी सात समुद्र पार करून, कायमची इकडे यायला आतुर झाली आहे. आणखी काय हवं? यातून तिची तुझ्याबद्दलची ओढ तुला जाणवते आहे का? तिने तुला कुठल्याही अटी घातलेल्या नाहीत. तिची तुझ्याबद्दलची ओढ इतकी जास्ती आहे, की तिचा देश, तिचं गाव, तिचे कुटुंबीय कोणीच तिला थांबवू शकलं नाही. ती शिकलेली आहे. तुझ्याकरता कायम भारतात राहण्याची तिची तयारी आहे. आणखी काय हवंय? तू जर इतर कुठे गुंतला असशील तर मात्र खरंच विचार करायला हवा. अन्यथा तुझ्याकरता ही अगदी सुवर्णसंधी आहे."

हे ऐकल्यावर सुद्धा आप्पासाहेबांशी बोलल्याशिवाय आपण निर्णय घेऊ शकत नाही, हे त्याच्या लक्षात आलं. मग तो आप्पासाहेबांना म्हणाला, “ आप्पा, मला तुमच्याशी बोलायचं आहे. त्याशिवाय मी कुठलाही निर्णय घेऊ शकत नाही.” आप्पासाहेब हसले, म्हणाले, मी तर आहेच रे कायमचा तुझ्या पाठीशी. बोल काय बोलायचे आहे ते.”

अशोक म्हणायला, “ आप्पा मी काय करू? तुम्हीच मला सांगा. मुक्ताला विचारलं, म्हणाली, बिनधास्त कर; पण खरंतर, तुम्हीच मला योग्य मार्गदर्शन करू शकाल. “

आप्पासाहेब म्हणाले, “ अरे बाळा, तू आता चांगला मोठा आणि समजदार आहेस; किती दिवस मी पुरणार आहे रे तुम्हाला? ”

अशोक म्हणाला, “ आप्पा, तुम्ही आहात, म्हणून मी आहे. तुम्ही आहात, तोवर सगळयाच बाबतीत मला तुमचं मार्गदर्शन हवं.”

आप्पासाहेब म्हणाले, ” बरं, बाबा! माझ्याही मते, तुला हो म्हणायला काही हरकत नाही. त्या घरातली माणसं चांगली आहेत, वडील येऊन गेले इथे. पण तेव्हा तुझ्या अभ्यासात व्यत्यय नको, म्हणून तुला काही कळवलं नव्हतं. मुलगी कशी आहे, ते तू

पाहिलंच आहेस. तिथे शिक्षण चांगलं आहे. मुख्य म्हणजे, तुझ्या आवडीप्रमाणे लग्नानंतर भारतात राहण्याची तिची तयारी आहे. आमची कोणाचीच या लग्नाला ना नाहीये. तेव्हा तुला जर मेगन आवडली असेल, तर लग्न करायला काही हरकत नाही. लग्नानंतर कधीमधी, तुला अमेरिकेला तिच्या घरी जावे लागेल, पण मला वाटतं त्याला तुझे हरकत नसावी."

" विचार करतो, " असं म्हणून, अशोक तिथून निघून अंगणात गेला. अंगणात एक वडाचं झाड होतं. त्या झाडाखाली बसून, अशोकनी त्याच्या जीवनात आलेले, अनेक लहान-मोठे प्रश्न सोडवले होते. आताही जणू एखाद्या ज्येष्ठ माणसाचा सल्ला घ्यावा, तसा अशोक पारावर बसून, विचार करत होता. त्यांनी काही मेगनकडे लग्नाच्या दृष्टीने पाहीलंच नव्हतं. अजून तर त्याला जीवनात स्थिरस्थावर व्हायचं होतं. पहिलं म्हणजे स्वतःच्या पायांवर उभं राहायचं होतं. आप्पासाहेबांनी त्याच्यासाठी खर्च केलेले पैसे, त्यांना परत करायचे होते; स्वतःचं एक घर हवं होतं, मग कुठे लग्नाचा विचार करता आला असता. पण आता तर, या सगळ्यात आधी लग्नच पुढे येऊन ठाकलं होतं. सर्व बाबींचा विचार करता, नाही म्हणण्याचं फारसं काही कारण दिसत नव्हतं. पण लग्नानंतर आपल्याला ज्या गोष्टी, आधी करायच्या आहेत, त्या करायला मेगन आपल्याला साथ देईल का? कारण आपल्यावर

आप्पासाहेबांचं नुसता पैशाचं नव्हे, तर सर्वच बाबतीत किती ऋण आहे, हे तिला समजून घेता येईल का? इत्यादी विचारांनी तो थोडासा गोंधळलाच.

तो पुन्हा आप्पासाहेबांकडे गेला. " आप्पा, मला वाटतं, कुठलाही निर्णय घेण्याआधी, मी मेगनशी बोलायला हवं. तिची काय मतं आहेत, ते जाणून घ्यायला हवं. इतक्या दुरून माझ्यावर विश्वास ठेवून, ती इथे येणार. तिचा अपेक्षाभंग व्हायला नको. " हे ऐकून, आप्पासाहेबांना बरं वाटलं. त्यांचीही तीच इच्छा होती. पण त्यांनी मुद्दामच तसं आपण होऊन सुचवलं नव्हतं. अशोकवर आपले पक्के संस्कार झालेले आहेत, या विचारानी यांना बरं वाटलं.

ते म्हणाले, "अशोक, निर्णयाची घाई नाहीच आहे. आजच तू तिला फोन कर, तुझे विचार तिला विस्तारानी सांग. तिचे विचार तू जाणून घे, आणि मगच काय तो निर्णय घे." अशोकला वाटलं, निर्णय घेण्याआधी, एकदा मामांच्या कानावरही, ही गोष्ट घातली पाहिजे.

संध्याकाळी अशोकनी मेगनला फोन केला. तिला स्वतःची काय परिस्थिती आहे ते सांगितलं. मी कधीही भारत सोडून, परदेशात नोकरी करायला जाणार नाही, हे ही सांगितलं. शिवाय

आप्पासाहेबांना सोडून राहणं, आपल्याला शक्य होणार नाही, हे ही त्यानी स्पष्ट केलं.

मेगन म्हणाली, “ अशोक मी तुझ्यावर प्रेम केलंय. बाकी कशावर नाही. तुझा स्वभाव, तुझं वागणं, तुझं दिसणं, या सगळ्याच गोष्टी, माझ्या मनाला फार भावल्या; तू कोण आहेस, तू या घरात कसा आलास, हे सगळं मला मायराकडून कळलेलं आहे. आप्पासाहेबांनी तुझ्याकरता काय काय केलं, तू देखील मिळालेल्या संधीचं सोनं केलंस, या सगळ्या गोष्टी मला ठाऊक आहेत. तरीही मी तुझ्यावर प्रेम करते. तू कधीच भारत सोडून परदेशात नोकरी - व्यवसायाकरता जाणार नाहीस, हे मला आप्पासाहेबांनी आधीच स्पष्टपणे सांगितलेलं आहे. मला हे सगळ मान्यं आहे. माझी भारतात तुमच्या एकत्र कुटुंबात राहण्याची तयारी आहे. माझं काही चुकल्यास, तू मला सांभाळून घेशील, अशी अपेक्षा मी करते. पण तू मला नाही म्हणू नकोस. मला तू फार आवडतोस.”

एवढं सगळं ऐकल्यावर, नाही म्हणायचं फारचं कारणच उरलं नाही. अशोकही जरा भावनाविवश झाला. एखादी मुलगी, आपल्यासारख्या पोरक्या, दुसऱ्याकडे अश्रितासारख्या वाढलेल्या व्यक्तीवर इतकं निर्विवाद, निर्व्याज प्रेम करते, या विचारांनी तो

भारल्या गेला होता. तो मेगनला म्हणाला, “ मेगन, तू ही छान आहेस. आवडण्यासारखीच आहेस. आपण एकमेकांच्या सहवासात आलो, पण मी कधी तुझ्याकडे या दृष्टीने पाहिलं नाही. तुझ्यासारखी, श्रीमंत, सुस्थित घरातली मुलगी, माझ्यासारख्या मुलावर प्रेम करते, या गोष्टीचं मला खूप अप्रूप वाटतं आहे. मी तुला सुखात ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. चुकलं माकलं, तर आपण एकमेकांना सांभाळून घेऊया.”

यावर मेगन म्हणाली, “ अशोक आता आणखी एक शब्दही बोलू नकोस. मला खूप आनंद झाला आहे; तो आनंद मला उपभोगू दे. आपण आता उद्या बोलूया.” मेगनचं हे बोलणं ऐकून, अशोकचं मन पिसासारखं हलकं झालं. आपल्याला एक सहृदय, संस्कारी आणि विचारी मुलगी सहचरी म्हणून लाभली आहे, या विचारानी, त्याचं मन शांत झालं. त्या विचारातच कधी झोप लागली, हे त्याचं त्यालाच कळलं नाही.

सकाळी चहाच्या टेबलशी तो, आप्पासाहेब व घरातली सगळी मंडळी हजर असताना, त्याने या विवाहास आपली संमती असल्याचं सांगितलं. सगळयांनाच आनंद झाला. नेहमीप्रमाणे विवेक आणि विद्या यांना, अगदी आपल्या सुनेच्या तोलामोलाची मुलगी या अनाथ मुलालाही मिळावी, याचं थोडं वैषम्य वाटलंच.

पण ते त्यांनी दर्शवलं मात्र नाही. उलट आपल्यासारख्याच्या घरात तो वाढला, म्हणूनच हे भाग्य त्याला लाभलं आहे, असं मनाचं समाधान त्यांनी करून घेतलं. ललिताबाईंना मात्र खूप आनंद झाला. अशोकनी आप्पासाहेबांना खरोखरंच यश दिलं, असं त्यांच्या मनात आलं. सुरुवातीला अशोक घरात आलेला, आपल्यालाही पटला नव्हता. पण आपण नाही म्हटल्यास, नुसती वादावादी झाली असती,

आप्पासाहेबांनी तर आपलं ऐकलं नसतंच, घरातलं वातावरण मात्र बिघडून गेला असतं, या सगळ्या गोष्टी, त्यांच्या मनात आल्या.

आप्पासाहेब अशोकला म्हणाले, “ अशोक, तुझ्या मामांच्याही कानावर ही गोष्ट घाल. तुला जवळचे असे, तेच नातेवाईक आहेत.”

अशोक म्हणाला, “ आप्पा, मीही तोच विचार करत होतो.”

आप्पासाहेब म्हणाले, “ शुभस्य शीघ्रम. आता आज सकाळीच तू तिकडे जाऊन ये.”

यानंतर सगळेच आपापल्या कामासाठी उठून गेले. थोड्यावेळानी स्वतःच सगळं आवरून, अशोकही मामांकडे गेला. मामा जेवायला बसले होते. अशोक आपणाहून आल्याचं बघून,

त्यांना आनंद झाला. अशोकचं येण्याचं प्रयोजन कळल्यावर मात्र, त्यांचा चेहरा जरा पडला. कारण आता अशोकला, त्यांच्या मुलीबद्दल, म्हणजे अनघाबद्दल काही विचारताच येणार नव्हतं. ते काही न बोलता, त्यांनी त्याबद्दल आनंद व्यक्त केला. तरीही शेवटचा प्रयत्न म्हणून, ते अशोकला म्हणाले, “अरे, कुठली परदेशातली मुलगी शोधलीस रे तू? आपल्या भारतीय मुलींची की काय वाण पडली आहे का? या परदेशातल्या मुली, लग्नाआधीच त्यांची घटस्फोटाची तयारी झालेली असते. अजूनही तुझा निर्णय बदल आणि भारतीय मुलीशी लग्न कर.

या बोलण्यामागचा, त्यांचा अंतस्थ हेतू काय होता, याची अशोकला काहीच कल्पना नव्हती. तो सरळपणानी मामांना म्हणाला, “ मामा, मी स्पष्ट बोललो आहे तिच्याशी सगळं. तिला सगळ्या गोष्टी माहिती आहेत, तरीही तिला माझ्याशीच लग्न करायचं आहे; आणि हे प्रपोजल माझं नाही, ही इच्छा तिनेच मी इथे नसताना व्यक्त केलेली आहे. तेव्हा त्यात मला काही फारसा धोका दिसत नाही.” हे ऐकून तर मामांचं बोलणंच खुंटलं. तरीही ते म्हणाले, “ अशोक, तू कोणाच्या दबावाला बळी पडू नकोस.”

“ मामा, हा माझा स्वतःचा निर्णय आहे. त्या घरातल्या कोणीही माझ्यावर कधीच काही लादलेलं नाही. उलट दरवेळी

माझ्या इच्छेचा मानच ठेवला आहे.” मग मात्र मामांनी आपला प्रयत्न सोडून दिला. मामांचं जेवण झाल्यावर, मामा-मामींना नमस्कार करून अशोक घरी गेला. घरी गेल्यावर त्यांनी प्रथम मुक्ताला फोन केला. आपल्या निर्णय तिला सांगितला. मुक्ता खुशच झाली. ती म्हणाली, “ गेल्यावर्षी तुम्ही माझ्या लग्नाची तयारी केलीत. आता माझ्या अंगी दोन हत्तींचे बळ येईल, सगळी तयारी मी करते, तू अगदी निर्धास्त राहा.”

आपण अतिशय चांगल्या रीतीने, चांगल्या माणसांमध्ये वाढलो, चांगल्या पद्धतीने आपल्याला वाढवलं , म्हणून आपण आज इथे आहोत. असले विचार करता करता, त्याला आज आपल्या आईवडिलांची तीव्रतेने आठवण झाली. ते गेले, तेव्हा तो इतका लहान होता, की त्यांची अगदी पुसटशी आठवण त्याच्या मनात होती. पण आज त्याला त्यांची उणीव फार जाणवत होती. पण पर्याय काहीच नव्हता. तो थोडा बेचैन झाला. पण त्यानी स्वतःला सावरलं. एवढ्यात मेगनचा फोन आला. ती अतिशय आनंदात होती. फोनवरच्या बोलण्यात सुद्धा, तिचा आनंद आणि उत्साह लपून राहत नव्हता. बोलता बोलता तो म्हणाला, “ हॅलो मेगन, हे बघ, मला असं वाटतंय की आपण अगदी साध्या पद्धतीने लग्न करूया. हौस करूया, पण थाटमाट नको, अगदी मोजकीच

माणसं लग्नाला बोलवू या. शक्यतोवर रजिस्टर पद्धतीने लग्न करूया. तुला मान्य आहे का हे? ”

मेगन म्हणाली, “ अशोक मला तू म्हणशील ते मान्य आहे. मला फक्त तू हवास साथी म्हणून. ” मेगनच्या समजुतदारपणानी तो चकित झाला.

ही इतक्या दूरवरची मुलगी, इतक्यात कशी आपल्यात मिसळून गेली? असा त्याला प्रश्न पडला. पण तिच्या होकारानी तो सुखावला. आप्पासाहेबांशी बोलताना तो म्हणाला, “ आप्पा लग्न तर ठरलं, पण माझ्या नोकरीचं काय काय? आता मला आधी नोकरीच्या मागे लागले पाहिजे. मग बाकी सगळं.”

आप्पासाहेब हसले. ते म्हणाले, “अशोक काळजी करू नकोस. तुझे शिक्षण इतकं चांगलं आहे, की नोकऱ्या आपोआप तुझ्याकडे चालत येतील; आणि खरंच तसं झालं. गावातल्याच दोन-तीन बऱ्यापैकी मोठ्या कंपन्यांमधून अशोकला इंटरव्ह्यूसाठी बोलावणं आलं. त्याने तर अर्ज सुद्धा केले नव्हते. त्या कंपन्यांपैकी ज्यांची ऑफर सर्वात चांगली होती, व कामही त्याला आवडण्याजोगं होतं, त्या कंपनीत तो चार दिवसातच जॉईन झाला. हे कळल्याबरोबर, मेगनच्या वडिलांकडून लग्नाचा प्रस्ताव आलाच.

भारतीय असो किंवा परदेशी असो, प्रत्येक आई-वडिलांना, आपल्या मुलीच्या लग्नाची घाई असतेच. आप्पासाहेबांनी सुद्धा आता उशीर लावला नाही. अशोकच्या इच्छेप्रमाणे जरी रजिस्टर लग्न करायचं होतं, तरीही गुरुजींना बोलावून चांगला दिवस काढला. साधारणपणे दोन महिन्यांचा अवधी मिळाला. तेवढ्यात अशोक त्याच्या नोकरीतही ही स्थीर झाला असता. तेवढी सवड हवीच होती. अशोकला ही सगळी घाईच वाटत होती. त्याच्या मतानी आणखी एखाद्या वर्षांनी लग्न करायला काही हरकत नव्हती. पण आप्पासाहेबांवरच्या विश्वासामुळे, त्याने त्यांना विरोध केला नाही. ते आपल्यासाठी योग्य तेच करतील, याबाबत त्याची खात्री होती.

लग्नाच्या वेळी मेगन, तिचे आई-वडील, तिचा भाऊ आणि मायरा एवढे जण येणार होते. मोहनला मात्र इतक्या लगेच सुट्टी मिळणार नव्हती. तसंच त्याच्या स्वतःच्या लग्नाच्या वेळी लागणाऱ्या सुट्टीची तरतूद आतापासूनच करायला हवी होती. रजिस्टर लग्न करायचं म्हटल्यावर, मुक्ता थोडी नाराज झाली, तिला लग्नात चांगलं मिरवायचं होतं, थाटमाट करायचा होता, पण ते काही आता जमणार नव्हतं. तरीही ती लग्न ठरल्याचं कळल्याबरोबर आली. तिने अशोकचं अभिनंदन केलं. वेळ मिळेल तेव्हा ती अशोकची चेष्टा करत होती. ती आल्याची संधी साधून,

आप्पासाहेबांनी एकदा सगळ्यांना एकत्र जमायला सांगितलं. त्यांनी मुद्दामच अशी वेळ निवडली होती, की फक्त अशोक हजर नव्हता. त्या मिटिंगमध्ये, आप्पासाहेबांनी एक घोषणा केली.

ते म्हणाले, “ आजवर अशोक आपल्या घरात राहिला. तुम्ही सर्वांनीही मला उत्तम साथ दिलीत. पण आता लग्नानंतर त्याने या घरात राहावं असं मला वाटत नाही. ”

लगेच विवेक म्हणाला, “ घेईल की तो एखादी जागा भाड्यानी. आता त्याला, नोकरीही ही बऱ्यापैकी लागली आहे.”

अशोकचं लग्नही मोहनच्या आधीच होतं आहे, अगदी साध्या पद्धतीने फारशी माणसं न बोलवता, कमी खर्चात होतं आहे, याचा विवेक व विद्याला आनंदच झाला होता. पण त्यांनी तो आनंद उघड केला नव्हता. त्यांना अशी भीती पडली होती की, की आता मोहन आणि अशोक यांची लग्न एकाच मांडवात होतात की काय? मोहनचं लग्न तर, मायराच्या इच्छेप्रमाणे भारतातच होणार होतं. आप्पासाहेबांच्या एकुलत्या एक नातवाचं लग्न, ते तर थाटातच होणार. पण तो थाटमाट अशोकच्या वाट्याला येऊ नये, त्यावर त्याचा काही हक्क नाही, असेच त्यांचे विचार होते. न बोलता, सुंठीवाचून खोकला गेला होता. आताही कारण नसतानाच विवेक मध्ये बोलला होता.

अप्पासाहेब म्हणाले, “ कोणीही मध्ये बोलू नका. अजून माझं बोलणं पूर्ण झालेलं नाही. हं! तर मी काय सांगत होतो. लग्नानंतर अशोकने या घरात राहू नये असं माझं मत आहे. त्याकरता मी, त्याच्यासाठी इथून जवळच एक चार खोल्यांचा फ्लॅट घेऊन ठेवला आहे. लग्नानंतर अशोक डायरेक्ट त्या घरात राहायला जाईल. अर्थात तो व त्याची बायको केव्हाही इथे येऊ शकतात, तो त्यांचा हक्कच आहे. मी केलेल्या या व्यवहाराची माहिती अशोकला नाही. ती त्याला कोणीही देऊ नये. ते त्याचं सरप्राईज असणार आहे. मुक्तानी तो फ्लॅट सजवण्याची व घरात लागणाऱ्या सर्व सामानाची खरेदी व मांडामांड करण्याची जबाबदारी घ्यावी, अशी माझी इच्छा आहे. काय मुक्ता, घेणार न जबाबदारी? ”

आता मुक्ता खुश झाली. लग्नात नाही मिरवायला मिळालं, नाही थाटमाट करता आला, तरी आता त्याचं घर लावताना, ती कुठेही मागेपुढे बघणार नव्हती. तिला हवं तसं ती करणार होती. आप्पांनी तिला थांबावायचं नाही, तिला वाटेल ते करू द्यायचं, तरच ती ही जबाबदारी पार पडेल, अशी अटच मुळी तिने आप्पांना घातली. त्यांनी आनंदाने होकार दिला. बैठक संपली. विवेक विद्याच्या पोटात थोडसं दुखलं, पण आप्पांनी ठरवलेली गोष्ट थांबवणं त्यांच्या आवाक्यात नव्हतं.

आप्पा म्हणाले, “ अजून माझं बोलणं संपलं नाहीये. तुमच्या कोणाच्या मनात असं येत असेल की, फ्लॅट वगैरे घेऊन द्यायची गरज काय? त्याचा त्यानी घेतला असता की पुढे. पण त्याला एखादं तरी घर देण्याची गरज माझीच आहे.” सगळयांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह दिसत होतं. “ मी आज एक गौप्यस्फोट करणार आहे. मी मुळचा केशव दामले नव्हे. मी असाच एक, रस्ता हेच ज्याचं घर आहे, असा मुलगा होतो. जे काम मिळेल ते करत होतो. काम मिळालं तरच माझं पोट भरत होतं. न मिळाल्यास उपास घडत होता. शाळा शिकण्याचा तर काही ही संबंधच नव्हता. माझ्याबद्दल माहिती मिळाल्यावर, महादेवरावांनी मला आपण होऊन बोलावून घेतलं; मला घरात आसरा दिला. शिकवलं. त्यांचा मुलगा व मुलगी अमेरिकेत स्थायिक झाल्यानी, हे त्यांचं राहातं घर न विकता, त्यांनी मला बहाल केलं. त्यांच्या मुलांनीच त्यांना तसं सुचवलं. त्यांनी मला नुसतं त्यांचं घर दिलं नाही, तर त्यांचं नाव सुद्धा दिलं, म्हणून मी केशव महादेव दामले या नावाने ओळखला जायला लागलो. त्यांच्यामुळे मला समाजात प्रतिष्ठा मिळाली. त्यांची वकिलीची प्रॅक्टिस मला मिळाली. यशस्वी होण्याचे सर्व धडे मी महादेवरावांकडूनच घेतले.

माझे आई-वडील, माझ्या लहानपणीच गेले. रस्त्यावर, झाडाखाली राहून, लोकांची छोटी मोठी काम करून, मी गुजराण

करीत होतो. मी कधी चोरीमारी केली नाही. माझं वागणं अत्यंत सच्छील होतं. माझ्याबद्दल त्यांना माहिती मिळाली, तेव्हा त्यांनी आपण होऊन मला बोलावून घेतलं. घरात ठेवून घेतलं. शाळेत शिकायला पाठवलं. आज मी जो आहे, तो केवळ महादेवरावांमुळेच.

जेव्हा विठ्ठल अशोकला घेऊन आला, तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर माझं लहानपण उभं राहीलं. मला महादेवरावांनी संधी दिली, मला आयुष्यात एक सज्जन, नागरिक बनवलं, चांगलं जीवन जगण्याची संधी दिली, त्याची ही मी केलेली परतफेड आहे, असं का म्हणनात! असं म्हणतात, की कोणी आपल्यासाठी काही केलं, आपल्याला मदत केली, आणि आपण आणि जर मदत करण्याऱ्याचे पांग फेडू शकलो नाही, तर निदान दुसऱ्याला मदत करून त्याची थोडीशी परतफेड करावी. तेच मी केलं आहे. हा उलगडा ऐकून सगळेजण भारावून गेले. आता अप्पासाहेबांच्या वागण्याचा नवाच अर्थ सगळ्यांना कळला.

विवेक आणि विद्या स्वतःच्याच मनाशी थोडे खजील झाले. अशोकला ठेवून घेण्यामागे एवढे रामायण असेल, अशी कल्पनासुद्धा त्यांना आली नव्हती. थोडा वेळ कोणीच काही बोललं नाही. सुचतच नव्हतं काय बोलावं ते! क्षणार्धात

अशोकच्या जागी आप्पासाहेब उभे आहेत असं वाटलं. आप्पासाहेबांना महादेवरावांनी जवळ केलं नसतं तर! असा विचार प्रत्येकाच्या मनात येऊन गेला.

विवेक आप्पासाहेबांनी जवळ जाऊन उभा राहिला. त्यांनी त्यांना वाकून नमस्कार केला आणि म्हणाला, “ आप्पा, मला क्षमा करा. तुम्ही अशोकला घरात ठेवून घेतलंत ही गोष्ट मला मुळीच आवडली नव्हती. आपल्याला काय गरज आहे, रस्त्यावरच्या मुलाचा विचार करायची? असंच मला वाटत होतं. आज माझे डोळे उघडले. हे एक मोठं सामाजिक कार्यच आहे. अशोकला तुम्ही जवळ केलंत, त्याच्यावर चांगले संस्कार केलेत, त्याला शिकवलंत, समाजाला एक चांगला नागरिक मिळाला. हे तुम्ही केलं नसतं तर, कदाचित अशोक चोर बनला असता. कदाचित असं रस्त्यावर राहतानाच त्याच्या जीवनाचा अंत झाला असता. मी चुकलो. मला क्षमा करा. तुमच्या वागण्याकडे मी वेगळ्याच दृष्टिकोनानी पाहिलं. तुमच्या वागण्याचा अर्थच मला कळला नाही. आता तुम्ही जे सांगितलंत, ते तसं नसतं, तरीही तुम्ही केलेली गोष्ट योग्यच होती. मला क्षमा करा. मी अशोकशी कधी वाईट वागलो नाही; पण चांगलाही कधी वागलो नाही. मनातून मी नेहमी मी त्याचा रागच केला. मला तुमच्या मनाचा मोठेपणा समजलाच नाही. मला क्षमा करा.”

विवेकचं हे बोलणं ऐकून, विद्याही उठली. तीही आप्पासाहेबांजवळ जाऊन उभी राहिली. ती म्हणाली, “ मला तर अशोक कधीच आवडला नाही. या रस्त्यावरच्या मुलाला, माझ्या मुलांच्या बरोबरीने सगळ्या गोष्टी मिळाव्यात, याचं मला नेहमीच वैषम्य वाटत आलं आहे. घरात मला अशोकसाठी  चार गोष्टी कराव्या लागल्या. मी त्या नाईलाज म्हणून केल्या. त्याच्यामागे माझी चांगली भावना नव्हती. तुम्हालाही हे कळत होतं, पण तुम्ही त्यावरून मला कधी काही बोलला नाहीत. चुकले मी आप्पा, एक स्त्री असून, एका छोट्या अनाथ मुलाकडे मला सहानुभूतीने पाहता आलं नाही, अक्षम्य आहे ही गोष्ट. पण तरीही, मी तुमच्याकडे क्षमायाचना करते आहे.” असं म्हणून तिने सुद्धा आप्पासाहेबांना वाकून नमस्कार केला. या घटनेनंतर सगळयांच्याच अशोककडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.

लग्नानंतर अशोकने अप्पासाहेबांकडे न जाता नव्या सुनेला घेऊन, आपल्या घरी चलावं अशी सूचना, अशोकचे मामा वारंवार करत होते. पण कोणीच त्यांच्याकडे फारसे लक्ष दिले नाही. त्याच्या सूचनेचा विचार करू असं सुद्धा दर्शवलं नाही. त्यांनी मात्र आपलं टुमणं लावून धरलं होतं

ठरल्याप्रमाणे मेगन तिचे आई-वडील व मारिया सुद्धा लग्नाकरता भारतात आले. मारियाला तर मोहनच्या एकत्र पद्धतीच्या घराची मोहिनीच पडली होती. ती काय भारतात येण्याची संधी सोडणार! मेगनच्या आईच्या मनात थोडी खुटखुट होती. त्यांना सारखं वाटत होतं, की मेगनला स्वतःचं स्वतंत्र घर मिळावं. त्याकरता आपण अशोकला एक मोठा फ्लॅट घेऊन द्यायची आपली तयारी आहे, ही गोष्ट त्यांनी आडवळणांनी सुचवली सुद्धा होती. पण कोणीच त्यांच्या या सूचनेचा विचार फार गंभीरपणे केला नाही. त्यामुळे त्यांनाही काही फारसं करता आलं नाही. शिवाय मेगनच्या वडिलांनी त्यांना समजावून सांगितलं, की आतापासून असलं काही बोलू नकोस. काय होतंय, आप्पासाहेब काय करणार आहेत, ते आपण पाहूया; आणि मगच याबाबतीत आप्पासाहेबांशी बोलू. आत्ताच घाईघाईने हा विषय काढू नये. मग त्यांनी पुन्हा हा विषय काढला नाही.

अशोकच्या मामांनी सुद्धा अनेकदा असं सुचवलं, की लग्नानंतर अशोकने आप्पासाहेबांकडे जाण्यापेक्षा स्वतःच्या घरी म्हणजे त्यांच्याकडे राहावयाला येणे जास्ती उचित होईल. पण त्यांच्या या सूचनेवर कोणी विचार करणं राहोच, पण त्याची दखलसुद्धा कोणी घेतली नाही. ते पुन्हा पुन्हा हा विषय काढत

होते, पण कोणीच त्यांच्याकडे लक्ष दिलं नाही. सगळेजण अशोकच्या लग्नाच्या उत्सवात आणि आनंदात दंग होते.

यथावकाश नोंदणी पद्धतीनंच अशोकचं लग्न झालं. अशोकच्या सासऱ्यांनी एका उत्तम हॉटेलमध्ये सर्वांना पार्टी दिली. आता वरात घरी जायची वेळ आली. अशोकच्या सासऱ्यांनी त्याच्यासाठी एक छानशी चारचाकी अप्पासाहेबांच्या सल्ल्यानीच घेतली होती. ही गोष्ट मेगनला माहीत होती, पण तिने सुद्धा ती अशोकपर्यंत त पोहोचू दिली नव्हती. वरात घरी नेण्याकरता सजवलेली वेगळीच गाडी पाहून अशोक जरा गोंधळला; पण बोलला मात्र काही नाही. मेगन व अशोक गाडीत बसले. मुक्ता, मेगनची नणंद म्हणून पुढे बसली. पण गाडी घराकडे न जाता, भलतीकडेच वळलेली बघून, हा काय प्रकार आहे, हे अशोकला समजेना. एवढ्यात एका मोठ्या इमारतीसमोर गाडी थांबली. आप्पासाहेबांनी अशोकला तिथे उतरायला सांगितलं. सगळ्यांनी गुप्तता पाळली होती, म्हणून अशोकला घराबद्दल कळलंच नव्हतं.

अशोकचं नवं सजवलेलं घर, नवदाम्पत्याची आतुरतेनं वाट बघत होतं. अशोकच्या चेहऱ्यावर मोठं थोरलं प्रश्नचिन्ह होतं. तो काहीतरी विचारणार, तेवढ्यात आप्पासाहेबांनी हातानेच त्याला थांबण्याची सूचना दिली. बाकी सर्व मंडळी, आधीच घरी आली

होती. मुक्ता चटकन उतरून घरात आली. ती आणि ललिताबाई औक्षणाची तयारी घेऊन दारात उभ्या होत्या. त्यांनी पायावर पाणी घालून, औक्षण करून, नवदाम्पत्याला घरात घेतलं. त्याच क्षणी आप्पासाहेबांनी अशोकच्या हातात फ्लॅटची चावी दिली. त्या पाठोपाठ मेगनच्या वडिलांनी गाडीची चावी सुद्धा अशोकच्या हातात दिली.

आता अशोक च्या लक्षात हा सगळा बनाव आला. त्याचा घसा दाटून आला होता. या विषयावर बोलायला त्याला शब्द सुचत नव्हते. अशोकच्या हातात, किल्ली दिलेली बघून, मेगनची आई, आणि अशोकचे मामा काय समजायचं ते समजले. लक्ष्मीपूजनाची सर्व तयारी झालेली होती. लक्ष्मीपूजनाच्या वेळेला अशोकनी मेगनचं नाव मेगनच्या ऐवजी ‘मेघना’ असं ठेवलं; आणि मेघना या शब्दाचा अर्थसुद्धा त्याने तिला समजावून दिला. नंतर मेघनाच्या हस्ते सर्वांना आटीव दूध देण्यात आलं. सगळीकडे नुसता आनंदी आनंद होता. एका सुंदर ऋणाची तितकीच सुंदर परतफेड झाली होती.

# आव्हान

सुखदा विचार करत बसली होती. कालच तिची नणंद, डॉ विशाखा आपल्या घरी परत गेली होती. तिला झालेला अपघात, ती व तिचा नवरा डॉ अनुराग यांना झालेल्या गंभीर जखमा. त्यांची करावी लागलेली सुश्रुषा, त्या काळात निर्माण झालेला विहानच्या अभ्यासाचा आणि वागण्याचा प्रश्न. एक ना दोन! नानाविध विचारांनी तिचं मन व्यापून गेलं होतं. आता तर एक नवीनच आव्हान तिच्यापुढे उभं ठाकलं होतं. वर्षानुवर्षे मागे पडलेला, घर विकत घेण्याचा विचार आता घाईनी अमलात आणायला हवा होता. पैशांची बरीच जुळवाजुळव करावी लागणार होती. त्याकरताच खरंतर ती वेळ काढून बसली होती.

पण आज तिचं मन वेगळ्याच विचारात गढून गेलं होतं. तिला वाटलं आपल्या आयुष्यात आपल्याला निवांतपणे थांबायला, विचार करायला वेळच मिळाला नाहीय कधी. विनायकाशी लग्न करण्याचं धनुष्यं आपण पेललं खरं, पण गेली २० / २२ वर्षं कशी

व कुठे पळाली समजलंच नाही आपल्याला. सतत आपण समोर येणारं आव्हान स्वीकारत गेलो; आणि यशस्वीरीत्या ते पेलत गेलो.

खरंतर विनायकाशी लग्न करणं हेच एक आव्हान होतं आपल्यासाठी. आई-बाबांनाही हे लग्न फारसं पसंत नव्हतं. पण हे आव्हान स्वीकारण्यात आपली चूक झाली, असं वाटण्याची वेळ तिच्यावर कधीच आली नाही. बेताच्या परिस्थितीत, येणाऱ्या सगळ्या जबाबदाऱ्या सांभाळत, तिचा साधासुधा संसार आनंदाचा झाला होता. विनायकाने तिला चांगली साथ दिली होती. तिच्या नणंदांना तिच्या त्यागाची आणि कष्टाची जाणीव होती.

ह्या गोष्टींचा उल्लेख तिनी स्वतः कधीच केला नव्हता. आधी जरा नाराज असलेली तिची आई सुद्धा आता विनायकवर खुश होती. काय कमी आहे आपल्या घरात? असा प्रश्न ती स्वतःलाच विचारत होती. खूप नव्हता, पण दोघांना मिळून पुरेसा पैसे मिळत होता. थोडीफार चैनही करता आली होती. दोन महत्वाचा गोष्टी करणं मात्र जमलंच नव्हतं. एक म्हणजे कधी लांबचा प्रवास करणं जमलं नव्हतं आणि घर विकत घेण्याचा विचारही कधी मनात आणता आला नव्हता. आज आता ती वेळ आली होती. सुखदाचं मन समाधानानी भरून आलं.

तिला आठवली तिची आणि विनायकाची पहिली भेट. विनायकचं व्यक्तिमत्व अफाट होतं. उंचापुरा, घारा - गोरा विनायक सगळयांच्या डोळयात भरायचा. त्याच्याजवळ बुद्धिमत्ताही होती. पण त्यांच्या घरी लक्ष्मीचा खडखडाट होता. त्यामुळे विनायकला उच्च शिक्षणाची संधी मिळाली नाही. दहावी पास झाल्यावर ITI चा कोर्स करुन, नोकरीच्या मागे धावावं लागलं. विनायकला वाटत होतं की एकदा नोकरी लागली, की जरा स्वस्थता येईल. मग आपण बाहेरून बारावीची परीक्षा देऊ. पण त्याच्या मनातले मांडे मनातच राहिले.

विनायक नोकरीला लागला आणि हृदयविकाराच्या धक्क्यानी त्याचे वडील देवाघरी गेले. तेव्हा विनायक अवघा वीस एकवीस वर्षाचा होता. आता आपला पुढे शिक्षण घेण्याचा बेत रहितच करावा लागणार, हे त्याला कळून चुकलं. धाकट्या दोन बहिणी विदुला आणि विशाखा, शाळेत पाचवी आणि आठवीत शिकत होत्या. त्यांची सगळीच जबाबदारी आता विनायकवर पडणार, हे आता ओघानीच आलं. विनायक मनातून खट्टू झाला. पण आल्या परिस्थितीवरचा इलाज कोणा जवळच नव्हता, त्यामुळे ही गोष्ट त्याने मनोमन स्वीकारली.

विनायकची आई कष्टाळू होती. कष्टाळूपणाचा वसा विनायकनी आईकडूनच घेतला होता. विनायकच्या वडिलांच्या अचानक जाण्यानी, आणि विनायकवर अचानक पडलेल्या जबाबदारीच्या जाणिवेनी विनायकची आई खचून गेली होती. अंथरुणावर पडून नव्हती, पण तिला सारखं काहीतरी होत असायचं. सतत डॉक्टरांची मदत घ्यावी लागायची. खर्चाचं एक नवीन दालन उघडलं होतं. त्यामुळे विनायकच्या एका नोकरीचे पैसे पुरेनासे झाले. संध्याकाळी घरी आल्यावर, पुन्हा काहीतरी काम करण्याची गरज निर्माण झाली. विनायकच्या हुशारीमुळे त्याला एका प्रिंटिंग प्रेसमध्ये प्रूफ रीडिंगचं काम मिळालं. त्यांनी ते नीट शिकूनही घेतलं.

या नव्या कामामुळे पैशाची तोंड मिळविणी होऊ लागली. घराला किंचितसं स्वास्थ्य आलं. त्याच्या बहिणींनाही घरातलं कामकाज करुनच शाळा व अभ्यास सांभाळावा लागायचा. पण त्याही समजूतदार होत्या, त्यांना परिस्थितीची जाण होती, त्यामुळे सगळ्याच गोष्टी जरा लागी लागल्या होत्या. विनायकाला आता चोवीस संपून पंचवीसावं वर्ष लागलं होतं. आईला त्याच्या लग्नाची घाई झाली होती. आपल्या डोळयादेखत त्याचं लग्न व्हावं, अशी तिची इच्छा होती. पण विनायकला इतक्या घाईनी

लग्न करायचं नव्हतं. आधी बहिणींची जबाबदारी पार पाडायची, मग आपला स्वतःचा विचार करायचा, असे त्याचे विचार होते.

एक दिवस प्रेस मधून घरी येताना, त्याला रस्त्याच्या एका वळणावर एक मुलगी उभी असलेली दिसली; तिला मागे टाकून तो पुढे निघाला, एवढ्यात कोणीतरी आपल्याला हाक मारतंय असं त्याला वाटलं. त्याने मागे वळून बघितलं, तो तीच मुलगी त्याला काहीतरी विचारत होती. तो मागे फिरला. तिच्याजवळ आला.

ती म्हणाली, “ मी या गावात नवीन आहे. मला घराचा पत्ता माहितीये, पण रस्ता सापडत नाहीये. तुम्ही मला मदत कराल का? ”

विनायकनी विचारलं, “ आधी पत्ता तर सांगा तुमच्या घराचा. ”

तिने पत्ता सांगितला. तो म्हणाला, “ मी राहतो त्याच्या जरा पुढेच आहे तुमचं घर. चला माझ्याबरोबर.”

विनायकच्या बरोबर ती मुलगी चालायला लागली. विनायक काही न बोलता चालत होता.

पण ती मुलगी बोलघेवडी असावी. आपण कुठून या गावात राहायला आलो, का आलो, हे सगळं तिनी सांगून टाकलं. त्याच्याकडे विनायकचं कितपत लक्ष होतं, देवच जाणे! ती पुढे

म्हणाली, “ हे काय? तुम्ही तर काहीच बोलत नाही. मला तुमचं नाव तरी सांगा.”

आता विनायक भानावर आला. त्याला तिच्याशी बोलणं वाढवण्याची इच्छा नव्हती. तो म्हणाला,

“ नाव विचारून काय करायचंय? आपण थोडी नेहमी भेटणार आहोत? ”

ती म्हणाली, “ का बरं? आपण ठरवलं तर नेहमी भेटू शकतो. एकाच बाजूला तर राहतो आपण.”

विनायकनी नाईलाजानी आपलं नाव सांगितलं. त्यांनी न विचारताही तिनं आपलं नाव सांगून टाकलं. तिचं नाव होतं ‘ सुखदा.’ ती पुढे म्हणाली, “ तुम्ही काय करता? ”

“ मी एका छोट्या कंपनीत काम करतो.” विनायक.

विनायकच्या दिसण्याशी त्याचं हे उत्तर तिला विसंगत वाटलं. ती म्हणाली, “ मला वाटलं, तुम्ही कॉलेजमध्ये जाता.” याच्यापुढे हे बोलणं ताबडतोब थांबावं, असं विनायकला वाटत होतं. म्हणून यावर तो काहीच बोलला नाही. तिला मात्र बोलणं थांबवायचं नसावं. म्हणून तिनी आपण BA झालो असून पुढे law करण्याचा आपला विचार आहे, हे देखील त्याला सांगून टाकलं. ती का बोलणं वाढवते आहे, हे विनायकला समजेना. एवढ्यात त्याचं घर

आलं. त्याने तिला पुढला पत्ता सांगितला आणि तो आपल्या घराकडे वळला. पण ती त्याला म्हणाली,

“ हे काय तुमचं वागणं? मी या गावात नवीन आहे. मला तुम्ही माझ्या घरापर्यंत सोडा.” मनातल्या मनात जरा चडफडतच विनायक मागे वळला. काही न बोलता, तिच्या पुढे चालायला लागला. ती म्हणाली, “ अहो थांबा थांबा, मला आता पळायला लावणार आहात का तुम्ही? ” विनायकला थांबावं लागलं. ती पुढे म्हणाली, “ असे कसे हो तुम्ही? जरा नीट बोललात, तर आपला वेळ तरी चांगला जाईल, एवढंही लक्षात येत नाही तुमच्या? ”

आता मात्र हद्द झाली. कुठून आपण या मुलीशी बोललो असं विनायकला वाटायला लागलं. पण आता वेळ निघून गेली होती. तिच्या घरापर्यंत जाणं आता भागच होतं. तिचं बोलणं चालूच होतं. विनायकनी ‘ हो - नाही, ‘ इतपत उत्तर दिलं, तरी तिला पुरत होतं. तिचं घर आलं. “ Thank you.” म्हणत ती घराकडे निघाली. विनायक मागे वळला, ती म्हणाली, “ अहो घरात तरी या.”

“ मी आता फार घाईत आहे, ” असं म्हणून विनायक चालायला लागला. सुखदा त्याच्याकडे पाहताच राहिली. पहिल्या नजरेतच तो तिला फार आवडला होता. त्याचा फटकळपणाही तिला आवडून गेला. इतर तरुणांसारखा लघळपणाचा लवलेशही

त्याच्या ठायी दिसत नव्हता. तिच्या तो चांगलाच लक्षात राहिला. विनायकने तर तिची दखलही घेतली नव्हती.

तो घरी आला आणि त्याच्या कामांमध्ये बुडून गेला. कोण कुठली सुखदा, किंवा इतरही कोणी तरुणी त्याला त्याच्या ध्येयापासून विचलित करू शकणार नव्हती. पण सुखदाचं तसं झालं नाही. तिला तो पुन्हा पुन्हा आठवत राहिला. आपण त्याला पुन्हा कधी भेटू शकू, याचा विचार राहून राहून तिच्या मनात येत राहिला.

विनायकच्या बहिणी अभ्यासात हुशार होत्या. विनायक घेत असलेल्या कष्टांचं चीज होत होतं. विशाखा ९७ % गुण घेऊन दहावी पास झाली होती. आपल्याला याच्यापुढे शिकता येणार नाही, याची तिला कल्पना होती. तशी तिच्या मनाची तयारीही होती.

जेव्हा विनायक तिला म्हणाला, “ जा, आज कॉलेजातून फॉर्म घेऊन ये.”

तेव्हा ती अबोल झाली. वयानी फारशा मोठ्या नसलेल्या, आपल्या भावाच्या मनाचा मोठेपणा पाहून ती सद्गदित झाली. तिचा गळा दाटून आला. तिला बोलता येईना. तिची ही स्थिती बघून विनायक तिच्याजवळ आला. तिच्या पाठीवर हात फिरवून, तो

तिला म्हणाला, “ अगं विशाखा, आता तरी हास, आता तुम्ही कॉलेज क्वीन होणार. विशाखाला खरंच हसू आलं. अजून admission चा पत्ता नाही आणि आपण कॉलेज क्वीन.

ती म्हणाली, “ , मी सुद्धा एखादी नोकरी बघते; तू एकटा किती कष्ट करणार? ”

“ मी असताना, तुला नोकरी बघायची काहीच गरज नाही. तू हुशार आहेस. मी तुम्हा बहिणींना, तुम्ही शिकाल, तितक्या शिकवणार आहे. दादा आहे मी तुमचा. मला जबाबदारी घ्यायला नको? आता इतर काही विचार न करता, कॉलेजचा फॉर्म घेऊन ये. तुझ्या दादाची आज्ञा समज.” विनायक

विशाखानी आनंदानी दादाला मिठीच मारली. तिच्या पाठीवर थोपटल्यासारखं करून विनायक आपल्या कामाला गेला. त्यांचा संवाद ऐकून सुखावलेल्या आईनी हळूच डोळे पुसले.

यथावकाश फॉर्म आला. विशाखा कॉलेजमध्ये जायला सुद्धा लागली. विशाखानी नोकरी नाही केली, पण तिने 2 / 3 मुलांच्या शिकवण्या सुरू केल्या. अर्थात विनायकला हे अजिबात आवडलं नाही. पण विशाखानी त्याला दाद दिली नाही. विशाखानी विज्ञान शाखेत कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. विदुलाही विशाखाच्या पावलावर पाऊल टाकून वाटचाल करत होती. आपल्याला तर

शिकायला मिळालं नाही, पण आपण आपल्या बहिणींना त्या शिकतील तितकं शिकवायचं, असे विचार नेहमीच विनायकच्या मनात येत. त्याकरता आपल्याला कितीही कष्ट घ्यावे लागले, तरी आपण मागे फिरायचं नाही, विनायकने मनोमन असा निश्चय केला होता.

इकडे सुखदाच्या मनात मात्र विनायक घर करून बसला होता. कितीही प्रयत्न केला, तरी सुखदा विनायकला विसरू शकत नव्हती. एकाच बाजूला त्यांची घरं असल्यामुळे तिला अधून मधून विनायक दिसत असे. पण विनायकचं मात्र तिच्याकडे अजिबात लक्ष नसायचं. सुखदाही तिने ठरवल्या सारखी एल एल बी झाली. तिनं सनदही काढली. आता घरात तिच्या लग्नाबद्दल बोललं जाऊ लागलं. सुखदा त्याकडे लक्ष देत नसे. पण जेव्हा आई फारच मागे लागली, तेव्हा तिने विनायकबद्दल सांगितलं. आपली त्याच्याशी फार ओळख नाही, पण आपल्याला तो आवडतो, हे ही सांगितलं. त्याचं घर पण दाखवलं.

आपली एवढी एल एल बी झालेली मुलगी, ती उगाचच काहीतरी बोलत नसणार; तेव्हा ती काय म्हणते आहे, त्याचा निदान विचार तरी आपण केला पाहिजे, एवढी समजूत सुखदाच्या आई-वडिलांजवळ होती. विनायकचं घर जवळच होतं, पण त्यांनी काही

त्याला कधी पाहिलं नव्हतं. सुखदाच्या म्हणण्यानुसार ते विनायकच्या घरी गेले.

त्यांनी आपला येण्याचा उद्देश विनायकच्या आईला सांगितला. त्यांचं बोलणं ऐकून, विनायकची आई अतिशय संकोचली. तिलाही विनायकचं लग्न करण्याची घाई झाली होती. पण तरीही हे स्थळ आपल्या आवाक्याबाहेरचं आहे, हे तिच्या लक्षात आलं होतं.

विनायकची सगळी माहिती कळल्यावर, विनायक जरी चांगला मुलगा असला, तरी शिक्षणाच्या बाबतीत तो मागे असल्यामुळे, सुखदासाठी हे स्थळ योग्य नाही, असं त्यांना वाटलं. घरी आल्यावर, त्यांनी सर्व माहिती सुखदाच्या आईला सांगितली. त्याबरोबरच हे स्थळ आपण पाहायचं नाही, हे ही त्यांनी सुखदाच्या आईला सांगितलं. विनायकच्या आईलाही या गोष्टीचा अंदाज आलाच होता. त्यामुळे तिनी ही गोष्ट विनायकला सांगितली सुद्धा नाही.

सुखदाला विनायक नोकरी करतो, एवढंच माहिती होतं. तिच्या वडिलांनी तिला विनायक बद्दलचीची सर्व माहिती सांगितली. विनायकच्या घरची परिस्थिती एव्हढी चांगली नाही. पण त्याहीपेक्षा त्याचं शिक्षण अगदीच बेताचं आहे; त्याची

मिळकतही बेताचीच आहे, शिवाय त्याच्यावर दोन बहिणींची जबाबदारीही आहे. तेंव्हा त्याचा विचार आपण करू शकत नाही, ही गोष्टं त्यांनी स्पष्टपणे सुखदाला सांगितली. त्यावर सुखदा काहीच बोलली नाही. त्यामुळे हा विषय इथेच संपला असं त्यांना वाटलं.

पण तसं नव्हतं. सुखदा विनायकाला विसरू शकली नव्हती. एकदा तिने विनायकाला बाहेरच्या बाहेर गाठून त्याच्याशी बोलण्याचा प्रयत्न्य केला. पण विनायक तिच्या थाऱ्यालाही उभा राहायला तयार नव्हता. हे होणे नाही, हे त्याला ठाऊक होतं.

तिच्या आणि त्याच्या परिस्थितीतलं अंतर तो जाणून होता.

पण सुखदा गप्प बसणाऱ्यातली नव्हती. काहीच जमेना तेंव्हा ती एकदा संधी साधून विनायकाच्या घरी गेली. विनायक घरी नव्हता. त्याचं तिला बरंच वाटलं. ती विनायकाच्या आईशी बोलली. विनायकाच्या आईनी तिला स्पष्टपणे सांगितलं, की तिच्या हातात काही नाही. विनायक जे ठरवेल तेच होणार.

आता मात्र तिचा नाईलाज झाला. ती विचारात पडली. आता तिला उलगडा झाला. या बाबतीत आपले वडीलच काहीतरी करू शकतील, हे तिला उमगलं. ती स्वभावानी धीट होती; स्पष्टवक्ती होती. शिवाय तिचा वकिलीपेशा, म्हणजे आपला मुद्दा बोलून, लोकांच्या गळी उतरवण्याचा. तिनं आपल्या वडिलांशीच पुन्हा

एकदा बोलायचं ठरवलं. आता निर्णायकच बोलायला हवं होतं. तिसऱ्यांदा आपल्याला हा विषय बोलायची संधी मिळणार नाही हे ती जाणून होती.

संधी पाहून तिनं पुन्हा वडिलांजवळ हा विषय काढला. ते म्हणाले, पुन्हा पुन्हा कोळसा उगाळत बसू नकोस. मी तुझ्याकरता आपल्या तोलामोलाचं स्थळ पाहिलं आहे. सगळं ठरलं म्हणजे मी तुला सांगणारच होतो. “ मला न विचारता तुम्ही माझं लग्न ठरवणार होतात? ” सुखदा.

तिचे बाबा हा प्रश्न ऐकून हसले. ते म्हणाले, “ लग्न ठरल्यावर नाही. कधी भेटायचं ते ठरल्यावर. त्यांना वेळ व्हायला हवा; आपल्यालाही तेंव्हा वेळ हवा. परवा भेटू असं मी त्यांना कळवलं आहे. आज त्यांच्या फोन येईल. मग मी तुला सांगणारच होतो. चांगला आहे मुलगा. ते चांगले सुखवस्तु व श्रीमंत आहेत. त्या घरात तुला काही कमी पडणार नाही.”

“ बरोबर आहे तुमचं; मला सगळं मिळेल, फक्त नवरा माझ्या मनासारखा मिळणार नाही.” सुखदा.

“ काहीतरी  बोलू नकोस. आवडेल तुला अभिजीत.चांगलं जुळेल तुमचं.” बाबा.

“ म्हणजे मला जुळवून घ्यावं लागेल, असा त्याचा सरळ अर्थ आहे.” सुखदा.

तिचं हे तिरकस बोलणं ऐकून बाबा जरा रागावले. ते म्हणाले, “ तुझ्या हिताचाच विचार करतो आहे.”

“ बाबा, मला वाटतं मी सुद्धा माझ्या नुसत्या भल्याचाच नव्हे, पण आवडीचा सुद्धा विचार करू शकते नाही का? ” सुखदा.

बाबा म्हणाले, “ बेटा, माझ्या बोलण्याला अनुभवाचा बेस आहे.”

“ मलाही अनुभव घेऊ द्या की!” सुखदा.

आज सुखदाचा नूर काही वेगळाच आहे, आज ती शब्दाला शब्द देते आहे, तेंव्हा आता बोलणंच टाळावं, असा विचार करून ते म्हणाले, बरं बोलू या आपण कधीतरी. आता मला काम आहे.

पण सुखदाही काही कमी नव्हती. वकील होती ती. तिनी बाबांची ही चोरी बरोबर पकडली. ती म्हणाली, “ बाबा, असं बोलणं टाळू नका. तुम्हाला माहीत आहे मी काय बोलायला आले आहे ते.”

तिचं हे बोलणं ऐकून, तिची आईही बाहेर आली, ती म्हणाली, “ फार शहाणपणा दाखवू नकोस. तुला भिकेचे डोहाळे लागले आहेत, आम्ही ते पुरवू शकत नाही.”

तिच्या आईचं बोलणं ऐकून, बाबांनीच तिला विरोध केला, “ ते तिला म्हणाले, वेडंवाकडं बोलू नकोस. आपली मुलगी वेडी नाहीय. ती शिकलेली आहे. विचारी आहे शिवाय, ती आता सज्ञानही आहे. ही गोष्टं विसरू नकोस.”

हे बोलणं ऐकून आई तर भडकलीच. ती म्हणाली, “ काय करेल ती! आपल्या मनाविरुद्ध जाऊन त्या भिकारड्या मुलाशी लग्न करेल? मला धाक दाखवलाय तुम्ही?”

आता तर बाबाही जरा रागावले. ते म्हणाले, “त्या मुलाला भिकारडा म्हणून त्याचा अपमान करू नको. त्यानी काहीच केलेलं नाही. तो आपल्या मुलीच्या मागे लागलेला नाही. आपल्या मुलीला तो आवडला आहे. तिला त्या मुलाशी लग्न करण्याची इच्छा आहे. त्याच्या बाजूने काही प्रस्ताव आलेला नाही. “

आई जरा वरमली. हा विषय ऐरणीवर आल्याचं पाहून, सुखदा खूश झाली. मनातल्या मनात तिनी आईचे आभारच मानले. आईच्या बोलण्यामुळे बाबा, अडकले. ती मनातल्या मनात हसली. तिला हवं होतं तेच घडत होतं. आता ही संधी हातची जाऊ द्यायची नाही.

ती पुढे सरसावली. ती म्हणाली, “ बाबा तुम्ही तुमच्या मुलीला समर्थ बनवलं आहे. माझ्या मनगटात दम आहे. मी

विनायकवर बोजा बनून राहणारी मुलगी नाही, हे तुम्ही जाणता. मला त्याची साथ हवी आहे नवरा म्हणून."

बाबांच्याही लक्षात आलं, की आता सुखदाला थांबवणं अवघड आहे. तेंव्हा ते म्हणाले, आता हा वाद नको. आज रात्री आपण या विषयावर बोलू या. आत्ता सगळ्यांनाच आपापली कामं आहेत. सुखदाला हेच हवं होतं. आई मात्र मनातून चडफडली. ती म्हणाली, " तुमचीच तिला फूस आहे." ही गोष्टं अगदी खोटी होती. पण आईला भान राहिलं नव्हतं.

सगळेच आपापल्या कामासाठी पांगले.सुखदा डबा घेऊन कोर्टात गेली. बाबा त्यांच्या कारखान्यात जायला निघाले. आई त्यांना म्हणाली, ' जेवूनच जा की आता. "

"बरं "म्हणत बाबा आत गेले. आईही त्यांच्या पाठोपाठ आत गेली. त्यांना वाढता वाढता आईनी पुन्हा तोच विषय काढला. ती म्हणाली, "काय अगोचर आहे ही सुखदा! काय पाहिलं आहे तिनी या मुलात? ना शिक्षण - ना पैसा. शिवाय दोन बहिणीची जबाबदारी. एवढं असून मिजास किती? तो तर तिच्याकडे पाहायलाही तयार नाही. "

बाबा हसले, ते म्हणाले, तोच तर त्याचा गुण आहे. एखादा मुलगा असता, तर त्यानी या संधीचा फायदा घेतला असता.

“त्यामुळे आपल्या मुलीच्या त्याच्याबद्दलच्या आकर्षणात भरच पडली आहे. असो आता हा विषय नको. रात्री बोलूया.”

संध्याकाळी घरी परत येतांना सुखदाला विनायक दिसला. तिने भराभरा पुढे जाऊन त्याला गाठलं. ती त्याला म्हणाली, “ माझ्याशी बोलायचं सुद्धा नाही का? ”

विनायक म्हणाला, “ तुमचा माझा संबंध काय बोलण्याचा? ”

“ वाढवला तर वाढू शकतो. ” सुखदा.

“ पण मला संबंध वाढवण्याची इच्छा नाही. ” विनायक.

“ पण मला तुमच्याशी बोलायचं आहे. आज तुम्ही मला टाळू शकणार नाही. आपण एखाद्या जवळच्या हॉटेलमध्ये जाऊ या, म्हणजे नीट बोलता येईल.” सुखदा.

“ वेळ नाही.” विनायक.

“ वेळ नाही कसा? हा माझ्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. ” सुखदा.

तिचं बोलणं ऐकून विनायक थक्क झाला. काय बोलावं हे त्याला सुचेना. तो गप्प बसलेला पाहून सुखदानी आपलं म्हणणं पुढे रेटलं. “ इथे जवळच एक चांगलं हॉटेल आहे, चला मी दाखवते तुम्हाला.” सुखदा म्हणाली.

आता विनायकाचा नाईलाज झाला. त्याला तिच्या पाठोपाठ जावंच लागलं. हॉटेल जवळच होतं. पण असल्या गोष्टींना विनायकाच्या जीवनात थाराच नव्हता. त्यामुळे त्याचं कधी या हॉटेलकडे लक्षच गेलं नव्हतं.

हॉटेलमध्ये एक बाजूला असलेलं टेबल सुखदानी निवडलं. दोघंही बसली. वेटरनं लगेच पाणी आणून ठेवलं. विनायकाला पाण्याची गरजच होती. हे काय चाललं आहे हेच त्याला कळत नव्हतं. तो अस्वस्थ झाला होता. त्याची नजर भिरभिरत होती.

“ माझ्याशी बोलूच नये, इतकी मी वाईट आहे का? ” सुखदा.

उत्तर देतांना विनायक चांचरला, काहीसा अडखळत तो म्हणाला, “तसंच काही नाही. ”

“ मग कसं आहे?” सुखदा.

यावर काय बोलावं, हे विनायकाला समजेना. तो गप्पच राहिला. तेंव्हा सुखदा पुढे म्हणाली, “ मग अगदी धरून - बांधून आणून बसवल्यासारखे काय बसला आहात! विचारा मला की आपण इथे का आलो आहोत? निदान रागवा तरी माझ्यावर.”

“ रागावण्याचा काय संबंध? तुम्ही असं काय केलं आहे? ” विनायक.

आता मात्र सुखदाला हसू आवरेना. हसत हसत ती म्हणाली, “ अहो तुमच्या इच्छेविरुद्ध मी तुम्हाला इथे आणून बसवलं आहे, हेच नाही का रागावण्याचं कारण होऊ शकत? ”

तिचं हे बोलणं ऐकून विनायकालाही हसू आलं. वातावरणातला ताण जरा कमी झाला.

तो म्हणाला, “ काय काम होतं? ”

“ तुम्हाला भेटायचं होतं.” सुखदा.

“ पण कशाकरता? आपला संबंधच काय आहे? ” विनायक.

“ अहो, तो संबंध यावा, म्हणूनच भेटायचं होतं.” सुखदा.

तिची स्पष्टोक्ती ऐकून विनायक गांगरलाच. त्यावर काही बोलणंच त्याला सुचेना.

सुखदा पुढे म्हणाली, “ आपण दोघांनी जीवनाला एकत्रित सामोरं जावं असं मला वाटतं. “

“ पण कां? ” विनायक.

“ मला तुम्ही आवडता.” सुखदा.

“माझ्यात काय आहे आवडण्यासारखं? ” विनायक.

“ ते माझ्या नजरेनी पाहिल्याशिवाय कळायचं नाही.” सुखदा.

“ आपल्यात काहीच सारखं नाहीये. तुम्ही इतक्या शिकलेल्या, मी साधा ITI. तुम्ही श्रीमंत, सुखवस्तू. मी चाळीत दोन खोल्यात राहणारा.” विनायक.

“ poles attract each other. पण इथे सारा एकतर्फीच मामला आहे.” सुखदा.

आता मात्र शर्थ झाली या मुलीची, असं विनायकाला वाटलं. तो म्हणाला, “ माझ्याबद्दल काय माहिती आहे तुम्हाला? ” विनायक.

त्यावर सुखदानी विनायकाची सगळी माहिती घडाघडा म्हणून दाखवली. विनायक चकितच झाला ते ऐकून. तो म्हणाला, “ सगळं बरोबर सांगितलंत. पण यात आवडण्याजोगं काय आहे? ”

“ तुम्हीच आहात आवडण्याजोगे. ” सुखदा.

विनायकला काय बोलावं ते सुचेना. इतक्यात चहा आला, त्यामुळे विनायकची सुटका झाली. विचार करायला जरा वेळ मिळाला.

चहाचे दोन घोट घेतल्यावर तो म्हणाला, “ पण तुमच्या घरच्यांना ही गोष्टं ---” त्याचं बोलणं तोडत ती म्हणाली, “ तो

माझा प्रश्न आहे. तुमचा त्याच्याशी काय संबंध? तुम्ही तुम्हाला काय वाटतं, ते बोला ". सुखदा.

" मला वाटतं की ही गोष्टं योग्यं होणार नाही." विनायक.

" का? " सुखदा .

" कारण मी तुम्हाला काहीच देऊ शकणार नाही. माझ्यावर दोन बहिणी व आईची जबाबदारी आहे. शिवाय आम्ही भाड्याच्या घरात राहतो. माझं शिक्षणही धड नाही त्यामुळे मला कधी फार चांगली नोकरी मिळणार नाही. माझ्याशी लग्न करून तुम्हाला काय मिळणार आहे? " विनायक.

" मला काय मिळणार आहे, म्हणून मला तुमच्याशी लग्न करण्याची इच्छा आहे, हा देखील माझा प्रश्न आहे. तुम्ही तुमच्यापुरतं बोला." सुखदा.

" आता मी काय बोलणार? मला विचार करावा लागेल." विनायक.

" विचार करून उत्तर द्या." सुखदा.

विनायकाला सुटल्यासारखं वाटलं. " मग चलू या आपण." असं म्हणत तो जाण्याच्या तयारीत उभा सुद्धा राहिला. मग सुखदाही उठली. तोवर विनायक बाहेर पडला होता.

आज खऱ्या अर्थानी सुखदाच्या लढाईला सुरवात झाली होती. पहिला बुरुज तर ढासळण्याच्या तयारीत होता. पण अजून बरेच पण आणि परंतु जिंकायचे होते. चर्चेची दुसरी फेरी आज रात्रीच होती. ती घाईनी घरी निघाली. आज कोर्टातही तिचीच जीत झाली होती; आणि त्या केसचं सर्व श्रेय सरांनी तिलाच दिलं होतं. त्यामुळे आज तिचा आत्मविश्वास दुणावला होता.

ती घरी पोहोचली, तोवर तिचे वडीलही घरी आले होते. जेवणी होईपर्यंत कोणीच कोणाशी फारसं काही बोललं नाही. जेवण झाल्यावर आपल्या खोलीत न जाता ते हॉल मध्ये जाऊन बसले होते. सुखदाही तिथे पोहोचली. “ आई तुही लवकर ये. उगाच काहीतरी कामं काढत बसू नकोस.” असं आईला जतवायला ती विसरली नाही.

आईही आलीच पाठोपाठ. हजर नव्हता फक्त सुखदाचा भाऊ - साकेत. ह्यावेळी त्याच्या मित्रांची गप्पांची मैफिल असायची. तो सुखदापेक्षा बराच लहान होता. नुकताच कॉलेजमध्ये जायला लागला होता. नव्यानीच मिळालेलं स्वातंत्र्य, नवे मित्र - मैत्रिणी यांच्यात तो दंग होता. त्याला शास्त्रज्ञ व्हायचं होत. त्याचा आवडीचा विषय होता भौतिकशास्त्र, ( physics ). स्वारी

स्वतःतच गर्क असायची. अजून परीक्षा फार लांब होत्या, म्हणून आई- वडीलही थोडी ढील देत होते.

हॉलमध्ये आल्याआल्या आई सुखदाला म्हणाली, “ काय ग, काहीतरी वेड घेऊन बसली आहेस डोक्यात? ” ते ऐकून सुखदा रागावलीच. पण तिने आईला काहीही दुरुत्तर केलं नाही. तिच्या मनात आलं की आई असं बोलते आहे याचा अर्थ आईला ह्या विषयाचं गांभीर्य कळलेलंच नाही आहे. जाऊ दे निर्णय तर बाबाच घेणार आहेत. बाबांनीही आईच्या बोलण्यावर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. ते सुखदाला म्हणाले, “ बोल आता.”

“ बाबा, मी तर माझी इच्छा तुमच्याजवळ स्पष्टपणे सांगितली आहे.” सुखदा

“ बेटा, इच्छा असणं, आवडणं, हे सगळं मी समजू शकतो. पण प्रत्येक गोष्टीला एक व्यवहाराची किनार असते. व्यवहार योग्य झाला तरच ही किनार शोभिवंत दिसते. अन्यथा त्याची लक्तरं बनायला वेळ लागत नाही. म्हणूनआम्ही तुला जागरूक करू पाहतो आहोत. तू शिकलेली आहेस; सज्ञानही आहेस तेंव्हा आम्ही आमची मतं तुझ्यावर लादणार नाही.”

सुखदाला वडिलांचं हे बोलणं फार आवडलं. त्यांना तिच्याबद्दल वाटणारी काळजी त्यातून दिसत होती. ती म्हणाली, “

बाबा, विनायकशी लग्न केल्यास मला जीवनात बऱ्यापैकी कष्ट करावे लागतील, हे उघड आहे; आणि तेच तुम्हाला आवडत नाही आहे. आज दिसणारं चित्रं तरी असंच आहे. हे चित्र एकदम बदलणार नाही. आमच्यावरच्या जबाबदाऱ्या संपेपर्यंत आम्ही स्वतःचा विचार करू शकणार नाही. पण बाबा माझ्यासाठी हे एक आव्हान असेल. आणि मला आवडलेल्या व्यक्तीबरोबर या आव्हानाला तोंड द्यायलाही मला आवडेल. शिवाय तुम्ही आहातच की पाठीशी मला सल्ला द्यायला."

बाबा म्हणाले, " बाळा, हे सगळं खरं आहे, पण आव्हान स्वीकारीन म्हणणं आणि प्रत्यक्ष आव्हानांशी लढणं, यात खूप फरक असतो. माणसाची दमछाक होऊन जाते. माणूस त्या ओझ्याखाली दबून जातो."

" बाबा, विनायक शिकलेला नसला तरी नेक स्वभावाची व्यक्ती आहे. मी शिकलेली आहे. मी पैसेही मिळवीन बऱ्यापैकी आणि विनायकाच्या साथीनं घरही सांभाळीन. मला माझ्या आवडीच्या माणसाबरोबर जीवन जगायचं आहे. किती पैसा मिळवला, आणि किती चैन केली, याला माझ्या लेखी फार महत्वं नाही. तुम्हीच ही शिकवण मला दिलेली आहे." इति सुखदा.

सुखदाच्या बोलण्यात जोश होता; सच्चेपणा होता. उथळपणा नावालासुद्धा दिसत नव्हता. बोलणं ऐकून बाबा विचारात पडले. तिच्या आईला तर कळलंच नाही, की चांगलं श्रीमंती स्थळ सोडून, असला चुकीचा विचार सुखदा का करते आहे. का स्वतःला संकटात टाकते आहे.

“ सुखी, बाबा लाडानी सुखदाला ‘ सुखी ‘ म्हणून संबोधत. आज तर ते थोडेसे भावनाविवश झाले होते. ते म्हणाले, “ सुखी, तू म्हणतेस ते तत्वतः बरोबर आहे गं. पण ते प्रत्यक्षात आणणं खूप कठीण आहे बेटा. इथे ज्या सुखात तू वाढलीस, त्यातलं काही सुद्धा तिथे तुझ्या वाट्याला येणार नाही; आणि तू कितीही कष्ट केलेस तरी ते त्या घराला पुरेसे पडणार नाहीत.”

“ बाबा, हा कष्टाचा वसा मी आपणहून स्वीकारले आहे. त्यामुळे त्याचं मला काही वाटणार नाही. अडले कुठे, तर सल्ल्यासाठी तुमच्याकडेच येईन. पण माझ्या वागण्यानी तुम्हाला कमीपणा येईल असं काहीच मी करणार नाही ”. सुखदा.

सुखदेचं बोलणं ऐकून बाबा भारावलेच. सुखदा तुला विनायक एव्हढा आवडला आहे?

सुखदा लाजली. तिच्या लाजाण्यानीच बाबांना त्यांच्या प्रश्नांचं उत्तर मिळालं. त्यामुळे तिथे एकदम शांतता पसरली. आपण

winning point ला उभे आहोत, याची जाणीव सुखदाला झाली. आपण फड गमावला आहे याची आईलाही जाणीव झाली. ती काहीतरी बोलणार होती. पण बाबांनी तिला थांबवलं. ते म्हणाले, “ नीला, थांब जरा. आपली मुलगी उथळ नाही. विनायक तिला आवडला. त्याच्या गुणदोषांसहित. हा तिच्या आयुष्याचा प्रश्न आहे. ”

“ अहो, पण तिला किती त्रास होईल हे आपल्याला समजतं आहे नं? ” नीला - सुखदेची आई.

“ नीले, प्रश्न त्रासाचा नाही आहे; प्रश्न आहे सुखदेच्या मनाचा. तिचा आपल्यावर विश्वास आहे. म्हणून ती सल्ला आणि निर्णय घेण्यासाठी आपल्याकडे आली आहे. ती सज्ञान आहे. तत्वतः तिला आपल्या परवानगीची गरज नाही. आपण विरोध करू याची कल्पना असतांना सुद्धा, ती आपल्याकडे सल्ला घ्यायला आपली बाजू मांडायला, आली आहे. तिला तिच्या निर्णयाला आपला पाठिंबा हवा आहे. तिने सर्व गोष्टींचा विचार केला आहे. आपण तिची बाजू समजून तरी घेतली पाहिजे, असं मला वाटतं.”

“ तुम्ही तर तिचीच बाजू घेता आहात! ” नीला.

“बाजू घेण्याचा प्रश्न नाही हा! मी, माझ्याकडे वडील म्हणून पाहणाऱ्या, माझ्या मताची कदर असलेल्या माझ्या मुलीला समजून

घेण्याचा प्रयत्न करतो आहे. तिच्याशी जोडली असलेली आपली नाळ तुटू नये असा प्रयत्न मी करतो आहे. ती एक आव्हान स्वीकारते आहे. त्यात तिला आपली साथ हवी आहे; आणि आपण तिला साथ द्यावी असं माझं मन मला सांगतं आहे. '' बाबा.

वडिलांचं हे बोलणं ऐकून, सुखदेच्या डोळयात पाणी आलं. ती म्हणाली, “ बाबा, मी तुम्हाला खूप त्रास देते आहे का? पण मी काय करू? ”

बाबांनी सुखदेला जवळ घेतलं, ते म्हणाले, “ आता तू काही करू नकोस. आता सगळं मीच करेन. उद्या आधी जाऊन विनायकाच्या आईला भेटतो; विनायकाशीही बोलतो. तू अगदी निर्धास्त राहा. ”

हे ऐकल्यावर सुखदा आई जवळ गेली. तिचा हात हातात घेऊन ती म्हणाली, “आई, मला तुझी काळजी समजते. तुझ्या विरोधाचा मला राग नाही आला. पण माझ्या निर्णयात मला तुमची साथ हवी आहे. तुमच्या मनाविरुद्ध मी काही करू शकणार नाही. “

“ वकील आहेस बाई तू! बोलण्यात तू काय हार जाणार आम्हाला! ” असं म्हणत आईनी तिला जवळ घेतलं.

ही केस आपण जिंकलो आहोत हे सुखदाला समजलं. ती म्हणाली, "तुम्ही माझ्या पाठीशी आहात, या कल्पनेनीच मला हत्तीचं बळआलं आहे.तुमच्या पाठिंब्याच्या आधारावर मी सगळं जग जिंकून दाखवीन. "आजच्या सभेचा असा सुखान्त शेवट झाला होता.

२

दुसऱ्या दिवशी सकाळीच बाबा विनायकाच्या घरी गेले. हे गृहस्थ परत का आले आहेत हे विनायकाच्या आईला समजेना. आपलं काहीच नाही, पण विनायकाने तर स्पष्टं नकार दिला आहे. आता पुन्हा काय? असे विचार तिच्या मनात येत होते. बाबांनीही मग लांबण लावली नाही. ते म्हणाले, "मी पुन्हा आलो म्हणून तुम्हाला आश्चर्य वाटत असेल. "

" नाही तसं नाही , पण -----! " विनायकाची आई.

" सांगतो मी तुम्हाला सगळं. विनायक आहे का घरात? " बाबा.

तेव्हढ्यात विनायकाचा आतून बाहेर आला. तो कामाला जायला निघतंच होता. बाबांना पाहून तो थबकला.

बाबा म्हणाले, “ विनायक, तू जरा वेळ थांबू शकतोस का? मला काहीतरी महत्वाचं बोलायचं आहे.“

“ पण मी --- मला --! “ विनायक.

“ मला सगळं ठाऊक आहे. सुखदानी मला सगळं सांगितलं आहे. आणि तरीही मी आलो आहे तुमच्याशी बोलायला. मी तुझ्यावर काही लादणार नाही; एव्हढंच सांगतो. पण आपण बोलूया.” बाबा.

त्यांचं हे आर्जवी बोलणं ऐकून विनायकला तेथून निघून जाववेना. तो म्हणाला, “ मी फोन करून येतो.”

विनायक येईपर्यंत विशाखा पाणी आणि चहा घेऊन आली. चहा घेऊन होईपर्यंत विनायक परत आला. तोवर बाबांनी विनायकच्या आईच्या तब्येतीची जुजबी चोकशी केली. तो आल्यावर ते म्हणाले,

“ तू ही घे की चहा.”

“ आता चहा नको आहे. मी आताच जेवलो.” विनायक.

बाबांनी बोलायला सुरवात केली. ते म्हणाले, “विनायक, तुला सुखदा आवडलीच नसली तर मग प्रश्नच नाही. पण तसं नसेल

तर मला काहीतरी सांगायचं आहे. निर्णय तू आणि तुझ्या आईनंच घ्यायचा आहे. आमचा निर्णय झालेला आहे, म्हणूनच मी इथे आलो आहे.”

यावर कोणीच काही बोललं नाही. मग बाबाच पुढे म्हणाले, “ सुखदाला लग्न करून या घरात येण्याची इच्छा आहे.”

विनायक म्हणाला, “ आमच्या आणि तुमच्या परिस्थितीत खूप फरक आहे. हे घर तिला कष्टांपलीकडे काहीच देऊ शकणार नाही. मग हा हट्ट का? ”

बाबा म्हणाले, “ सुखदा अनभिज्ञ नाही. तिनी या सगळ्याचा विचार केलेला आहे. आपल्या आर्थिक परिस्थितीला फरकामुळे, मी ही सुरवातीला तिला हे समजावून देण्याचा प्रयत्न केला. पण तिला जे कष्ट पडतील त्यापेक्षा, तुझ्या साथीचं जास्ती आकर्षण आहे. तू पहिल्या भेटीतच तिचं मन जिंकून घेतलं आहेस.”

विनायक म्हणाला, “ त्यानी काय फरक पडतो? ”

बाबा हसले आणि म्हणाले, “ फरक पडतो, हे तिनेच मला पटवून दिलं आहे. आवडत्या व्यक्तीच्या सहवासात कष्ट करण्यातही गम्मत असते. ती एक धुंदी असते.”

“ मग धुंदी उतरल्यावर काय? ” विनायक.

“ बरोबर आहे तुझा प्रश्न. हे सगळे प्रश्न मलाही पडले होते; पहिली धुंदी उतरली की तुझ्याकडून मिळणारं प्रेमच तिला तारून नेईल.” बाबा.

“ पण माझ्यावर माझ्या दोन बहिणींची जबाबदारी आहे. माझं शिक्षणही --” विनायक.

“ विनायक, सुखदा उथळ स्वभावाची नाही. विचारी आहे. तुझ्या एकूण परिस्थितीचं भान तिला आहे. त्यावर तिने विचार केलेला आहे. त्यानंतरच ती माझ्याकडे आली.”

आता पुढे काय बोलावं ते विनायकाला सुचेना. आता प्रथमच त्याच्या आईनी बोलण्यात भाग घेतला. त्यांनी सुखदाला पाहिलं होतं. सुखदा आवडण्यासारखीच होती. त्या म्हणाल्या, “ सगळ्या बाजूंचा विचार केला आहे का तिनी? उगाच मागून तक्रारी नकोत.”

त्यावर बाबा म्हणाले, “मी सुद्धा तिला हेच सांगतो आहे. आता काय तो विचार कर. मागून तुझ्या तक्रारी मी ऐकून घेणार नाही. पण ती विचारांची पक्की आहे.”

विनायक म्हणाला, “ आम्ही विचार करून सांगतो.” हे ऐकून बाबांना बरं वाटलं. लगेच ‘ हो-नाही ’ न म्हणता विचार करून सांगतो, म्हणणं त्यांना आवडलं. पटलं.

दोन दिवसांनंतर विनायकाचा फोन आला की त्याला एकदा सुखदाला भेटायचं आहे.

सुखदा आनंदली. मागच्याच हॉटेलमध्ये दोघांची भेट झाली. पुन्हा एकदा, विनायकवरच्या जबाबदाऱ्या, विनायकाची बेताची आर्थिक परिस्थिती या गोष्टींची उजळणी झाली. शेवटी सुखदा त्याला म्हणाली, “ विनायक तुला माझी खात्री वाटत नाही का? मी तुला पहिल्यांदा भेटले, तेंव्हापासून या सगळ्या गोष्टी मला माहित आहेत. त्या जमेस धरूनही मी तुझ्याशी लग्न करण्याची स्वप्नं पाहते, ती या सर्व जबाबदाऱ्या आपण दोघांनी मिळून पाडायच्या असं मनाशी ठरवूनच. ”

विनायक म्हणाला, “ तू का उगीचच त्रास घेणार? ”

सुखदा हसली, म्हणाली, “ उगाच नव्हे. तू मला हवा आहेस म्हणून मी हा त्रास घ्यायला तयार झाले आहे. ”

आता विनायकाचं बोलणंच खुंटलं. तो म्हणाला, “ सुखदा, ही गोष्टं सोपी नाही. तुला खूप त्रास सहन करावा लागेल. ”

सुखदा म्हणाली, “ विनायक तू म्हणतोस ते खरं आहे. पण मी माघार घेणारी मुलगी नाही. दिल्या शब्दाला जागणारी मुलगी आहे. माझ्यावर तसेच संस्कार आहेत. ” असं म्हणत तिनी हलकेच विनायकाचा हात हातात घेतला. त्या स्पर्शानी विनायक सुखावला.

त्याला दिलासा मिळाला. विनायकाचा होकार त्याने व्यक्त न करताच सुखदाला समजला.

कॉफी घेऊन झाल्यावर, सुखदा त्याला म्हणाली, “ विनायक आपण दोघंही आधी तुझ्या घरी जाऊन, तुझ्या आईला ही गोष्टं सांगू. त्यांचा आशीर्वाद घेऊ. मग माझ्या घरी जाऊ आणि आईबाबांना आपला निर्णय सांगू; आणि याच्या पुढली सारी सूत्र आपण मोठ्या माणसांच्या हातात देऊन टाकू. नसत्या जबाबदाऱ्या आपल्याला नकोत. ”

विनायकाची आई म्हणाली, “ सुखी व्हा रे माझ्या बाळांनो. मुली, या घरात सगळं तुझ्या मनासारखंच होईल. तू माझ्या मुलावर इतका विश्वास दाखवला आहेस, तसाच तोही तुझ्याशी चांगला वागेल. हिरा आहे ग माझा विनायक. पण परिस्थितीमुळे तो शिकू शकला नाही. नाहीतर तोही चांगला शिकला असता.” असं म्हणून त्यांनी त्यांच्या हातावर साखरं दिली. विशाखा आणि विदुलाही घरीच होत्या. सुखदासारखी सुंदर आणि शिकलेली मुलगी आपली वहिनी म्हणून या घरात येणार हे कळल्यावर त्यांना खूप आनंद झाला. विनायकाने त्यांची ओळख करून दिली. विदुला आता

सातवीत होती. ती म्हणाली, “ तू इथे राहायला आलीस की मी तुला वहिनी म्हणायचं नं? ”

तिचे हे शब्द ऐकून विदुलाच्या अंगावर रोमांच उभे राहिले. आतापर्यंत विनायकशी सगळं धीटपणानी बोलणारी सुखदा, विदुलाच्या या शब्दांनी लाजली. विशाखा म्हणाली, “ आमच्या विदुलाकडे तुम्ही लक्ष देऊ नका. तिला कुठे काय बोलायचं हे समजत नाही.”

आतापर्यंत सुखदा सावरली होती. ती म्हणाली, “तिचं काहीच चुकलं नाही: बरोबरच बोलली ती. निर्व्याज असतात लहान मुलं. मग मी तुला वन्सं ़ म्हणायचं का? “

आता विदुला लाजली. आपलं खरंच काहीतरी चुकलं, असं तिला वाटलं. ती म्हणाली, “ चुकलंच माझं. ”

सुखदानी विदुलाचा हात धरून तिला जवळ घेतली आणि म्हणाली, “ तुझं अगदी बरोबर आहे. मी तुझी वहिनीच होणार आहे. ”

“ मग सगळे का हसले मला? ” विदुला.

विनायक म्हणाला, “ सगळे कौतुकाने हसले. तुझं चुकलं म्हणून नाही.”

विशाखा म्हणाली, “ पुरे आता तो विषय. तुम्ही बस. मी छानसा शिरा करते, सर्वांसाठी.”

सुखदा “ आता नको. मला घरी जायला उशीर होतो आहे.”

“ थांब ग वहिनी. आजच्या दिवशी सर्वांचं तोंड गोड करायलाच हवं. आलेच मी.” असं म्हणत विशाखा आत गेली. तिच्या पाठोपाठ विदुलाही आत गेली.

आई म्हणाली, “ विनायक, तिला आपलं घर दाखव नं.” विनायकनी अपेक्षेनी

सुखदाकडे पाहिलं आणि तो आत वळला. त्याच्या पाठोपाठ सुखदाही आत गेली.

घर लहानसंच होतं तीन खोल्यांचं. पण घरातली टापटीप डोळ्यात भरण्याजोगी होती. सगळ्या गोष्टी जागच्याजागी होत्या. घराला मागे छोटंसं अंगण होतं. अंगणात अनेक फुलझाडं लावली होती. ती घरातल्या माणसांच्या रसिकतेची ग्वाही देत होती. सुखदाला आपलं घर आठवलं. दुमजली घर. सहा सात खोल्या असलेलं; ती आणि साकेत, दोघांच्याही वेगळ्या खोल्या. आता तिच्या इच्छेनेच ती या छोट्याश्या घरात राहायला येणार होती. क्षणभर ती मनाशी गोंधळली, जमेल का आपल्याला ते? असा प्रश्न तिची इच्छा नसतांनाही तिच्या मनात उद्भवलाच.

पण आता माघार घेणं नाही. तिला बाबांचे शब्द आठवले; ते म्हणाले होते, “ सुखदा, एखादी गोष्टं करीन म्हणणं आणि ती प्रत्यक्ष करणं, यात जमीन-अस्मानाचं अंतर असतं बेटा. तू नीट विचार केला आहेस नं!”

“ चला, शिरा तयार आहे,” या विशाखाच्या बोलण्याने सुखदाच्या विचारांची साखळी तुटली. शिरा खाऊन विनायक आणि ती तिच्या घरी आले.

सुखदाच्या घरी त्यांनी आपला निर्णय सांगितल्यावर बाबांनी तिची पाठ थोपटली. तिची आई मात्र फार खुश दिसली नाही. पण या गोष्टीचा फार विचार करायचा नाही, असं सुखदानी फार आधीपासून ठरवलं होतं.

बाबा मात्र गंभीर झाले असले, तरी चांगलं बोलले. ते म्हणाले, “ सुखी, तुमचा निर्णयाचा मी सन्मान करतो. पण बेटा, खरंतर तुम्हा दोघांनाही मी सांगतो आहे, की परिस्थितीशी झगडतांना मतभेदाचे अनेक प्रसंग उद्भवतील, दोन स्वतंत्रपणे विचार करणाऱ्या व्यक्ती, म्हणजे मतभेदाचे प्रसंग येणारच. फक्त अशा प्रसंगात मतभेदांचं अट्टाहासात रूपांतर होऊ द्यायचं नाही. अगदीच अटीतटीची वेळ आल्यास, तुमच्या या शुभचिंतकाला विसरू नका.” असं म्हणून ते हसले. त्यानी त्यांच्या बोलण्याने

निर्माण झालेला ताण कमी झाला. मग मात्र त्यांनी विनायकला जवळ बसवून घेतलं. त्याच अभिनंदन केलं. भेट म्हणून त्याच्या करता त्यांनी आणून ठेवलेली भेट वस्तू त्याला दिली. त्याला जेऊन जाण्याचा आग्रह केला.

आता भांबावून जाण्याची विनायकाची पाळी होती. मघाशी सुखदेला पडलेला प्रश्न आता त्याला पडला होता. आपण हे सगळं निभावून नेऊ शकू का? ही श्रीमंत सुखवस्तू माणसं. त्यांच्या सवयी, त्यांची विचार करण्याची पद्धत, सगळंच आपल्यापेक्षा वेगळं असणार. त्यांच्या आपल्याकडून काही अपेक्षाही असतील. त्या आपण पूर्ण करू शकू का? एक ना दोन, अशा नानाविध विचारांनी त्याचा चेहेरा अगदी गंभीर झाला होता. आपण उगाचच सुखदेच्या मोहात पडलो असं सुद्धा त्याला वाटलं. पण आता परतीचा मार्ग उरला नव्हता.

बाबांना त्याच्या मनात चालू असलेल्या वादळाची कल्पना आलीच होती. ते म्हणाले,“ विनायक असा बावचळून जाऊ नकोस सुखदा जिद्दी मुलगी आहे. ती तुझ्यावर पश्चात्तापाची पाळी आणणार नाही.”

यावर आता आपण असले काही विचार करायचे नाहीत. होऊ दे, काय होईल ते. जे होईल त्याला आपण तोंड द्यायचं, असं

विनायकनी ठरवलं. या एका निर्णयांनी त्याच्या जीवनात मोठं स्थित्यंतर झालं होतं.

जेवून विनायक घरी जायला निघाला. तेंव्हा बाबांनी त्याला व त्याच्या आईला दोन दिवसांनी घर पाहायला व पुढचं सगळं ठरवायला बोलावणं केलं. तेवढ्या अवधीत सुखदानी चपळाईनी बाबांजवळ संध्याकाळी फिरायला जायचं सुतोवाच्य करून ठेवलं. तिला विनायकशी बोलायचं होतं.

दोन दिवसांनी विनायक व त्याची आई सुखदेच्या घरी आली. त्यांच्यासमोर लग्नाचा खर्च ही एक मोठीच समस्या होती. पण बोलणी अशी काही झालीच नाहीत. बाबांनी त्यांना सांगितलं की लग्नाचा सर्व खर्च ते स्वतःच करणार आहेत; आणि सुखदा एकुलती एक मुलगी, म्हणून सालंकृत कन्यादानाही करणार आहेत. मुलाकडल्यांनी काय खर्च करायचा याबद्दल त्यांनी अवाक्षरही काढलं नाही. शेवटी विनायकाची आई म्हाणाली सुद्धा की तुम्ही आम्ही काय करायचं ते काहीच सांगितलं नाहीत. बाबा म्हणाले की तुम्हाला जमेल ते तुम्ही करा. इथेच बोलणी सुरु झाली व संपलीही.

लग्नाची तारीख दोन महिन्यांनंतरची होती. तयारीच्या घाईगर्दीत दोन महिने कसे गेले, ते कळलं सुद्धा नाही. बघता बघता

लग्नाची तारीख आली सुद्धा. एक मात्र झालं की या कालावधीत सुखदा व विनायक वारंवार एकमेकांना भेटत होते. बोलत होते. त्यामुळे विनायकाच्या मनावरचा ताण जरा कमी झाला होता. लग्नाच्या मांडवात जरा कुजबुज चालू होती की बाबासाहेबांनी इतक्या कमी शिकलेल्या मुलाची निवड कशी काय केली? शिवाय स्थळ त्यांच्या तोलामोलाचंही नाही. पण उघडपणी कोणीच काहीच बोललं नाही. सुखदा आणि विनायकाचा जोडी मात्र अगदी तोडीस तोड होती. विनायक आणि सुखदा एकमेकांना अगदी शोभून दिसत होते.

मनासारखं झाल्यामुळे आनंदानी सुखदाचा तिचा चेहेरा अधिकच मोहक दिसत होता. त्यामानानी विनायक मात्र जरा गंभीर झाला आहे की काय असं वाटत होतं. ते काही प्रमाणात खरंही होतं. कारण इतकी माणसं, आणि इतकं कौतुक यांची विनायकाला कधी माहितीच नव्हती. त्यामुळे त्याच्यावर थोडंसं दडपण आलं होतं . शिवाय सुखदा म्हणत असली तरी आपल्या घराशी ती कशी व कितपत जुळवून घेऊ शकेल, याचीही चिंता त्याच्या मनाला लागून राहिली होती.

लग्न थाटात पार पडलं. त्याच्या आईचा, बहिणींचा मान राखून सर्व गोष्टी केल्या गेल्या. विनायकाचे पाहुणे विनायकाच्या

उजळलेल्या भाग्यानी हरखून गेले होते. सगळा लग्न - समारंभ दृष्ट लागावी इतका छान झाला. बघता बघता नववधूला निरोप द्यायची वेळ आली. सुखदेनी जरी विनायकाशी लग्न करण्याचा हट्ट केला होता तरीही निरोपाची वेळ आल्यावर ती गोरीमोरी झाली होती. विनायक तिला सांभाळून घेत होता. आता सुखदेचे आई- वडील काळजीत असल्यासारखे वाटत होते. सुखदा विनायकाच्या तीन खोल्यांच्या जागेत कशी राहणार, याची त्यांना काळजी पडली होती.

इतक्यात मांडवाच्या दाराशी एक छानशी सजवलेली गाडी येऊन उभी राहिली. ते पाहून सगळे जरा आश्चर्यचकितच झाले. सर्वांना वाटलं आता थाटात वरात निघणार. विनायकला गाडी आल्याचं कळल्यावर, तो म्हणाला, “ माझ्या मित्राची गाडी आहे. आज सुखदा खऱ्या अर्थानी तिच्या नव्या घरी येणार, म्हणून तो स्वतः गाडी घेऊन आला आहे तिला घरी नेण्यासाठी.” हे ऐकल्यावर सुखदा जरा सुखावलीच. लग्नातला निरोप समारंभ त्याच्या अवघडपणामुळे जरा लांबतोच. तसा तो संपल्यावर, विनायक आणि सुखदा विनायकाच्या मित्राच्या गाडीने घरी गेले. विनायकनी केलेली ही छोटीशी गोष्टं. सगळयांनाच आनंद देऊन गेली.

विनायकाच्या घरानं सुखदेचं छान स्वागत केलं. आपलेपणानी केलेलं स्वागत सुखदाला भावलं. विनायक व सुखदासाठी त्यांच्या घरातली एकुलती एक बेडरूम सजली. विनायकाची आई आणि बहिणी बाहेरच्या खोलीत झोपल्या. यामुळे सुखदा जरा संकोचली. पण ती काही बोलली नाही. आता तिला अशा अनेक नव्या नव्या गोष्टींशी जुळवून घ्यावं लागणार होतं.

दुसऱ्या दिवशी सुखदेनी घरी बसल्या बसल्या काय सूत्र हलवली देवच जाणे. पण दुपारी ती विनायकला म्हणाली, “ विनायक मला जरा बोलायचं आहे तुझ्याशी. ”

विनायक खोलीत आल्यावर ती म्हणाली, “ विनायक आपल्याकरता सगळ्यांना बाहेरच्या खोलीत झोपावं लागलं, हे माझ्या मनाला पटत नाही. आपण दुसरी जागा घेऊया. विनायक म्हणाला, अगं, इतकं सोपं आहे का ते? ”

सुखदा म्हणाली, “ हो सोपंच आहे ते. मी जागा बघितली सुद्धा आहे. फक्त मला ही गोष्टं तुझ्याकडून करून हवी आहे. म्हणजे ते वाईट दिसणार नाही.” हे ऐकून विनायक आश्चर्यचकितच झाला. तो म्हणाला, “ काय ही तुझी झेप!”

“ रागावलास का माझ्यावर?” सुखदा

“ नाही, रागावलो नाही पण हे कसं झेपणार आपल्याला? ” विनायक.

“ मी आले आहे नं आता तुझ्या साथीला. आता सगळं जमेल आपल्याला; फक्त तू मला समजून घे.” सुखदा म्हणाली.

विनायक म्हणाला, “ आईला विचारू? ”

“ विचारू नकोस. समजावून सांग.” सुखदा

“ आई रागावली तर? ” विनायक.

“ आई रागावणारच नाही. फक्त हा निर्णय आपल्या दोघांचा आहे, ही गोष्टं लक्षात ठेव.” सुखदा म्हणाली. “अगं पण आईSS,” विनायक

“ अरे आई काही म्हणणार नाही. त्यांना उलट बरंच वाटेल. बघ सांग तू त्यांना. ” सुखदा

“ अगं पण दोन ठिकाणाचं भाडं भरायचं? जमणार आहे का ते आपल्याला? ” विनायक

सुखदा म्हणाली, “ अरे, एकाच महिन्याचा तर प्रश्न आहे. आणि त्यातून मिळणाऱ्या सोयीचा विचार करायचा.आपल्यासाठी कुटुंबातल्या इतरांना त्रास सहन करावा लागावा, ही गोष्टं मला पटत नाही. आपण त्यातून मार्ग काढला पाहिजे.”

विनायकाला फारसं पटलं नाही, पण लगेच वादावादीला सुरवात नको, म्हणून तो आईला सांगायला गेला. आई काय म्हणते याचा त्याला प्रश्नच पडला होता. पण आईची प्रतिक्रिया एकदम वेगळीच होती.

म्हणाली, “ बरं केलंस बाबा. सुखदाला कुठे अशा खुराड्यात राहायची सवय आहे? ” विनायक एकदम पडलाच. त्याला वाटलं होतं, कशाला वाढीव खर्च! असं आई म्हणेल. पण आई वेगळंच काहीतरी बोलत होती. पुढे ती म्हणाली, “ विनायक अजून हा महिनासंपेपर्यंत मी आणि मुली इथेच राहू. तुम्ही दोघंच जा तिकडे झोपायला. सकाळी उठून या. पुढच्या महिन्यात आपण सगळेच तिकडे राहायला जाऊ. “

विनायकला वाटलं , ‘ अरेच्चा, सुखदा म्हणाली ते खरंच झालं की. आईनी तर विरोध केलाच नाही. ‘

पहिला, त्याला न जाणवलेला प्रश्न तरी सुखदामुळे बिनबोभाट सुटला होता.’ सुखदावर थोडंसं अवलंबून राहायला हरकत नाही ‘, असं त्याला वाटलं. नव्या जागेत दोघांना एकांत मिळाल्यामुळे, त्यांना एकमेकांशी बोलता आलं. त्यामुळे त्यांच्यात थोडा मोकळेपणा आला.

नव्या नवलाईचे नवे दिवस, पण सुखदा जागरूक होती. तिनी घरातल्या कामात लक्ष घालायला सुरवात केली. सुरवातीला, संकोचामुळे, विशाखा आणि विदुला, सुखदाला ‘ फारसं काही करू द्यायच्या नाहीत. त्यांची भावना चांगलीच होती. पण ती सुखदाच्या पठडीत बसणारी नव्हती.

दोन्ही मुली शिकताहेत त्यांना कामात अडकवून ठेवता काम नये. हे सुखदाला कळत होतं, ती आईला म्हणाली, “ आई, तू तरी त्यांना समजावून सांग. ” तिने सासूबाईंना एकेरी संबोधल्यामुळे, विनायक जरा चरकलाच. आता आई काय म्हणेल, तिला हे कसं चालेल, अशा दुग्ध्यात तो अडकला. त्यानी हळूच सुखदाला सुचवलं, की तिने आईला मानानी ‘ अहो ’ म्हणून संबोधावं.

यावर सुखदा त्याला म्हणाली, “ विनायक ‘ अहो आई , हे संबोधन माझ्या मनाला पटत नाही. आता इथे राहायला आल्यावर, मी तिला माझी आई मानते. एक दोन दिवस तुम्हाला ‘ ए आई, ’ आवडणार नाही. पण हळुहळू तुम्हाला त्याची सवय होईल. मग ते इतकं वावगं वाटणार नाही. शिवाय ‘ ए आईमध्ये ‘ जी जवळीक आहे ती ‘ अहो आई ’ मध्ये नाही. ”

विनायकाच्या आईनी तिचं हे बोलणं ऐकलंच होतं, इतक्या छोट्या जागेत ही गोष्टं अपरिहार्यच होती. त्यांना तिचं बोलणं पचलं

नाही, तरी तिचा मुद्दा बरोबरच होता; हे पटवून घ्यावं लागलं. त्या विनायकाला म्हणाल्या, “ विनायक, तू आमच्यामध्ये बोलू नकोस. मला आवडणार आहे तिनी मला ‘ ए आई ’ म्हटलं तर. ”

विनायक आईला म्हणाला, “वा! हा खासा न्याय झाला. मी तुझ्याकरता बोलायला गेलो, तर तू मलाच सुनावतेस. ” यावर सगळेच हसले आणि ती गोष्टं तिथेच संपली.

तीच गोष्टं घरकामाच्या बाबतीत घडली. तिचं म्हणणं असं, की दोघींचेही हे अभ्यासाचे दिवस आहेत; त्यांनी अभ्यास करावा. गरज असेल तेंव्हा त्यांनी जरूर मदत करावी. पण आता सगळ्या जबाबदाऱ्या तिच्या आहेत, त्या तिला सांभाळू द्याव्यात. अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. तिच्या बोलण्यात वावगं काहीच नव्हतं. शेवटी तिचं हे बोलणंही त्यांना पटवून घ्यावं लागलं. घरात बदल होत होते. पण ते बदल स्वीकारण्यात नुकसान काहीच नव्हतं.

एकदा तर विनायक तिला गमतीनं म्हणाला सुद्धा की, “सुखदा तुझ्याशी लग्न करतांना, तू वकील आहेस या गोष्टीचा मला विसर पडला होता की काय? असं आता मला वाटतं . तुझे बिनतोड मुद्दे तू बरोबर आमच्या गळी उतरवतेस. ” यावर सुखदानी कृतककोपानी त्याच्याकडे पाहिलं; आणि दोघंही हसायला लागले.

महिना संपल्यावर सगळेच नव्या घरात राहायला आले. सगळ्यांनाच जरा मोठं घर घेण्यात झालेली सोय मनाला रुचली होती; पण तिचा ‘ बोलविता धनी ‘ कोण होता हे कधीच कोणाला कळलं नाही. आता विशाखा आणि विदुला जवळ अभ्यासाला वेळही होता आणि चांगली जागाही होती. त्याचा परिणाम वेळोवेळी त्यांच्या परीक्षांमध्ये दिसतही होता. सुखदाबद्दल सगळ्यांनाच विश्वास वाटायला लागला होता. त्यांच्यातली जवळीक वाढत होती. घरकाम - सांभाळून कोर्टात जाणं, तिथल्या जबाबदाऱ्या, हे सगळं करण्यात सुखदाला कष्ट जरूर होत होते, पण मनाला समाधानही मिळत होतं. ह्या सगळ्या गोष्टी तिनी स्वेच्छेनीच तर स्वीकारल्या होत्या.

बारावीला विशाखानी प्रयत्नपूर्वक अभ्यास करून वैद्यकीय शाखेला प्रवेश मिळेल इतके मार्क्स मिळवले. पण आपल्या परिस्थितीत आपल्याला वैद्यकीय शाखेचे शिक्षण घेता येईल अशी अजिबात शक्यता नाही, ही गोष्टंही तिला ठाऊक होती. तिचा तसा आग्रहही नव्हता. पण ठिणगी पडलीच. तिचे मार्क्स पाहून, सुखदानी आग्रह धरला की

तिने वैद्यकीय शिक्षण घ्यायला हवं. स्वतः विशाखा, तिची आई आणि विनायक सुद्धा याच्या अगदी विरोधात होता. त्यांचा

हेतूही चांगला होता. आपली झेप नाही तितकी उडी आपण घ्याच कशाला? असं त्यांना वाटत होतं.

बरोबरच होतं ते. सगळ्यांनी सर्व परींनी तिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण तिचा आपला एकच धोशा, विशाखा हुशार आहे तिनी आपली हुशारी सिद्धही केली आहे, तेंव्हा तिला आपण संधी द्यायलाच हवी. सर्वात शेवटी विनायक तिला म्हणाला, “ सुखदा तुझ्या भावना मी जाणतो. तुझी इच्छा चांगलीच आहे पण आपण तो खर्च करू शकू का? ह्याचा विचार तू कर नं! त्यातून माझी ही अशी सामान्य नोकरी. तू एकटी किती धावशील? ”

सुखदा म्हणाली, “ विनायक, भाऊ म्हणून तुझंच ते कर्तव्य आहे, मी तुझ्या साथीला आहे; तेंव्हा आपण हे आव्हान स्वीकारायलाच हवं. केवळ वैशाली मुलगी म्हणून किंवा पैसे नाहीत म्हणून आपण तिला संधी नाकारावी, असं मला वाटत नाही. तुला एक शिकण्याची संधी मिळाली नाही, त्या परिस्थितीत ते अटळ होतं. पण त्यातली वेदना तू जाणतोस. न संपणारी वेदना आहे ती. आता तीच वेदना आपण विशाखाच्या जीवनात निर्माण करायची का? आपण एकमेकांना दोघं आहोत कष्ट करायला. आपण का माघार घ्यायची?

तिचं हे बोलणं ऐकून विनायकच्या डोळ्यात पाणी उभं राहीलं! जणू त्याच्या जखमेवरची खपलीच निघाली. तिचं बोलणं त्याच्या मनाला भिडलं. त्या आवेशातच तो म्हणाला, “ मी शिकविनच माझ्या बहिणीला.”

सुखदानी त्याचा हात हातात घेतला. त्यानी त्याला आणखी बळ आल्यासारखं वाटलं. तो सुखदाला हाताला धरून आत घेऊन गेला आणि म्हणाला, “ वैशाली तुला शिकायलाच हवं . आम्ही दोघं तुझ्या पाठीशी असतांना तुला काही कमी पडणार नाही. ”

विशाखा आणि आई विनायकाकडे पाहताच राहिल्या. आता आपल्याला वैद्यकीय शिक्षण देणं जमणार नाही, असं खरं खरं बोलणारा आपलं भाऊ आवेशात येऊन, ‘ तू वैद्यकीय शिक्षण घेतलंच पाहिजेस, ’ असं म्हणतो आहे. झालं तरी काय आहे त्याला असं?

विशाखानी काहीतरी बोलण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी तिला बोलूच दिलं नाही. उद्या आपण फॉर्म आणायला जाऊया. असं बोलून तो सुखदेसह बाहेर निघून गेला. आई आणि वैशाली अवाक होऊन त्याच्याकडे पाहताच राहिल्या. त्यांना वाटलं की उद्यापर्यंत हे त्याच्या मानेवर बसलेलं भूत उतरेल आणि तो नॉर्मल होईल. पण तसं काही व्हायचं नव्हतं. सकाळ झाल्यावर त्याने

वैशालीला लवकर आवरण्याची ताकीद दिली. त्याच्या मालकांना फोन करून त्यांची परवानगी घेतली; आणि तो सकाळी नऊ वाजता वैशालीला घेऊन फॉर्म आणण्यासाठी बाहेर पडला सुद्धा.

त्याच्या अंगात हे काय संचारलं आहे, हे त्याच्या आईला कधीच समजलं नाही. एकीकडे तिला बरंही वाटत होतं, पण त्याच वेळी ही केव्हढी मोठी जबाबदारी तो अंगावरओढवून घेतो आहे याचं दडपणही तिच्या मनावर येत होतं. सुखदा काय म्हणेल, याचीही तिला काळजी पडली होती. पण निर्णय घेण्याची ताकद तिच्या अंगात नव्हतीच. जे घडेल ते तसंच स्वीकारणं एव्हढाच तिला ठाऊक होत. आपण परिस्थिती बदलू शकत नाही, हे तिला नि:संशय माहित होतं.

पण आपण परिस्थितीला वळण देऊ शकतो, हे सुखदाला शंभर टक्के माहित होतं.

तिला हे सुद्धा माहित होतं की एकदा एखादं आव्हान माणसांनी जिद्दीनी स्वीकारलं, की त्याला ते जिंकण्याचे मार्गही दिसायला लागतात. ते मार्ग खडतर असतात. पण ते स्वीकारण्यातच तर माणसाचा कस लागणार असतो. आणि असं आव्हान स्वीकारणं हेच तर खरं जीवन आहे. ‘ दूध भात - भेंडीची भाजी ‘ अशा जीवनात काय मजा आहे?

सुखदा संध्याकाळी कोर्टातून घरी आली, तर घरात एकदम शांतता होती. तिनी हळूच वैशालीला खुणेनीच, ‘ काय झालं आहे? ’ असं विचारलं. तेंव्हा वैशाली म्हणाली, “ दादांनी आपलं म्हणणं खरं केलं. आज आम्ही मेडिकलचा फॉर्म घेऊन आलो. वहिनी तू तरी दादाला समजावून सांग नं! तूच त्याला बदलू शकशील.”

विशाखाला खरंतर हसू येत होतं. पण तिने ते तोंडावर दिसू दिलं नाही. ती म्हणाली, “बघते प्रयत्न करून.” तेव्हढ्यानी विशाखाचं समाधान झालं. बोलविता धनी कोण आहे हे तिला कळलंच नाही.

आता ताबडतोब फी ची सोय बघायला हवी होती. पैसे कसे उभे करता येतील याचा विचार करतांना, आपले बाबाच आपल्याला योग्य तो सल्ला देऊ शकतील, हे सुखदेच्या मनात आलं. ती विनायकाला म्हणाली, आपण संध्याकाळी बाबांकडे जाऊया. ”

विनायक म्हणाला, “ त्यांना नाही आपण पैसे मागायचे.” सुखदा हसली. ती म्हणाली,

“ असा विचार सुद्धा माझ्या मनात आला नाही. बाबांशी बोललो तर ते आपल्याला काहीतरी चांगला मार्ग सुचवतील, म्हणून त्यांच्याकडे जाऊ या.”

दोघेही दुसऱ्या दिवशी संध्याकाळी घरात सांगून सुखदेच्या माहेरी गेली. त्यांना पाहून सुखदेचे आईवडील खुश झाले. बाकी सणावाराला ती दोघे येतंच होती. पण आज काही कारण नसतांना सहज म्हणून ते पहिल्यांदाच आले होते. थोडं इकडचचं तिकडचं बोलणे झाल्यावर, आई चहा करायला घरात गेली. तेंव्हा सुखदेचे बाबा तिला म्हणाले, “ सुखदा, मला वाटतंय, तुला काहीतरी बोलायचं आहे. काही समस्या आहे का बाळा? ”

सुखदा म्हणाली, “ बाबा मोठीच समस्या आहे. क्षणभर बाबांच्या चेहेऱ्यावर काळजी चमकून गेली. पण क्षणभरच. त्यांना वाटलं, की सुखदा काहीतरी तक्रारी सांगायला आली आहे की काय? पण ते त्यांच्या मनाला पटेना. सुखदा अशी लेचीपेची मुलगी नाही, हे त्यांना माहित होतं. “बोल ना! मला असं ताणात ठेऊ नकोस. ”

सुखदानी बाबांना वैशालीबद्दल सर्व सांगितलं. आपल्याला त्याबद्दल काय वाटतं, तेही सांगितलं. विनायकाशी झालेलं बोलणं, विनायकाचा मत-परिवर्तन याबद्दल ती बोलली. मग म्हणाली, “ बाबा आज मेडिकलचा फॉर्म आणला आहे. अजून फी भरायला बराच अवकाश आहे. पण फीचे पैसे कसे उभे करावेत? याबद्दल बोलायला मी आले आहे.”

हे सगळं ऐकून बाबा अवाक झाले. असली काही समस्या असेल असं त्यांना वाटलंच नव्हतं. ही जबाबदारी जर एकदा अंगावर घेतली, तर ती बरीच वर्षे पुरणारी होती, त्याकरता पैसेही बरेच लागणार होते.

थोडा विचार करून ते म्हणाले, “ सुखी, तू फारच मोठी जबाबदारी अंगावर घेतली आहेस. याचा अर्थ तू त्या घराशी एकरूप झाली आहेस. त्याचा मला आनंद होतो आहे. पण बाळा, ही गोष्टं तुमच्या संसारावर परिणाम करणारी आहे. ‘ आज करशील, उद्या करशील, मग कंटाळून, घेतला वसा टाकून देशील, ’ असं वागून चालणार नाही. हे तू आधी लक्षात घे. मग जबाबदारीचा स्वीकार कर.”

सुखदा , “ बाबा मी तुमच्याच तालमीत तयार झाले आहे; हे विसरू नका. ‘ प्राण जाय पर वचन न जाय ’ हे तुमचं ब्रीद माझ्या मनावर ठसलेलं आहे.

“ तू काय मला बोलण्यात हार जाणार आहेस का? ” बाबा म्हणाले. “ तरीही कर्तव्याची जाणीव तुला करून देणं, हे माझं कर्तव्यच आहे. म्हणून तुला जाणीव करून दिली. मला विचार करायला थोडा वेळ दे. असं करा ना; या रविवारी सकाळी तुम्ही जेवायलाच याना. म्हणजे बोलायला भरपूर वेळ मिळेल. ”

एव्हढं बोलणं होईपर्यंत आई चहा व खायला घेऊन आली. मग जरा 'हंसी - मजाक ' करून सुखदा व विनायक घरी आले.

विनायकाने एव्हढी मोठी जबाबदारी अंगावर घेतल्यामुळे सगळयांच्या मनावर जरा टेन्शन आलं होतं. घरात एकदम शांतता होती. रात्रही बरीच झाली होती. त्यामुळे जेवणी आटोपून लगेच निजानीज झाली. सगळयांना सुखदाचं दडपण आलं होतं. तिची प्रतिक्रिया काय असेल, याची त्यांना काळजी वाटत होती. तिने विरोध केला तर विनायक व तिच्यात भांडण होईल की काय, अशा विचारांनी आई आणि वैशाली अस्वस्थ झाल्या होत्या. जरी सुखदा म्हणत होती की वैशालीनी मेडिकलला जावं, तरी नुसतं म्हणणं आणि प्रत्यक्ष जबाबदारी घेणं यात महदंतर असतं. पण सुखदा थंडच होती तिने यावर काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती.

सकाळ उजाडली, सगळे आपापल्या कामाला लागले. आठवडा तसा शांततेतच गेला. वैशालीला मेडिकलला प्रवेश मिळणार हे जवळजवळ निश्चितच होतं, फक्त त्यावर शिक्कामोर्तब होणं बाकी होतं. या शिक्षणाकरता भराव्या लागणाऱ्या फीची आठवण, त्या आठवणीनीच सगळयांची बोलती बंद करून टाकली होती. खरंतर उज्ज्वल भविष्याची स्वप्नं दाखवणारे सोनेरी दिवस होते ते. पण आपल्यामुळे हे सगळं घडतं आहे या विचारांनी

विशाखाला अपराधी वाटत होतं. जणू काय मेडिकलला जायला पुरेसे मार्क्स मिळवून, तिने गुन्हाच केला होता.

ठरल्याप्रमाणे रविवारी सकाळी सुखदा व विनायक तिच्या माहेरी जेवायला गेले.

जेवणी आनंदात पार पडली. दोघांनाही घाई झाली होती, बाबा काय सांगतात ते ऐकण्याची. पण त्यांच्या कलानीच घ्यायला हवं होत. जेवण झाल्यावर बाबा म्हणाले, “ थोडी विश्रांती घ्यायची आहे का?” विश्रांती कसली? दोघांनाही कोण उत्सुकता लागून राहिली होती. दोघंही विश्रांती घ्यायला नाही म्हणाली. तरीही बाबांनी बोलायची घाई केली नाही. जेंव्हा आई येऊन त्याच्यात बसली, तेंव्हा बाबांनी बोलायला सुरवात केली. आईला हा विषयच माहित नव्हता. पण कळेल तिला बोलता बोलता, अशा विचारांनी ते म्हणाले,

“ तुमची गरज खूप मोठी व खूप दिवसांकरता लागणारी आहे.” बाबा म्हणाले.

आईला वाटलं की सुखदा फ्लॅट घेते आहे. ती म्हणाली, “ पण आपण करू या न मदत तिला.”

बाबा पुढे म्हणाले, “ विशाखाला डॉक्टर व्हायला पाच वर्षं लागतील. त्याच्यापुढे तिला पोस्ट ग्रॅज्युएशन करावं लागेल. तोवर

विदुलाच्या उच्च शिक्षणाची वेळ येईल. ह्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात तुमच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करायला तुम्हाला सवडच मिळणार नाही. ह्या गोष्टीला हात घालण्यापूर्वी पुन्हा एकदा विचार करा."

आता आईला कळलं की वारे कुठल्या दिशेनी वाहत आहेत. ती घाईघाईनं म्हणाली की,

" विशाखाला डॉक्टर कशाला व्हायचं आहे? आपलं अंथरून पाहून पाय पसरावेत. " यावर कोणीच काही प्रतिक्रिया दिली नाही.

पुढे ती म्हणाली, " आणि आम्ही का मदत करायची तिला डॉक्टर व्हायला? मला वाटलं, की तुम्ही फ्लॅट घेता आहेत. म्हणून मी मदत करू म्हणाले."

यावरही कोणी काही प्रतिक्रिया दिली नाही. विशाखाची आई एक साधीसुधी घरेलु बाई होती. उच्च त्याग, महत्वाकांक्षा, जिद्द पूर्ण करण्यातला आनंद व समाधान, इ. गोष्टी तिच्या खिजगणतीतही नव्हत्या. दोन आणि दोन चार, एव्हढीच तिच्या विचारांची झेप होती. तिच्या बोलण्याबद्दल कोणीच तिला काही बोललं नाही.

बाबा म्हणाले, " सुखदा, तुम्हाला ज्या तऱ्हेची मदत हवी आहे त्याकरता बँकेकडून लोन घेणं एव्हढा एकच मार्ग आहे. मी

तुला लोन मिळवून द्यायला मदत करू शकतो. त्याकरता मी स्वतः जामीन राहीन. लोनचा फायदा इतकाच की हे लोन शिक्षण पूर्ण झाल्यावर परत करायचं असतं. त्याकरता EMI ची सोय असते. हे केलंत तर तुम्हाला थोडी सवड मिळेल.

विनायकाला या तऱ्हेची काहीच माहिती नव्हती. लोन म्हटल्यावर तो गडबडला. त्यानी बोलायला सुरवात केली. तो म्हणाला की, “ पण ---- लोन म्हणजे ---”

त्याचं वाक्यं अर्धवट तोडत सुखदा म्हणाली, “ विनायक आता पण --परंतु काही नको. आपली सोय होते आहे नं! बाबा तुम्ही सांगा कुठल्या बँकेचं लोन घ्यायचं ते.” मी लगेच प्रयत्नाला लागते.

आता आईला कळलं की यात आपल्या बाईसाहेबांचाच पुढाकार आहे. मग तिची बोलतीच बंद झाली. सुखदा किती जिद्द करणारी मुलगी आहे ते, तिला चांगलंच माहिती होतं. बाबा पुढे म्हणाले, दोन तीन बँकांमध्ये माझी चांगली ओळख आहे. मी त्यांच्याकडून सगळी माहिती घेतो; आणि तुला सांगतो. विनायक काळजी करू नकोस. हा अगदी राजमार्ग आहे. पुढे कदाचित, तिला स्वतःलाही हे लोन फेडता येईल. पण ती पुढची बात झाली.

आज आपण लोनसाठी प्रयत्न करू या. समस्येची उकल झाली होती.

मग इतर गप्पांना सुरवात झाली. सावकाश चहा वगैरे घेऊन, संध्याकाळी दोघं हलक्या मनानी, घरी जायला निघाली.  घरी आल्यावर त्यांनी विशाखाला ही सर्व माहिती दिली. लोन तिचं तिच्याच नावावर असणार आहे हे ही तिला सांगितलं. लोन शिक्षण पूर्ण झाल्यावर फेडायचं असतं, हे कळल्यावर तर ती शांतच झाली. ती म्हणाली, “ दादा, तू माझ्यासाठी किती विचार करतोस रे! पण ही गोष्टं वहिनीला पसंत आहे का? ” यावर विनायक काहीतरी बोलणार होता, पण त्याच्या आधीच सुखदा म्हणाली, “ तुम्हा भावंडांच्यामध्ये मी काही बोलणार नाही. विनायक करेल त्या प्रत्येक गोष्टीला माझी संमती असेल.”

सुखदाची भूमिका काय असेल हा प्रश्नही सुटला होता. सुखदानी स्वतःकडे मोठेपणा न घेता विनायकलाच मोठं केलं होतं. सगळेच प्रश्न सुटले होते. घरात आता आनंदाचे झरे वाहू लागले. विशाखाचं यश साजरं करण्याचा उत्सव चालू झाला. पेढे आले. विनायकाची आईही भावंडांचं प्रेम पाहून सुखावली. सुखदाच्या बोलण्याने सर्वांनाच दिलासा मिळाला होता. तिच्याबद्दल विश्वासही निर्माण झाला.

यथावकाश सर्व गोष्टी पार पडल्या. विशाखाचं वैद्यकीय शिक्षण चालू झालं. फक्त सुखदानी व विनायकांनी सुद्धा पैसे बाजूला टाकायला सुरवात केली होती न बोलता. या गोष्टीचा विदुलावर चांगला परिणाम झाला आपणही चांगला अभ्यास केल्यास आपल्यालाही हवं ते शिकता येईल या विचारांनी तिनी जोमानी अभ्यासाला सुरवात केली.

दुधात साखरं पडल्यासारखी सुखदाला बाळाच्या जन्माची चाहूल लागली. दोन्ही घरं आनंदली. सुखदा घरात आल्यापासून घरात सगळं चांगलंच घडत होतं. सुखदाच मनातून थोडी धास्तावली होती. आता आपल्या प्रयत्नात आपण कमी पडू की काय असं तिला वाटायला लागलं. पण बाबांनी तिची समजूत काढली. काही गोष्टी वेळच्या वेळी झालेल्याच बऱ्या असतात. हे त्यांनी तिला समजावून सांगितलं. आता विनायकालाही बळ आलं होतं. हुशारी तर त्याच्याजवळ होतीच, त्यांनी आपण संध्याकाळी काहीतरी नवा छोटासा उद्योग सुरू करण्याचा आपला मानस सुखदाजवळ बोलून दाखवला.

पुन्हा एकदा सुखदा आणि विनायक बाबांकडे सल्ला घ्यायला गेले. विनायकानी आर्थिक गुंतवणुकीचा व्यवसाय करायचा असं ठरवलं. तो हुशार होता आणि प्रामाणिकही होता. या

व्यवसायात प्रामाणिकपणाला फार महत्व असतं. किंबहुना तेच तुमचं भांडवल असतं. या व्यवसायाची कायदेशीर बाजू सांभाळायला त्याला सुखदाची मदत होणार होती. ही सगळी आखणी त्यांनी तिघांनी मिळून केली. त्याला पहिली गुंतवणूक करण्याकरता बाबांनीच पैसे दिले. त्याला घरात बसूनच हा व्यवसाय करता येणार होता.

सुखदाचं गर्भारपण आणि बाळंतपण लाडाकौतुकात पार पडलं. तिनी एका पुत्ररत्नाला जन्म दिला. बाळाचं नाव विशाखा आणि विदुला यांनी सुचविल्याप्रमाणे विहान ( पहाट) ठेवण्यातआलं. सगळं घर कष्ट करत होतं. कोणालाच उसंत माहित नव्हती. पण तरीही सगळं घर आनंदात होतं. कोणी बोलून नाही दाखवलं, तरी सुखदा घरात आल्यापासून घराचा नूरच बदलून गेला आहे, असं प्रत्येकालाच वाटत होतं.

विशाखा, विदुला यांचा अभ्यास, त्यांची प्रगती दाखवत होता. विनायकाचाही संथ गतीने का होईना व्यवसायात जम बसत होता. या सगळ्याचा परिणाम म्हणून की काय विनायकाच्या आईच्याही मनाला उभारी आली होती. त्या मनापासून नातवाचं सगळं करण्यात भाग घेत होत्या. त्यामुळे सुखदानीही लवकरच कोर्टात जायला सुरवात केली.

सुखदा आणि विनायक आपापल्या व्यवसायात स्थिरावले होते. त्यामुळे आता विदुलाच्या शिक्षणाकरता लोन काढण्याची गरज नव्हती. कालवशात विनायकाच्या आईचा समाधानात मृत्यू झाला होता. विदुलाही विशाखाच्या पावलांवर पाऊल ठेवत डॉक्टर होणार होती. विहान आता आठवीत शिकत होता. कमी होती ती म्हणजे सुखदा अजून घर घेऊ शकली नव्हती. बाकी सगळं बरं चाललं होतं.

विशाखाचं शिक्षण चालू असता असताच  तिचं लग्न ठरलं होतं. डॉ अनुरागनी  आपणहूनच तिला लग्नाबद्दल विचारलं होतं. अनुरागच्या व त्यांच्या आर्थिक परिस्थितीत खूपच फरक होता. अनुरागला त्याची जाणीव होती. पण ती गोष्टं आपल्या लग्नाच्या आड येणार नाही याची ग्वाही त्यानी विशाखाला दिली होती. माझ्या भाऊ वहिनींनी परवानगी दिल्यासच मी होकार देईन, असं विशाखाने अनुरागला सांगितलं होतं.

अनुरागाच्या स्थळाला नाही म्हणण्याजोगं काही नव्हतंच. शिवाय आज जरी पैसे नसले तरी विशाखाचा  भविष्यकाळ उज्ज्वल होता. त्यामुळे लग्नात काही अडथळे आले नाहीत. त्यांना रजिस्टर लग्न करायचं होतं. तसंच साधेपणानी लग्न पार पडलं.

शिक्षण पूर्ण झाल्यावर विशाखा व विनायक / सुखदा यांनी मिळून तिच्या लोनची परतफेड केली.

लग्नानंतर वर्षातच विशाखाने एका गोंडस मुलीला जन्म दिला. तिचं नांव अधिरा ठेवण्यात आलं. विशाखाची नोकरी व post graduation सुरळीतपणे पार पडलं. बघता बघता विदुलाही मेडिकलला गेली. पण यावेळी पैशांचा प्रश्न इतका महान  नव्हता.

सगळेच सुखासमाधानात होते. आणि अचानक ती घटना घडली. डॉ विशाखा व डॉ अनुराग एका मोटार अपघातात जायबंदी झाले. केवळ नशिबाचीच साथ होती म्हणून दोघेही जिवंत होते. त्यांना जबर मार बसला होता. त्यांच्या घरी त्यांची सुश्रुषा करू शकेल असं माणूसच नव्हतं. विशाखाचे सासूसासरे अनुक्रमे पंच्याहत्तर आणि अठ्याहत्तर वर्षांचे होते. अशा परिस्थितीत त्यांनाच सांभाळण्याची गरज होती. सगळीकडे नोकर ठेवले तरी त्यांच्याकडे पाहणारं कोणीतरी लागतं नं?

तेंव्हा विशाखाच्या सासूबाई म्हणाल्या, “ सुखदा तूच ये राहायला इथं. या दोघांचं करण्याची ताकद आता आमच्यात राह्यली नाही.”

काय करावं काही समजत नव्हतं. विनायक, विदुला आणि सुखदा सारखे विशाखाकडे येऊन जाऊन होते. पण तेव्हढं पुरत

नव्हतं. त्यांच्या घरातच जाऊन राहणंही मनाला पटत नव्हतं. शेवटी नेहेमीप्रमाणे सुखदानीच त्यातून मार्ग काढला. तिनी विशाखाच्या सासूबाईंना सुचवलं की त्यांनी त्यांचं आऊट हाऊस रिकामं करून घ्यावं. तिथे ही मंडळी तात्पुरती राहायला येतील. सगळ्यांनाच हा विचार पटला.

सुखदा व विनायक तिथे राहायला गेल्यावर सगळ्या गोष्टी जरा नीट व्हायला लागल्या. विहानच्या ओढीने अधीरा तर सुखदाजवळच राहायला आली. सुखदाची खूपच तारांबळ होत होती. पण दुसरा काहीच पर्याय नव्हता. विशाखा आणि अनुराग यांना त्यांच्या हॉस्पिटलमध्येच ठेवावं लागलं होतं. त्यांचे डॉक्टर मित्र येऊन त्यांची काळजी घेत होते. विशाखा जरा बरी होती. पण डॉ. अनुरागला जास्ती लागलं होतं. तो कार ड्रायविंग करत होता नं! पहिले दोन दिवस तर तो बेशुद्धीतच होता. डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनी आता तो शुद्धीवर आला होता. पण अपघाताचा शॉक इतका जबरदस्त होता की त्या धक्क्यातून ते दोघंही अजून सावरू शकले नव्हते.

जवळ जवळ तीन महिने विनायकाच्या कुटुंबाला तिथे राहावं लागलं. तेंव्हा कुठे विशाखा थोडी हिंडती फिरती झाली होती. डॉ. अनुराग तर अजून अंथरुणातच होता. पेशंटची काळजी

घेण्याबरोबरच सुखदाला विशाखाच्या सासू - सासऱ्यांनाही सांभाळून घ्यावं लागत होतं. डॉ अनुराग अजूनही बरा होत नव्हता. सगळेच अगदी सैरभैर झाले होते. विशाखा बरी झाल्यानी त्यांना थोडा धीर आला होता.

या सगळ्या गोष्टी चालू असताना विहानकडे थोडं दुर्लक्ष झालं होतं. त्याच्यात झालेले बदल कोणाच्याच लक्षात आले नव्हते. जेंव्हा शाळेतून पत्र आलं की तुमचा मुलगा गेले दोन महिने शाळेत येत नाही. तो मागच्याच वर्गात राहिला तर त्याला शाळा जबाबदार राहणार नाही. हे पत्र पाहून सगळ्यांचेच होश उडाले. विनायक तर त्याच्यावर भयंकर संतापला. तो म्हणाला, “ येऊ दे त्याला घरी. चांगला बदडून काढतो त्याला.”

त्यावर सुखदा म्हणाली, “ त्याला आपण बदडून काढू रे; पण आपल्याला कोण बदडणार? ”

“म्हणजे काय म्हणायचं आहे तुला? “आपल्याला कशाची शिक्षा? आपण काय केलं आहे? आपण तर त्याला सगळ्या चांगल्या गोष्टी मिळाव्यात म्हणून धडपडतो. हा बरा न्याय आहे तुझा. काय चुकलं आहे आपलं?

“ विनायक आपला मुलगा गेले दोन महिने शाळेत जात नाही ह्याची आपल्याला कल्पना सुद्धा आली नाही. हे आपलं आपल्या

मुलाकडे लक्ष असल्याचं लक्षण आहे का? आपल्याला कितीही का कामं असू देत, आपण कितीही अडचणीत असू दे, आपल्या मुलाकडे आपलं लक्ष हवंच. पण कामाची किंवा अडचणीची सबब सांगून पालकत्वाच्या भूमिकेपासून सुटका नाही. तो चुकलाच आहे पण म्हणून आपण बरोबर ठरत नाही.”

“ द्या न्यायाधीशबाई आरोपीचा गुन्हा सिद्ध झाला आहे, तेंव्हा त्याला शिक्षा द्या.” इति विनायक

“ आरोपीला शिक्षा द्यायलाच हवी, पण आरोपीचा हा पहिलाच गुन्हा आहे, म्हणून कोर्ट त्याला माफी देत आहे.” सुखदा म्हणाली; आणि दोघंही हसायला लागले. विनायक काळजी करू नकोस. आपलं लेकरू चुकलं आहे, हे खरंच. पण मी बघते त्याच्याकडे.

आजवर कधी सुखदेचे आडाखे चुकले नव्हते, त्यामुळे विनायक म्हणाला, “ ठीक आहे.”

तो विषय तिथेच संपला. दुसऱ्या दिवशी, सुखदा विहानला म्हणाली, “ विहान गेले दोन महिने तू शाळेत जात नाही आहेस, असं शाळेचं पत्रं आलं आहे. पण आता मी त्याबद्दल काही बोलणार नाही आहे, आजपासून नियमित शाळेत जायचं आहे. शाळेकडून पुन्हा तक्रार येता कामा नये.”

आपण इतके चुकीचं वागलो .., तरीही आई एकाही शब्दानी आपल्याला रागावली - बोलली नाही हेच त्याला आधी खटकलं. पण तो काय विचारणार होता आईला! नेहमी तो नियमित शाळेत जात होता. तसा तो फार खोडकर नव्हताच. मित्रांच्या संगतीने जरा बिथरला होता. त्यातून सुखदा व विनायक, विशाखा व अनुरागच्या दुखण्यात पूर्णपणे अडकलेले. मग तर त्याला रानच मोकळं मिळालं.

आता सुखदा मधून मधून त्याच्या अभ्यासाची चौकशी करत असे. तोही अभ्यास बरा करत असल्यामुळे रागावण्याचा संबंधच नव्हता. पण आपण किती चुकीचं होतो, त्याबाबत आपल्याला कुणीच काही बोललं नाही, ही गोष्टं त्याच्या मनात खदखदत होती. सुखदाला त्याची कल्पना आली नाही.

एक दिवस सुखदा व विहान दोघंच घरात असतांना, तो आईला म्हणाला, “ आई, तू रागावली का नाहीस मला? मी किती चूक वागलो, त्याचा तुला राग आला नाही का? ”

सुखदा म्हणाली, “ राग आला तर बाळा, पण तो तुझा नाही माझा आला. ”

विहान म्हणाला, “ तुझा कशाबद्दल? तू काय केलंस? ”

सुखदा म्हणाली, “ मी तुझी आई आहे आणि दोन महिन्यात माझा मुलगा काय करतो आहे हे मला समजलं नाही; ही गोष्टं चुकीचीच नव्हे काय? तू तर लहान आहेस, तू चुकल्यास तर मी समजू शकते; पण इतक्या दिवसात मला समजू नये, की तुझं काहीतरी बिनसलं आहे. हे चूकच आहे. पण मला शिक्षा कोण करणार? माझ्या चुकीला शिक्षा नाही तर मग तुझ्याही चुकीला शिक्षा नाही. “

आता तर विहानचा धीरच सुटला. आईला मिठी मारून तो रडायलाच लागला. “ आई मी चुकलो. खूप वेड्यासारखा वागलो. तुला आणि बाबांना खूप त्रास दिला. आई तू मला रागाव, मार, मला काहीतरी शिक्षा कर. पण स्वतःला दोषी ठरवू नकोस.” विहान रडत रडत म्हणाला.

“ विहान तुझी चूक तुला कळली आहे नं, माझ्या दृष्टींनी तुला हीच शिक्षा पुरेशी आहे.ह्याच्या पुढे कधी असा वेडा वागू नकोस. तू ही तुझ्या आत्यांसारखं खूप शिकावंस अशी आम्हा दोघांचीही अपेक्षा आहे.” सुखदा म्हणाली.

“ आई मी चुकलो मला क्षमा कर.” विहान.

“ विहान, ही गोष्टं मला तुझ्या वागण्यातून दिसायला हवी. नुसत्या शब्दांना काही अर्थ नसतो बेटा.” सुखदा

“ आई, मी तू सांगशील तसा वागेन. मलाही शिकायचं आहे. ” विहान

“ आता जा बरं बाहेर खेळायला.” सुखदा

एक मोठा प्रश्न त्यामानाने फार त्रासदायक न होता सुटला होता. पण या पुढे विहानकडे आपण कायम लक्ष द्यायचं, असं तिनी मनाशी ठरवून टाकलं.

अजूनही विशाखाला मदतीची गरज होती. पण ती आता उठून बसू शकत होती. डॉ अनुरागही बरा होता. सुखदानी मनाशी विचार केला की आता आपण आपल्या घरी राहायला जायला हरकत नाही. हवं तर विशाखा व अधिरालाही बरोबर घेऊन जावं. पंधरा दिवस राहून त्या परत इकडे येतील.

तिचा हा विचार सर्वांनाच पसंत पडला. सुखदा आणि विनायक आपल्या घरी राहायला आले. विशाखाही आली होती. पंधरा - वीस दिवस राहून ती परत गेली. आता सुखदाला थोडी उसंत मिळाली. आता स्वतःसाठी एक घर घेण्याचा विचार करायला हवा होता. हेही एक प्रकारचं आव्हानच होतं. सुखद न हरता न कंटाळता नेहमीसारखीच तयार झाली ह्या नव्या आव्हानाला तोंड द्यायला.

त्याबाबतचा विचार करता करता आपण कुठे पोहोचलो, साऱ्या जीवनाचा आढावा घेऊन आलो. तिचं तिलाच हसू आलं; पण ते हसू समाधानाचं होतं.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.**
**अरुंधती बापट यांचे हे दुसरं पुस्तक.**

अरुंधती बापट यांना साहित्याचं बाळकडू घरातूनच मिळालं आणि रक्तात आलं. त्यामुळे लेखन करणं हा त्यांचा “स्व”भाव आहे. आणि ते लेखन त्या स्वांतःसुखाय करतात. ते प्रसिद्ध व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचा त्यांचा “स्व”भाव नाही. आणि त्यातून काही मिळावे ही अपेक्षा अजिबात नाही. पैसा, नाव, पुरस्कार काहीच. त्यांच्या लेखनात कोणाला काही शिकवण्याचा आव नसतो. पण तरीही त्यातून संस्कारांची पेरणी व्हायची ती होतेच. त्यांच्या लेखणीचे हेच वैशिष्ट्य आहे.

अरुंधती बापट यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली सर्व पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू

शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्यच्या माध्यमातून आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।